सोलापूर तरुण भारत
आसमंत



जॉर्डन... पश्चिम आशियातील एक महत्त्वपूर्ण देश. हा देश इस्रायलच्या पूर्वेला, सीरियाच्या दक्षिणेला, सौदी अरेबियाच्या उत्तरेला आणि इराकच्या पश्चिमेला वसलेला. यावरून या देशाचे भौगोलिक महत्त्वही लक्षात यावे. या मोक्याच्या भौगोलिक स्थानामुळे जॉर्डन पश्चिम आशियातील एक प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून उदयास आला. त्यामुळे आखाती देश, उत्तर आफ्रिका आणि पुढे युरोपमधील प्रवेशाचा मार्गही जॉर्डनमधून जातो. जॉर्डनची महती अधोरेखित करण्याचे कारण म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नुकताच यशस्वीरित्या संपन्न झालेला जॉर्डन दौरा.

# ...म्हणून जॉर्डन महत्त्वाचा!

लक्ष्यवेध

**विजय कुलकर्णी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी दि. १५ ते १८ डिसेंबरदरम्यान जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर होते. त्यापैकी जॉर्डन आणि इथिओपिया या दोन्ही देशांमधील अभूतपूर्व स्वागतानंतर ते ओमानमध्ये दाखल झाले. पण, पंतप्रधानांचा जॉर्डन दौरा हा सर्वार्थाने विशेष म्हणावा लागेल. यापूर्वी, फेब्रुवारी २०१८ मध्येही मोदींनी जॉर्डनला भेट दिली होती. पण, यंदा भारत-जॉर्डनमधील राजनयिक संबंधांनाही ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आणि व्यापारासह अन्य क्षेत्रातील सहकार्याच्या दृष्टीने मोदींनी जॉर्डनची निवड केली. जॉर्डनचे पंतप्रधान जाफर हसन यांनी मोदींचे विमानतळावर प्रत्यक्ष उपस्थित राहून स्वागत केले. त्यानंतर मोदींची जॉर्डनचे राजे अब्दुल्ला यांच्यासोबत विविध विषयांवर चर्चा झाली.

पंतप्रधान मोदी आणि किंग अब्दुल्ला द्वितीय यांनी यांनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला आणि व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, अक्षय ऊर्जा, खत, कृषी, नवोन्मेष, डिजिटल तंत्रज्ञान, महत्त्वाच्या खनिजे, पायाभूत सुविधा, आरोग्य, औषधनिर्मिती, शिक्षण, पर्यटन, संस्कृती आणि जनसंपर्क यांसारख्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली. पंतप्रधान मोदी यांनी पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार ५ अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आणि जॉर्डनच्या डिजिटल पेमेंट प्रणालीसह भारताच्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसमध्ये सहकार्य सुचवले. दोन्ही नेत्यांनी दहशतवादाविरोधात सामायिक बांधिलकीची पुष्टी केली आणि दहशतवादाच्या सर्व स्वरूपांचा तीव्र निषेध केला. क्षेत्रीय घडामोडी आणि जागतिक प्रश्नांवर चर्चा करत शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी अक्षयऊर्जा, जलव्यवस्थापन, सांस्कृतिक देवाणघेवाण, डिजिटल सोल्युशन यांसारख्या क्षेत्रातील पाच सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. भारत आणि जॉर्डनचे राजनैतिक संबंध १९५० ला प्रस्थापित झाल्यापसून उबदार आणि स्थिर संबंध राहिले आहेत. ज्यामध्ये राजनैतिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील सहकार्य समाविष्ट आहे. भारत जॉर्डनचा एक महत्त्वाचा व्यापार भागीदार असून, २०२३-२४ मध्ये द्विपक्षीय व्यापार २.८७५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला होता. खते, विशेषतः फॉस्फेट आणि पोटॅश, हे सहकार्याचे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, जॉर्डन हा भारताचा एक महत्त्वाचा पुरवठादार आहे आणि दोन्ही देशांमधील कंपन्यांमध्ये अनेक संयुक्त उपक्रम कार्यरत आहेत.

जॉर्डन हा भारतासाठी फॉस्फेट आणि पोटॅश खतांचाही आघाडीचा पुरवठादार देश. तसेच, भारत हा जॉर्डनचा तिसरा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार. हे लक्षात घेता, आगामी पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार पाच अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे दोन्ही देशांचे उद्दिष्टही यावेळी अधोरेखित करण्यात आले. भारत आणि जॉर्डन यांच्यात एकूण पाच करारांवर सहमती झाली आहे. या करारांमध्ये संस्कृती, अक्षय व स्वच्छ ऊर्जा, जलसंपत्ती व्यवस्थापन, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि ऐतिहासिक वारसा संरक्षण यांचा समावेश आहे. दोन्ही देशांनी सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवणे, नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांमध्ये संयुक्त प्रयत्न करणे आणि जलव्यवस्थापन अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून ई-गव्हर्नन्स आणि तंत्रज्ञानाधारित सार्वजनिक सेवांमध्ये भागीदारी पुढे नेण्यावरही सहमती झाली. याशिवाय, जॉर्डनमधील पेट्रा आणि भारतातील वेरूळ लेणी यांच्यात 'ट्विनिंग' करार करण्यात आला असून, यामुळे वारसा संवर्धन, पर्यटन आणि सांस्कृतिक सहकार्याला चालना मिळणार आहे.

भारत आणि जॉर्डनच्या संबंधांना एक भावनिक किनारही लाभली आहे. जॉर्डनचे राजे अब्दुल्ला द्वितीय यांचे चुलत बंधू हसन बिल तलाल यांची पत्नी राजकुमारी सर्वथ अल हसन यांचा जन्म कोलकात्याचा. सर्वथ यांचे काका, मोहम्मद हिदायतुल्लाह हे १९६८ ते १९७० पर्यंत भारताचे सरन्यायाधीश म्हणून, नंतर १९७९ ते १९८४ पर्यंत भारताचे उपराष्ट्रपती आणि दोनदा भारताचे कार्यवाहक राष्ट्रपती म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्यामुळे जॉर्डनच्या राजघराण्याची ही भारताशी जुळलेली नाळही तितकीच विशेष म्हणावी लागेल. आजही जॉर्डनमध्ये भारतीय नागरिकांची संख्या दखलपात्र आहे. सध्या या देशात सुमारे १७ हजार ५०० भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. यांपैकी बहुतांश भारतीय कापड, बांधकाम, उत्पादन, आरोग्यसेवा इत्यादी क्षेत्रांत कार्यरत आहेत. १९९० मध्ये सद्दाम हुसेनने कुवेतवर हल्ला चढवल्यानंतर, तेथील जवळपास एक लाख भारतीयांनी जॉर्डनमध्ये आश्रय घेतला होता आणि त्यानंतर राजधानी अम्मानवरून 'एअर इंडिया'च्या विमानांनी त्यांना सुखरूप भारतात आणण्यात आले. त्यामुळे जॉर्डन आणि भारताचे संबंध हे तसे प्रारंभीपासूनच सौहार्दाचे आणि सहकार्याचे राहिलेले दिसतात.

(पान ६ वर)

## अरब जगतात प्रभाव वाढवण्यासाठी...

पश्चिम आशियातील एक जिओपॉलिटिकल हब म्हणून जॉर्डनचे महत्त्व वाढत आहे. भारतासाठी जॉर्डनशी संबंध दृढ करणे, म्हणजे इतर अरब राष्ट्रांमध्येही आपली पकड मजबूत करण्याचा मार्ग मोकळा करणे. पीएम मोदींचा दौरा अशा वेळी झाला आहे, जेव्हा भारत आणि जॉर्डन राजनैतिक संबंधांचे ७५ वर्षे साजरे करत आहेत. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांनी भविष्यासाठी ८ मुद्द्यांचा संयुक्त दृष्टीकोन मांडला आहे.

## अनोखी आणि शांत ताकद...

मध्य पूर्वेतील बहुतांश देश अमेरिका, सौदी अरेबिया किंवा इराण यांच्यापैकी एखाद्या देशाशी जोडलेले दिसतात. मात्र, जॉर्डन हा देश याला अपवाद ठरतो. अरब देशांसोबतच इस्रायल आणि पाश्चात्त्य राष्ट्रांशी संतुलित संबंध ठेवणारा जॉर्डन संपूर्ण मिडिल ईस्टमधील एक अनोखी आणि शांत ताकद म्हणून ओळखला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या याच देशाच्या दौर्यावर गेल्याने भारत–जॉर्डन संबंधांना नवे महत्त्व प्राप्त झाले आहे.

# भाजपची नवीन सुरूवात

गौरव

**प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीबद्दलची उत्सुकता अचानक संपुष्टात येऊन त्याची जागा विस्मयाने घेतली आहे. बिहारचे रस्ते बांधकाममंत्री व पाच वेळचे आमदार नितीन नबीन यांची पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड झाल्याची घोषणा रविवारी संध्याकाळी करण्यात आली. बर्याच लोकांनी त्यांचे नाव प्रथमच ऐकले असल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्काही बसला. मुख्यमंत्री असो की, आता पक्षाचे अध्यक्षपद; अशा पदांवर अनपेक्षित व्यक्तीची नियुक्ती करण्याची भाजपची ही सवय आता त्याचे व्यवच्छेदक लक्षणच बनले आहे. बहुसंख्य जनतेला असे नाव अनपेक्षित वा ओळखीचे वाटत नसले, तरी त्या व्यक्तीने पक्षासाठी केलेल्या कार्याची आणि त्याच्या क्षमतेची पूर्ण कल्पना पक्ष नेतृत्वाला असते.

किंबहुना, पक्षासाठी निरलसपणे मात्र पूर्ण जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे काम करणार्या सर्वच कार्यकर्त्यांचा सन्मानच अशा निर्णयाने करण्याचे भाजपचे हे धोरण निश्चितच स्वागतार्ह आहे. नितीन नबीन हे बिहार भाजपमधील एक प्रमुख नेते आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे बिहारमध्ये भाजपच्या विस्तारालाही फायदा होईल. पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी आणि भविष्यातील राजकीय रणनीतीच्या दृष्टीनेही हा निर्णय तितकाच महत्त्वाचा ठरावा. तसेच नितीन नबीन यांच्या माध्यमातून आगामी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठीही राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे. कारण, नितीन नबीन यांना सत्ता आणि संघटना दोन्हीचा अनुभव आहे. त्यांनी कठोर परिश्रम आणि क्षमतेने आपले स्थान निर्माण केले आहे. नबीन हे भाजपच्या तिसर्या पिढीतील नेते असून, स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील, तेव्हा नबीन हे ६८ वर्षांचे असतील. त्यांचे सहकारीही सुमारे याच वयाच्या आसपास असतील. म्हणजे तेव्हाही भाजपकडे तुलनेने तरुण नेत्यांची फळी असेल. कोणत्याही पक्षाला काही काळानंतर नव्या नेत्यांची गरज भासतेच. प्रस्थापित नेता जेव्हा काम करण्यास असमर्थ होतो, त्यानंतर नव्या पर्यायाचा शोध घेणे हे कोणत्याही पक्षासाठी क्रमप्राप्तच. त्यासाठी नव्या नेतृत्वाची फळी हाताशी असणे केव्हाही चांगलेच. पण, हे सर्वच पक्षांमध्ये घडत नाही. कारण, भाजप सोडल्यास बहुतेक सर्व पक्ष हे घराणेशाहीवादी पक्ष. त्यामुळे त्यांचे नेतृत्व एकाच घराण्यात कायम राहील, हे स्पष्ट आहे. अशा पक्षांमध्ये कार्यकर्त्याची काम करण्याची क्षमता आणि त्याचा प्रामाणिकपणा यांना दुय्यम महत्त्व मिळते. नेत्याची मर्जी जो सांभाळेल, त्याची पक्षात भरभराट होते. घराणेशाही पक्षात केवळ होयबा व्यक्तीच चालते, हे मल्लिकार्जुन खर्गे यांनी दाखवून दिले आहे. बहुतेक पक्षांनी काँग्रेसचीच परंपरा चालविली. परिणामी, या पक्षांची वाढ खुंटली आणि त्यांचा पाया आक्रसत गेला. उलट, भाजपसारख्या पक्षात पुढील काही दशकांचा विचार करून नवे नेते घडविले जातात. दिवंगत सुषमा स्वराज, अरुण जेटली, देवेंद्र फडणवीस, गोपीनाथ मुंडे वगैरे अनेक नेते हे विद्यार्थीदशेपासून पक्षात सक्रिय राहिले होते. त्यामुळे भाजपमध्ये घराणेशाही नव्हे, तर गुणवत्ता हीच महत्त्वाची असल्याचेही नबीन यांच्या नियुक्तीनेही अधोरेखित केले आहे. खर्या समर्पणाने आणि प्रामाणिकपणे पक्षासाठी काम करणार्या व्यक्तीलाही भाजप अध्यक्ष म्हणून सन्मानित केले जाऊ शकते, हेच भाजपने पुन्हा एकदा सिद्ध केले.



४५ वर्षीय नितीन नबीन यांच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदावरील नियुक्तीने भाजपने अनेक कथित राजकीय जाणकार आणि विरोधी पक्षांचे अंदाज साफ धुळीत मिळविले. तसेच नबीन यांच्या नियुक्तीने पक्षाच्या लाखो कार्यकर्त्यांना नवी उमेद आणि विश्वास मिळाला आहे, हे निश्चित!

नितीन नबीन यांची जडणघडण संघ आणि भाजपच्या विचारसरणीतील. नितीन यांचे वडील नबीन किशोर सिन्हा जनसंघातून भाजपमध्ये सामील झाले. ते पाटण्यातून सात वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. वडिलांच्या निधनानंतर नितीन यांनी वडिलांचा वारसा हाती घेतला, परंतु कधीही घराणेशाहीचा कलंक लागू दिला नाही. नितीन नबीन यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात अभाविपमधून केली आणि नंतर ते भाजप युवा मोर्चात सामील झाले. आज नबीन यांच्या नियुक्तीमुळे पक्षात जनरेशन नेस्ट चे युग सुरू झाले आहे. मध्य प्रदेश विधानसभेची निवडणूक झाल्यावर भाजपच्या सर्व नवनियुक्त आमदारांचा समूह फोटो काढण्यात आला, तेव्हा मोहन यादव हे त्यात मागे तिसर्या रांगेत उभे होते. तरीही, त्यांच्यासारख्या तरुण आणि चाकोरीबाहेरील व्यक्तीची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती करून भाजपने वेगळेच संकेत दिले. असेच निर्णय राजस्थान, ओडिशा, हरियाणा आणि छत्तीसगढच्या मुख्यमंत्रिपदावर नियुक्ती करताना घेण्यात आले. त्याची सुरुवात गुजरातपासूनच झाली होती. गुजरातमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दीड वर्षे आधी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा अचानक राजीनामा घेण्यात आला आणि त्यांच्या जागी भूपेंद्र पटेल यांची नियुक्ती करण्यात आली. भूपेंद्र हे पटेल समाजातील होते, हे एक कारण तर होतेच. पण, ते तेव्हा पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आले होते. तरीही, त्यांची मुख्यमंत्रिपदावर नियुक्ती करून भाजपने सर्वांना धक्का दिला. तेव्हा पटेल यांच्या मंत्रिमंडळातही अनेक नवे चेहरे दिसले होते. इतकेच कशाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गुजरातच्या मुख्यमंत्रिपदी नियुक्ती झाली, तोपर्यंत स्वत: मोदी यांनी कोणतीही निवडणूक लढविली नव्हती वा कोणत्याही सरकारी पद-ावर ते नव्हते. तोपर्यंत त्यांनी पक्षसंघटनेतच काम केले होते. तरीही, पक्षाने त्यांची कोणतीही जबाबदारी तडीस नेण्याची आणि प्रामाणिकपणे काम करीत राहण्याची वृत्ती अचूक हेरली. मोदी यांनीही आपल्यावरील हा विश्वास सार्थ ठरविला. इतकेच नव्हे, तर पंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी ज्या ताकदीने पेलली आहे, त्यावरून त्यांनी एक अपवादात्मक उदाहरण जगापुढे सादर केले.

मोदी गेली सुमारे २५ वर्षे सलग मुख्यमंत्री वा पंतप्रधान पदावर आहेत. पण, या काळात त्यांनी एक दिवसही सुटी घेतलेली नाही. त्यामुळे पक्षाचे काम किंवा दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि पूर्ण ताकदीने पार पाडणे हे भाजपमध्ये नेतेपदाचे निकष आहेत. कार्यकर्त्यावर नेतेपदाची जबाबदारी सोपविण्यापूर्वी त्याने कसलीही अपेक्षा न बाळगता पक्षाने सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली असली पाहिजे, ही पहिली कसोटी असावी. नितीन नबीन यांनी आजवर कसलाही गाजावाजा न करता, त्यांच्यावर सोपविलेल्या सर्व जबाबदार्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. तिथेही त्यांनी विशेषतः बूथ-स्तरीय व्यवस्थापन, संघटनात्मक विस्तार आणि निवडणूक समन्वय यावर लक्ष केंद्रित केले. परिणामी, पक्षाने छत्तीसगढमध्ये मोठा आणि निर्णायक विजय मिळवला. २०१८ मध्ये झालेल्या पराभवानंतर, राज्य नेतृत्वाच्या तळागाळात वर्षानुवर्षे सहभागाच्या अभावामुळे भाजप कार्यकर्ते निराश झाले. भूपेश बघेल यांच्या कर्जमाफीच्या आश्वासनाला प्रतिसाद म्हणून त्यांनी मनसुख मांडविया यांच्यासोबत महतारी वंदन योजनेची संकल्पना मांडली. ही मोहीम छत्तीसगढ विधानसभा निवडणुकीत एक महत्त्वाचा टप्पा ठरली. २०२४च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपला छत्तीसगढमध्ये बळकटी देण्यासाठीही त्यांनी दौरे सुरू ठेवले. त्यांच्या प्रयत्नांमुळे छत्तीसगढमध्ये भाजपचा १०-१ असा दणदणीत विजय झाला. अशाप्रकारे कार्यकर्ते आणि प्रशासकीय व्यवस्था यांना सांभाळून आपले काम करवून घेण्याची हातोटी नबीन यांच्याकडे आहे, हे पक्षाने अचूक हेरले आणि म्हणूनच सत्तारूढ पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.


विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनीही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारण्यापूर्वी काही महिने अमित शाह यांच्या हाताखाली कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. आताही भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी पूर्णांशाने स्वीकारण्यापूर्वी नितीन नबीन हे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहतील. आज जरी त्यांचे नाव बहुसंख्य भारतीयांसाठी अनोळखी असले, तरी कुणी सांगावे, त्यांच्या कार्यामुळे एक दिवस त्यांचे नावदेखील अमित शाह यांच्यासारखे सर्वतोमुखी होईलही! नितीन नबीन यांचे पुनश्च अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनस्वी शुभेच्छा!

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

# अनुराधा, संघ आणि अगणित बलिदान

चित्रपटाची सुरुवातच होते रेडिओवरच्या एका उद्घोषणेने- 'हे आकाशवाणीचे मुंबई केंद्र आहे. आम्ही आज आपल्याला अशी गाणी ऐकवणार आहोत ज्यांनी दहा वर्षांपूर्वी लोकप्रियतेचा कळस गाठला होता. आता ऐका गाणे साँवरे, साँवरे. गायिका अनुराधा राम.' पंडित रविशंकरांची सतार झणाणते आणि लताबाईंच्या दैवी सुरात कवी शैलेंद्रांचे एक अनुपम गाणे सुरू होते- 'साँवरे, साँवरे, काहे मोसे करो जोराजोरी, बैंया ना मरोडो मोरी, दूँगी दूँगी गाली हटो जाओ जी, साँवरे...' भैरवी रागावर आधारित अशी ही एक अप्रतिम बंदिश आहे. कितीही वेळा ऐकली तरी कान तृप्तच होत नाहीत. गाणे चालू असतानाच पडद्यावर चित्रपटाची श्रेयनामावली उलगडत जाते.



संसारासाठी करिअरचे बलिदान करणारी हृषिकेश मुखर्जींची अनुराधा

दहा वर्षांपूर्वी हे गाणे गाऊन धूम मचवणारी गायिका अनुराधा राय (अभिनेत्री लीला नायडू) आता अनुराधा चौधरी बनलेली असते. तिचा नवरा असतो डॉ. निर्मल चौधरी (अभिनेता बलराज साहनी). तिच्या बापाने तिच्यासाठी दीपक (अभिनेता अभि भट्टाचार्य) हा नवरा ठरवलेला असतो. पण डॉ. निर्मलच्या अफाट बुद्धिमत्तेला आणि ध्येयनिष्ठेला भाळून गायिका, कवयित्री आणि नृत्यांगना असलेली अनुराधा त्याच्याशीच हट्टाने लग्न करते. डॉ. निर्मल शहरात न राहता खेडेगावात येऊन ग्रामीण जनतेची वैद्यकीय सेवा करत असतो. मात्र

शहरातून आणि परदेशातून नवनवीन संशोधन पत्रिका मागवून, त्यांचे सतत अध्ययन करून त्याने आपले वैद्यकीय ज्ञान अगदी अद्ययावत ठेवलेले असते. निर्मल आणि अनुराधा यांना एक छोटी मुलगी असते. निर्मलची समाजसेवा, संशोधन आणि मुलीचे संगोपन यात अनुराधाचे संगीत, काव्य, नृत्य पाठी राहते.

तिचा एकेकाळचा नियोजित पती दीपक आणि त्याची प्रेयसी राणू यांच्या गाडीला निर्मल-अनुराधा यांच्या गावालगत अपघात होतो. निर्मल दोघांवर नुसते उपचारच करतो असे नव्हे, तर राणूच्या जखमी चेहऱ्यावर चक्क प्लॅस्टिक सर्जरी करतो. निर्मलचे ते अद्भुत शल्यकौशल्य पाहून दीपक थक्कच होतो. या निमित्ताने दीपक काही दिवस निर्मल-अनुराधाच्या त्या खेड्यातल्या घरात मुक्काम करतो. आणि मग त्याला दुसरी बाजू दिसते. निर्मल रुग्ण सेवेत आणि नव्या संशोधनात इतका मग्न आहे की, त्याला अनुराधाकडे लक्ष द्यायला वेळच नाही. तिच्या सगळ्या कला तर बाजूला पडल्याच आहेत, पण ज्याच्यासाठी तिने एवढे बलिदान दिले, त्याचा एक प्रेमाचा शब्दही तिला महाग झालाय. आता या सिच्युएशनला गाणे हवेच. शैलेंद्र, रविशंकर आणि लताबाई पुन्हा एकदा एका अप्रतिम बंदिशीद्वारे अनुराधाचे दुःख अतिशय संयतपणे व्यक्त करतात-

**'कैसे दिन बीते, कैसी बीती रतियाँ, पिया जाने ना. रुत मतवाली आ के चली जाएँ, मन ही मेरे मन की रह जाएँ, खिलने को तरसे नन्हीं नन्हीं कलियाँ, पिया जाने ना...'**

दिग्दर्शक हृषीकेश मुखर्जी यांनी या गाण्याचे चित्रीकरणही फार हृद्य असे केले आहे. अनुराधा आपल्या मनातले दुःख गाण्यातून व्यक्त करते आहे. निर्मल नव्या वैद्यकीय संशोधन पत्रिका चाळतो आहे. त्याचे गाण्याकडे, त्यातून उमळून येणाऱ्या भावांकडे जराही लक्ष नाही. मधेच तो उठून सरळ निघून जातो. अनुराधा आणखीनच कष्टी होते आणि आपली एकेकाळची नियोजित वधू, प्रतिभावंत कलावती अशी अनुराधा आणि तिचा ध्येयनिष्ठ, बुद्धिमान पती निर्मल यांच्या संसाराचे हे चित्र पाहून खंतावणारा, हळहळणारा दीपक, असे हे 'साँग काँपोझिशन' फार बहारदार झाले आहे. लीला नायडू, बलराज सहानी आणि अभि भट्टाचार्य या तिघांनीही उत्कृष्ट 'क्लोज-अप्स' दिले आहेत.

पुढे घडते असे की, दीपक अनुराधाला पुन्हा शहरात येऊन कलावंत म्हणून तिची कारकीर्द पुन्हा सुरू करण्याचे आवाहन करतो. निर्मलला जेव्हा हे सगळे कळते, तेव्हा तो आपल्या ध्येयनिष्ठेच्या तंद्रीतून खडबडून जागा होतो. आपण अनुराधावर अन्याय केलाय, हे तो मान्य करतो मात्र, तो तिला स्पष्टपणे सांगतो की, माझा मार्ग आता बदलणार नाही. पण तू अवश्य शहरात जाऊन तुझी कारकीर्द उभी कर.

तुझ्यासाठी मी एकटा राहीन. आता अनुराधासमोर प्रश्न असतो. नवरा, त्याचे संशोधन, समाजसेवा, संसार की आपली कविता, संगीत, नृत्य? अनुराधा पहिला पर्याय स्वीकारते. रात्रभर आपल्या प्रयोगशाळेत संशोधनात मग्न असलेला निर्मल घरी येतो, तेव्हा अनुराधा घर आवरत असते. दीपक हसतो आणि गाडी सुरू करून निघून जातो. यावेळी पुन्हा एकदा लीला नायडू, बलराज सहानी आणि अभि भट्टाचार्य यांचे भावदर्शन अप्रतिम.

हृषीकेश मुखर्जी दिग्दर्शित, सचिन भौमिक लिखित हा 'अनुराधा' नामक चित्रपट १९६० साली पडद्यावर आला. तिकीटबारीवर त्याला माफकच यश मिळाले; त्यातली गाणी मात्र आजही रसिकप्रिय आहेत. आता यातला महत्त्वाचा सामाजिक मुद्दा असा की, नवऱ्याची समाजसेवा, ध्येयनिष्ठता, शहराऐवजी गावात डॉक्टरकी करणे म्हणजेच एक प्रकारे जाणून-बुजून दारिद्र्य पत्करणे, हे बायकोने त्याच्या गुणांना भाळून स्वीकारले आहे. ती स्वतः प्रतिभावंत कलावती आहे. रेडिओस्टार असण्याच्या ग्लॅमरची चव तिने चाखलेली आहे.

**आपल्या हिंदू समाजाला बलिदानाचे मोठे आकर्षण आहे; किंबहुना एक प्रकारची आसक्तीच आहे. देशासाठी बेदरकारपणे आयुष्य झुगारून देणारे अगणित ज्ञातअज्ञात स्वातंत्र्य सैनिक हे आपल्या देशाचे वैभव आहे. या प्रत्यक्ष बलिदानांइतकीच मोलाची आहेत अप्रत्यक्ष बलिदाने. बलिदान करणे म्हणजे प्राणच द्यायला हवेत असे नाही. एका संघ गीताच्या ओळी आहेत- 'शलभ (म्हणजे पतंग) बन जलना सरल हैं, स्नेह की जलती चिता पर, स्वयम् को तिल-तिल जलाकर दीप बनना ही कठिन हैं, साधना का पथ कठिन हैं...!'**

एकेकाळी सोडून दिलेले ते सगळे आयुष्य आता तिला पुन्हा साद घालते आहे. पण नवऱ्याने आपली चूक कबूल केल्यावर ती त्याच्या संसारातच राहण्याचा पर्याय निवडते. म्हणजे कठोर भाषेत बोलायचे तर स्वतःच्या करिअरवर पाणी सोडते. हे बलिदान नाही का? असंख्य क्रांतिकारकांनी गीतेचे पुस्तक हातात घेऊन हसत-हसत आपली मान फासात अडकवून घेतली. त्यांचे बलिदान दिव्य आणि परमवंदनीय आहे. पण बदलत्या गरजेनुसार डॉ. हेडगेवारांनी बलिदानाची संकल्पना बदलली.

देशासाठी मरण्यापेक्षा, देशासाठी जगेन, ही ती संकल्पना. कसा जगेन? तर देशासाठी समाजाच्या उत्थानासाठी, समाज संघटनेसाठी माझ्या सर्व शक्ती समर्पित असतील. थोडा विचार करून पाहा. मृत्यूवर स्वतःच झडप घालणे हे सोपे नाही, पण स्वतःच्या सर्व शक्ती तिळातिळाने समर्पित करून जगणे जास्तच कठीण आहे. ते सुद्धा सुखोपभोगाची सर्व साधने, प्रसिद्धी, कीर्ती सहज मिळत असताना. शलभ (पतंग) दिव्यावर झडप घालून प्रेमाची कुर्बानी देतो. जळून जातो. त्याचा त्याग, बलिदान दिव्य आहेच. पण स्वतःच दीप बनून तिळतिळ जळत राहून लक्षावधींच्या अंधकारमय जीवनात आशेचा, अस्मितेचा प्रकाश आणणे जास्त दिव्य आहे. ती कठीण अशी ईश्वरी साधना आहे. स्वतः डॉक्टर हेडगेवार आणि त्यांचे अनुकरण करणारे लक्षावधी स्वयंसेवक यांनी हिंदू संघटनेसाठी समर्पित केलेली आयुष्ये म्हणजे बलिदाने नव्हेत का? पूजनीय श्रीगुरुजींनी तर या बलिदानांना हे फारच समयोचित रूप दिले. तिळतिळाने समर्पित होत आजीवन प्रचारक होणे व्यावहारिकदृष्ट्याही फार अवघड आहे, हे लक्षात घेऊन श्रीगुरुजींनी १९४२ साली कालबद्ध प्रचारक योजना सुरू केली. शिक्षण पूर्ण झाल्यावर, नोकरी-व्यवसायाला लागून संसारात पडण्यापूर्वी फक्त दोन वर्षे संघाचे पूर्णवेळ काम करावे, अशी ही काळानुरूप सोयीस्कर योजना होती. त्यामुळे असंख्य तरुणांच्या तरुणाईच्या जोम, जोश, उत्साह यांचा लाभ हिंदू संघटनाला मिळाला. हा त्याग नव्हे का? हे बलिदान नव्हे का? आणखी गंमत तर पुढेच आहे. अनेक पूर्णवेळ कार्यकर्ते


बलिदानाची नवी संकल्पना जगून दाखवणारे हिंदू समाज संघटक डॉ. हेडगेवार

पुढे संसाराला लागले, अनेक जण संसारी असताना संघ संपर्कात येऊन कार्यकर्ते बनले. अशा सगळ्या लोकांना संघाचे काम करण्याची अतीव इच्छा होती. मग ते नोकरीधंदा सांभाळून संघकार्य करू लागले. संघाच्या गेल्या शतकभराच्या कार्यकाळात असे हजारो कार्यकर्ते असतील की, जे सकाळी ७ वाजता घर सोडायचे आणि रात्री १२ वाजता परतायचे. विनोदाने असे म्हटले जाते की, संघ कार्यकर्ते आपल्या छोट्या मुलांना उंचीने वाढताना अंथरुणातच परततात तेव्हाही मुले झोपलेलीच असतात.

आपल्या छोट्या मुलांशी बोबडे बोल बोलावते. त्यांना पाठीवर बसवून घोडा-घोडा खेळावे असे या बापांना कधीच वाटले नसेल का? मग ते वात्सल्यभाव निग्रहाने बाजूला ठेवून समाजासाठी वणवण करणे, हे बलिदान नाही का? आणि आपला नवरा या फुकटच्या लष्कराच्या भाकऱ्या भाजत गावभर हिंडत असताना, त्याचा संसार सांभाळणारी त्याचे घर, त्याची मुले वाढवणारी, त्याच्याबरोबर येणाऱ्या कार्यकर्त्या मित्रांना वाटेल त्या वेळेला पोटभर जेवू घालणारी त्याची बायको? तिचा त्याग हे बलिदान नव्हे? अशा अनुराधा हिंदू समाजात घरोघर आहेत म्हणून डॉ. निर्मलचे काम चालू आहे. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील

नेहमीप्रमाणे संजय कार्यालयातून थकून भागून निघाला. परंतु त्याने गेल्या अनेक वर्षांत लावलेली एक सवय फार छान होती. कार्यालयात असताना मनापासून काम करायचे. परंतु बाहेर पडताना मात्र कार्यालयाला जसे कुलूप लागते तसे कार्यालयातील कामांना आपल्या डोक्यातही कुलूपबंद करायचे आणि मग घराकडे निघायचे. कार्यालयातील कामांचा ताण, तेथील समस्या या साऱ्या गोष्टी तेथेच सोडून घराकडे जायचे. त्यामुळे थकलेला असला तरी संजय तसा फ्रेश असायचा.

कारमधे बसल्यावर मस्त त्याच्या खास म्युझिक कलेक्शनमधून काही सुंदर गाणी सुरू व्हायची व त्या गाण्यांसोबत तो देखील आणखी फ्रेश व्हायचा. घरी जाताना काय काय सरप्राईज न्यायचे आहे याचा विचार डोक्यात सुरू व्हायचा. कारण बायको व मुले वाट बघत असणार याची त्याला खात्री असायची आणि रोज काहीतरी छोटेसे का होईना परंतु घरी न्यायचे आणि आजचे सरप्राईज म्हणून आपल्या त्या गोष्टीमुळे घरच्यांचे उजळलेले चेहेरे बघणे त्याला फार आवडायचे.




कधी कधी तर लहान मुलांप्रमाणे डोळे वगैरे मिटायला लावून तो काही काही गोष्टी हातावर ठेवायचा. त्याचे म्हणणे होते, सरप्राईज ही देवाने माणसाला दिलेली एक अफाट गोष्ट आहे. आपल्या आवडीच्या व्यक्तीच्या आवडीनिवडी लक्षात ठेवून तिच्या हातावर असे सरप्राईज ठेवल्यावर तिच्या डोळ्यात जो निखळ आनंद दिसतो ना ती खरी त्या वस्तूची किंमत असते आणि ती त्या वस्तूच्या बाजार मूल्यापेक्षा कितीतरी जास्त असते. घराकडे जाणारे शेवटचे वळण आले आणि सवयीप्रमाणे त्याने गाडी थांबविली. त्याचा हा नेहमीचाच शिरस्ता असल्याने दुकानदाराला माहीत होते. गाडीतून न उतरताच त्याने ती वस्तू गाडीत ठेवून घेतली. त्याचे पैसे देऊन तो घराकडे वळला. गाडीतून उतरतानाच त्याचे बायकोला हाका मारणे सुरू झाले होते. घरात गेला आणि बॅग वगैरे जागेवर ठेवण्याच्या नादात त्याची बायको त्याच्या समोर कधी येऊन उभी राहिली ते त्याला कळलेच नाही. त्याच्या उत्साही आवाजावरून आज आपल्याला काहीतरी सरप्राईज मिळणार आहे हे तिला लक्षात आले होते. डोळे मिटून हात पुढे करून ती त्याच्या समोर उभी राहिली. तिच्याकडे न बघताच त्याने त्याच्या हातातील पळसाच्या पानाच्या पुडीत बांधलेली ती गोष्ट तिच्या हातावर ठेवली.

आपल्या नवऱ्याने मोठ्या आवडीने आपल्या ओंजळीत काहीतरी ठेवले म्हणल्यावर तिने डोळे उघडले आणि बघते तर काय? टपोऱ्या मोगऱ्याचा बनलेला लांबसडक गजरा तिच्या हातात होता. तो तिने बघितला आणि तिच्या चेहऱ्याचा रंगच पालटून गेला. तिचा असा भकास चेहरा बघून घाईघाईने घरी येऊन सरप्राईज देण्याच्या नादात आपण मोठ्ठी चूक केली हे त्याच्याही लक्षात आले. आपल्या चुकीमुळे आपल्या बायकोला काय वाटले असेल या केवळ कल्पनेने तो नखशिखांत घाबरला. त्याच्या बायकोचे डोळे भरून आले. हाताच्या ओंजळीत असलेल्या गजऱ्याबद्दल तिला आनंद व्यक्त करता येत नव्हता आणि आपल्या नवऱ्याने एवढ्या प्रेमाने आणलेल्या गजऱ्याकडे तिला बघवत देखील नव्हते. अचानक तिच्या हातून तो गजरा खाली पडला. तिची स्थिती त्याच्या लक्षात आली.

सॉरी सॉरी म्हणत ओठ दातामध्ये दाबून तिने हुंदका धरून ठेवण्याचा असफल प्रयत्न केला. पटकन तिची ओंजळ आपल्या हाताने धरून तिला आधार देण्याकरिता तो तिच्या जवळ गेला. प्रेमाने झालेला आपल्या नवऱ्याचा स्पर्श तिला कळला व त्याच्या कुशीत शिरून ती ओक्साबोक्शी रडू लागली. तिचे रडणे सुरू असेपर्यंत तो काहीही बोलला नाही. केवळ प्रेमाने तिला थोपटत राहिला. जरा वेळाने ती शांत झाली व मग डोळे पुसत आपल्या नवऱ्याला म्हणाली, तुमचे सरप्राईज मी जपून ठेवीन परंतु सध्या मला त्याचा वापर करता येणार नाही. मला माफ करा. तिच्या समजूतदारपणाला मनोमन सलाम करीत आणि अशी सुस्वभावी व संवेदनशील पत्नी देवाने त्याच्या जीवनात त्याला प्राप्त करून दिली याबद्दल त्याने देवाचे मनोमन आभार मानले. नाही गं, काहीतरी काय? नाही तर नाही.

माझ्याच लक्षात आले नाही. मीच वेडा आहे. तुला उगाचच दुखावले. एकमेकांना अशा प्रकारे आधार देत त्या दोघांनीही त्या क्षणाला वाटलेले अतीव दुःख कमी करण्याचा प्रयत्न केला. पत्नीला प्रेमाने थोपटताना त्याला तिच्यासाठी मुंबईला घेतलेला तो गजरा त्याला आठवला. फार तीव्रतेने. मुंबईला जाताना दोघेही काहीच बोलत नव्हते. प्रवास सुरू होता परंतु मनामध्ये वादळे होती दोघांच्याही. हे असे कसे झाले? आपण तर कधीच कुणाचे काही वाईट केले नाही. कधी कुणाला फार दुखावले देखील नाही. उलट परिवाराची सारी कर्तव्ये मनापासून पार पाडलीत. अनेक वेळा तर त्रास होत असतानाही तो कधी व्यक्त केला नाही व सारखे कुणासाठी तरी करतच राहिलो. परंतु तरी देखील असे का व्हावे? या एका प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करून देखील ते मिळत नव्हते. पण काही गोष्टी आपल्या हातात नसतात व त्यामुळे जे समोर आले आहे त्याला सामोरे जाणे हेच काय ते आपल्या हातात असते अशा एका स्वत:ला सम जावणाऱ्या स्थितीपर्यंत ते पोहोचले.

दुसऱ्या दिवशी ते सारे दिव्य सुरू होणार होते. काय काय बदल आता आपल्या आयुष्यात होतील याचा विचार त्या दोघांच्याही मनात सुरू होता. केवळ एकमेकांकडे बघूनही त्यांना तो कळत होता. म्हणूनच केवळ डोळ्यानीच सांगणे सुरू होते की, तू काळजी करू नकोस.. मी तुझ्या सोबत आहे. आणि आपण दोघे जर नेहमीप्रमाणे मजबुतीने सोबत असू ना तर मग हे दिव्य देखील लीलया पार होईल. काळजी करू नको.

मुंबईतील त्या प्रचंड मोठ्या इमारतीच्या पायऱ्या चढताना तिने अगदी सहजच त्याला म्हणले, अहो, मला एक गजरा घेऊन द्या ना! आज मस्त गजरा लावून घेते. माझा गजरा लावलेला एक फोटो काढा. नंतर कोण जाणे मला गजरा लावता येईल की नाही ते? चर् झाले त्याच्या मनात. परंतु तिचे मन राखण्यासाठी गजरा घेतला व तिच्या ओंजळीत ठेवताना दोघांच्याही डोळ्यात अश्रू होते. गजरा लावून ती त्याचा हात धरून मोठ्या हिमतीने त्या इमारतीच्या पायऱ्या चढू लागली होती. त्या इमारतीचे नाव होते. टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल.

आज परत त्याला त्या गजऱ्याची आठवण झाली. तिच्या ओंजळीत गजरा दिल्यावर जेव्हा तिच्याकडे त्याने बघितले तेव्हा डोक्याला रुमाल बांधलेला तिचा चेहरा बघितल्यावर तिला आपण फार जास्त वेदना दिल्या असे त्याला जाणवले. परंतु शांत झाल्यावर ती जे म्हणाली ना ते खरे सकारात्मक जीवनाचे स्वरूप आहे. ती म्हणाली, अहो, यात वाईट काय मानायचे? उलट तुम्ही अजाणतेपणी हा इतका सुंदर गजरा माझ्यासाठी आणलात हा तर एक सकारात्मक संकेत आहे.

आता लवकरच माझे केस पहिल्यासारखे लांबसडक आणि घनदाट होणार आहेत. काहीच महिन्यांचा प्रश्न आहे. मग तोवर तुम्ही मला सरप्राईज देण्याचे काथांबवता? तुम्ही जेव्हा गजरा सरप्राईज म्हणून माझ्या हातात देताना तेव्हा मी डोळे मिटले असले तरी देखील तुमचे सरप्राईज मला त्याच्या सुगंधावरून केव्हाच कळलेले असते. परंतु माझ्या ओंजळीत गजरा दिल्यावर मी जेव्हा कौतुकाने त्याकडे बघते तेव्हा माझ्या लकाकलेल्या डोळ्यांमधे दिसणारा आनंद बघण्यासाठी तुम्ही आतुर असता हे मला माहीत आहे.

(पान ६ वर)

---

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

कन्यादान- लाजाहोम-सप्तपदी हे तीन विधी झाल्यानंतर एक अतिशय हृद्य असा विधी सनातनी विवाह पद्धतीत अंतर्भूत करण्यात आलेला आहे. म्हणजे वधूच्या आईवडिलांनी कन्यादानाच्या माध्यमातून, तिच्या उर्वरित आयुष्यासाठी तिच्या आवडीच्या साथीदाराच्या रूपात एक आधार-प्रणाली म्हणजे सपोर्ट सिस्टिम देऊ केली. या सपोर्ट सिस्टिमची आजच्या भाषेतली व्याख्या आहे. 'अशी व्यक्ती किंवा लोकांचा गट जो तुम्हाला भावनिक, मानसिक आणि व्यावहारिक मदत देतो, तुमच्या चांगल्या- वाईट काळात तुमच्या पाठीशी उभा राहतो आणि तुम्हाला बळ देतो.' वर आणि त्याच्या कुटुंबीयांकडून नेमक्या याच भूमिकेची अपेक्षा असते. अर्थात ही प्रणाली पैशानं विकत घेता येत नाही. ती नाती जोडून निर्माण करावी लागते. नात्यांची ही श्रीमंती समाजव्यवस्थेच्या कापडाला एक गर्भरेशमी अस्तर देऊ करते. ते अधिक टिकावू आणि मुलायम कसे होईल यासाठी सगळे प्रयत्न असतात. समाजाची नवी पिढी सुदृढ, सुविद्य, सुज्ञ आणि सुसंस्कृत होते. अशा पिढीला सुप्रजा म्हणतात. तर, अशी सुप्रजा निर्माण करण्यासाठी ही दोघे एकत्र आलेली आहेत, याची साक्ष देण्यासाठी सगळा गोतावळा सहभागी झालेला असतो.



सनातनी विवाहातील अरुंधती-वसिष्ठ दर्शन विधी (छायाचित्र सौजन्य मानविता आणि विश्वक)

कन्यादानानंतर हे सहजीवन सुरू करून पहिल्यांदा वधू योजक अग्नीला लाह्या आणि तुपाची आहुती अर्पण करते. म्हणजे कोणतंही कार्य करण्यासाठी तिलाच पुढाकार घ्यायचा आहे. त्यानंतर ती दोघे एकमेकांच्या सोबतीनं सात पावलं चालून दोघांत मैत्रीचं नातं असेल अशी शपथ घेतात. हे सगळे विधी सूर्याच्या प्रकाशात व्हाव्यात अशी अपेक्षा असते. पण परकीयांच्या आक्रमणाची टांगती तलवार सतत डोक्यावर लटकत असल्यामुळे उत्तर भारतात विवाहाचे सगळे विधी रात्रीच्या अंधारात करण्यात येऊ लागले नंतर तीच परिपाठी झाली. हे तीन विधी सनातनी विवाहात अनिवार्य आहेत. त्या शिवाय आणखी एक विधी भारतभरात होणाऱ्या सर्वच सनातनी विवाह पद्धतीत करतात. तो म्हणजे अरुंधती-वसिष्ठ दर्शन! हा विधी करण्यामागची तीन कारणं आहेत.

पहिलं कारण म्हणजे भारतीय ज्ञान परंपरेत 'वैश्विक चिरंतनता' या गाभ्याला अनन्य साधारण महत्त्व देण्यात आलं आहे. म्हणूनच भारतीय विवाह वधू-वर दोघांच्या कुंडलीगुण मेळातून जुळवतात. या मागचं कारणदेखील अतिशय स्पष्ट आहे. सनातनी श्रद्धाळू पुनर्जन्म मानतात. त्यामुळेच विवाह-बंधन केवळ या एकाच जन्मापुरतं नसून जन्मजन्मांतरीचं असतं. त्याला या सगळ्या विश्वाचा आशीर्वाद असतो.

साहजिकच वर-वधूच्या आयुष्यातला सर्वोत्तम मुहूर्त शोधून त्याच मुहूर्तावर हा विवाह करण्याची प्रथा गेली अनेक सहस्रकं या भूमीत पाळली जाते. वधू ज्यावेळी वराच्या गळ्यात वरमाला घालते त्यावेळी म्हटला जाणारा मंत्र आहे.

**'तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव। विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेऽङ्घ्रियुगं स्मरामि।।**

(लक्ष्मीपती अर्थात श्रीविष्णूंचं (केवळ) स्मरण ज्या क्षणी कराल त्याच क्षणी सगळे ग्रह, तारे आणि चंद्राचं बळ, विद्या आणि दैवाचं बळ पाठीशी उभं राहतं.) म्हणजेच संपूर्ण विश्व आपापल्या सामर्थ्यासह येऊन आपल्याला मदत देऊ करतं. त्यामुळे या सगळ्या सोहळ्याची सांगता करताना आकाशांतील अरुंधती-वसिष्ठ या तारका युगुलाचं दर्शन करून ते वर्तुळ पूर्ण केलं जातं.

दुसरं महत्त्वाचं कारण असं की, जवळपास १४ हजार वर्षांपूर्वी (रामायण काल) होऊन गेलेली ही दंपती आदर्श म्हणून ओळखली जायची. त्यांचा एकमेकांशी आणि दोघे मिळून इतरांशी असणारा व्यवहार अतिशय सौहार्द्रपूर्ण आणि मायेची सावली धरणारा होता. सप्तर्षी या तारकासमूहातील जुळ्या ताऱ्यांना त्यांची नावं देण्यात आलेली आहेत. त्या जोडप्याशी आपली नाळ जोडलेली आहे, हे त्यातून अधोरेखित करायचं आहे.

तिसरं कारण आहे. पृथ्वीवरून दुर्बिणीशिवाय केवळ डोळ्यांनी दिसू शकणाऱ्या तारे-तारकांमध्ये हे जुळे तारे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सर्वसाधारणपणे जुळ्या ताऱ्यांपैकी एक तारा स्थिर असतो आणि दुसरा तारा त्याच्या भोवती फिरत असतो. ही एक खगोलीय घटना असून त्यात फक्त दोन ताऱ्यांत असलेलं अंतर फार फार तर बदलतं, अन्यथा ही यंत्रणा सर्वत्र सारखीच काम करते. पण अरुंधती- वसिष्ठ हे जुळे तारे मात्र या नियमाला अपवाद आहेत. हे दोन्ही तारे एकमेकांभोवती प्रदक्षिणा घालतात. हे वैशिष्ट्य आपल्या पूर्वजांना फक्त माहीतच नव्हतंतर या तथ्याचा वापर त्यांनी अतिशय योग्य प्रकारे करून घेतला आहे.

नवदाम्पत्यानं आपल्या संपूर्ण वैवाहिक जीवनात एकमेकांशी कसं वागावं याचा वस्तुपाठ म्हणून त्यांनी या एकमेकांभोवती फिरणाऱ्या दोन ताऱ्यांची निवड केली. एकानं ठोंब्यासारखं बसून राहायचं आणि दुसऱ्यानं त्याच्या भोवती फिर-फीर फिरायचं असं पती-पत्नीचं वागणं कधीच नसावं. तर, या वैशिष्ट्यपूर्ण जुळ्यांसारखा दोघांनीही एकमेकांभोवती पिंगा घालावा. एकूण आपण या अनंत विश्वाचाच एक भाग आहोत आणि या वैश्विक यंत्रणेनं हे नातं हेतुपुरस्सर योजलेलं आहे. ते कसोशीनं निभावणं हेच आपलं परम कर्तव्य आहे, याची जाणीव या विधीच्या माध्यमातून नवपरिणित जोडप्याला वैवाहिक जीवनाच्या सुरुवातीलाच करून देण्यात येते. हा सगळा विधी आणि त्यामागची कारणमीमांसा उमजल्यानंतर हा केवळ दोन शरीरांच्या गरजा भागवण्यासाठी केलेला करार किंवा तडजोड नाही हे स्पष्ट होतं. ज्याप्रमाणे शिवरूपी पुरुष आणि पार्वतीरूपी प्रकृती हे दोन परस्पर भिन्न तरीही एकमेकांना पूरक आणि पोषक असे दोन घटक एकत्र येऊन हा सृष्टीचा सारिपाटाचा खेळ मांडतात; त्याचप्रमाणे या नवविवाहितांनी आपल्या संसाराचा खेळ मांडावा. नवी पिढी जन्माला घालावी, त्यांचं योग्य ते लालनपालन करून एक सशक्त, समृद्ध आणि प्रगल्भ समाजाच्या निर्मितीसाठी हातभार लावावा यासाठी स्वीकारलेलं नातं आहे.यात घर हे गृहिणीचं म्हणजे पत्नीचं असतं आणि पतीनं गृहस्थ म्हणजे त्या घरात राहून, तिच्या सृजनात्मकतेला, विविधांगी गुणांना फुलवणारी, आधार देणारी प्रणाली म्हणून वावर करणं अपेक्षित आहे. राज्यसभा सदस्य म्हणून मिरवणाऱ्या ज्येष्ठेच्या बाष्कळ बडबडीकडे दुर्लक्ष करावं ते याचमुळे.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# ज्वालामुखीच्या राखेचा दीर्घ परिणाम



इथिओपियाच्या हेले गुब्बी ज्वालामुखीचा २४ नोव्हेंबर रोजी उद्रेक झाला. या उद्रेकामुळे राख आणि धुराचे लोट १४-१५ किलोमीटर उंचीवर पोहोचले. तिथून धुराचा हा लोट ताशी १००-१२० किलोमीटर वेगाने प्रवास करीत पश्चिमेकडील देश ओलांडून भारतात पोहोचला आणि नंतर चीनकडे वळला. ज्वालामुखीच्या या राखेच्या हालचालीमुळे अनेक देशांमध्ये हवाई सेवा विस्कळीत झाल्या आणि दिल्लीपर्यंत पोहोचल्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या समस्येबद्दल चिंता निर्माण झाली. या सर्वांसोबत चर्चेत असलेला आणखी एक मुद्दा म्हणजे जवळजवळ १२ हजार वर्षे निष्क्रिय राहिल्यानंतर या ज्वालामुखीचा का उद्रेक झाला. त्यामागील परिस्थितीचा शोध घेतला पाहिजे.

ज्वालामुखीचे दोन प्रकार आहेत. सक्रिय ज्वालामुखी आणि निष्क्रिय ज्वालामुखी. सक्रिय ज्वालामुखी नेहमीच काही तरी उत्सर्जित करत असतात, तर निष्क्रिय ज्वालामुखी शांत झाले आहेत. हेली गुब्बी एकेकाळी निष्क्रिय ज्वालामुखी होता; परंतु तो आता सक्रिय आहे. कोणत्याही सुप्त ज्वालामुखीचा जमिनीखालील दाब वाढला की उद्रेक होतो. त्यामुळे अचानक स्फोट होतो. पृथ्वीवरील 'टेक्टोनिक प्लेट्स'च्या हालचालीमुळेही उद्रेक होतात. कारण पृथ्वीवरील दाबामुळे प्लेट्समधील भेगांमधून बाहेर पडता येते. जास्त दाबामुळे खडक वितळताना मॅग्मा तयार होतो आणि हा मॅग्मा कुठे तरी कमकुवत पृष्ठभाग शोधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे सुप्त ज्वालामुखी जागृत होतात. हेली गुब्बीच्या उद्रेकामुळे राख आणि धूर उच्च उंचीवर पोहोचले आणि वाऱ्याने इतर देशांकडे वाहून नेले. यामुळे हवाई सेवांवर परिणाम झाला. कारण राखेचा ढग येमेन, ओमान, पाकिस्तान आणि भारताच्या काही भागांसह अनेक देशांमध्ये पसरला.

ज्वालामुखीच्या राखेचे कण महत्त्वाचे सेन्सर अडकवू शकतात, न्यूमेटिक्सला नुकसान पोहोचवू शकतात आणि कॉकपिटच्या विंडस्क्रीनवर धुके टाकू शकतात. सर्वात धोकादायक म्हणजे, ही राख विमानाच्या इंजिनच्या टर्बाईन ब्लेडला नुकसान पोहोचवू शकते. राखेमध्ये असलेल्या विषारी वायूंमुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. ही राख जेट इंजिनला आगदेखील लावू शकते. ज्वालामुखीची राख विमान उद्योगासाठी एक महत्त्वाचा धोका आहे; परंतु ही राख उंचावरून उडत असल्याने जमिनीवर राहणाऱ्या लोकांसाठी कोणतीही समस्या उद्‌भवली नाही. तथापि, तशी ती पडू लागल्यास समस्या निर्माण करू शकते. अशा परिस्थितीत, प्रदूषण पातळी लक्षणीयरीत्या वाढल्याने सामान्य लोकांना श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

या धुरात सल्फर डाय ऑक्साईड आणि कार्बन डाय ऑक्साईडसारखे वायूदेखील असतात. त्यामुळे इतर आरोग्य समस्या उद्‌भवू शकतात. हेली गुब्बी ज्वालामुखी १२ हजार वर्षांनंतर जागृत झाला. या ज्वालामुखीतून सध्या राख आणि धूर निघत आहे. त्यात लावा असण्याची शक्यता सूचित होते. उद्रेक झाला असल्याने खडकांचे द्रव रूप मॅग्मा लावाच्या स्वरूपात बाहेर येऊ शकते. लावाचा उद्रेक झाला, तरी स्थानिक रहिवाशांवरच परिणाम होऊ शकतो. कारण हा एक सुप्त ज्वालामुखी होता. त्यामुळे कोणत्याही मोठ्या परिणामांचा धोका कमी आहे.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ज्वालामुखीच्या राखेचा ढग इथिओपियाच्या लाल समुद्रातून येमेन, ओमान आणि अरबी समुद्रातून प्रवास करीत पश्चिम भारत आणि नंतर उत्तर भारतात पोहोचला. हा राखेचा ढग भारतातून चीनकडे सरकला. ज्वालामुखीची राख आकाशात सुमारे १४ किलोमीटरवर गेली. भारतीय हवामान विभागाने सांगितले की, राखेच्या या ढगामुळे कोणताही धोका नाही. तथापि, राखेचे ढग भारतात पोहोचल्यानंतर अनेक उड्डाणे वळवण्यात आली आणि काही रद्द करण्यात आली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने यापूर्वी अहवाल दिला होता की, राखेचे ढग गुजरात, दिल्ली-एनसीआर, राजस्थान, पंजाब आणि हरयाणा येथे सरकले. यामुळे विमान वाहतुकीमध्ये काही काळ व्यत्यय आला. त्यामुळे अधिकाऱ्यांनी विमान वाहतूक सुरक्षा सल्ला जारी केला. 'स्कायमेट वेदर'च्या मते, राखेमध्ये प्रामुख्याने सल्फर डाय ऑक्साईड आणि कमी ते मध्यम सांद्रतेमध्ये ज्वालामुखीची राख असते. ती आता ओमान-अरेबियन समुद्र प्रदेशातून उत्तर आणि मध्य भारताच्या मैदानी भागात पसरत आहे. त्याचा 'एक्यूआय' (हवेची गुणवत्ता) पातळीवर परिणाम होणार नाही; परंतु त्याचा नेपाळच्या टेकड्या, हिमालय आणि उत्तर प्रदेशच्या आसपासच्या तराई प्रदेशात सल्फर डाय ऑक्साईड पातळीवर परिणाम होईल. कारण काही पदार्थ टेकड्यांवर आदळतील आणि नंतर चीनमध्ये वाहून जातील.

मैदानी भागात राख पडण्याची शक्यता कमी असली, तरी पृष्ठभागावरील हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होणार नाही. इथिओपियामध्ये झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे स्थानिक परिसंस्थेवरच परिणाम झाला नाही, तर संपूर्ण भारतीय उपखंडातही परिणाम जाणवला. 'डीजीसीए'च्या इशाऱ्यानंतर काही विमान कंपन्यांनी उड्डाणे रद्द केली; परंतु हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, हा धोका केवळ हवाई प्रवासापुरता मर्यादित नाही, तर त्याचा पर्यावरणावर व्यापक परिणाम होतो. इथिओपिया भौगोलिक विविधतेसाठी तर पूर्व आफ्रिकन रिफ्ट व्हॅलीसाठी प्रसिद्ध, भूगर्भीय क्रियाकलापांचे केंद्र आहे.

इथिओपिया आणि भारत यांच्या मध्ये विशाल अरबी समुद्र आहे. हवामानशास्त्राच्या दृष्टीने, ट्रॉपोस्फिअर आणि स्ट्रॅटोस्फिअरमधील जोरदार वारे, विशेषतः जेट स्ट्रीम, कोणत्याही प्रदूषणाला एका खंडातून दुसऱ्या खंडात वाहून नेण्यास सक्षम आहेत. 'स्कायमेट वेदर'च्या मते, ज्वालामुखीतून निघालेली राख प्रथम पश्चिमेकडून गुजरातमध्ये दाखल झाली.

जामनगर, राजस्थान, वायव्य महाराष्ट्र, दिल्ली, हरयाणा आणि पंजाबकडे वेगाने पुढे गेल्यानंतर ती हिमालय आणि उत्तर प्रदेशांकडे सरकली. उद्रेकाचे ढिगारे स्ट्रॅटोस्फिअरमध्ये पोहोचत आहेत, जिथे जोरदार वारे ते पूर्वेकडे (भारताकडे) वाहून नेत आहेत. यातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे सल्फर डाय ऑक्साईडचे उत्सर्जन. ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर मोठ्या प्रमाणात राख, धूळ आणि वायू प्रामुख्याने सल्फर डाय ऑक्साईड वातावरणात प्रवेश करतात.

उपग्रह प्रतिमांनी अलिकडेच अरबी समुद्रावर सल्फर डाय ऑक्साईड ढगांची पुष्टी केली. हे ढग रासायनिक प्रतिक्रिया देतात, तेव्हा सल्फरिक आम्लाच्या सूक्ष्म कणांमध्ये रूपांतरित होतात. यामुळे ज्वालामुखीतील धुके तयार होते. ज्वालामुखीतून उत्सर्जित होणारे सल्फेट एरोसोल पीएम २.५ पातळी वाढवत आहेत. सल्फर डाय ऑक्साईडयुक्त राख दिल्लीएनसीआर, हरयाणा आणि उत्तर प्रदेशवरून जात असताना सेन्यार या चक्रीवादळाचा धोकादेखील होता. त्यामुळे पुढील काळात पाऊस पडण्याची शक्यता वाढली.

विशेषतः जैवविविधतेसाठी प्रसिद्ध असलेल्या सुंदरबन आणि पश्चिम घाटात असे परिणाम वाढतात. या घटनेचा भारतीय मान्सूनवरही परिणाम होऊ शकतो. त्याला 'एरोसोल डिमिंग' किंवा 'सोलर डिमिंग' असे म्हणतात. ज्वालामुखीची राख आणि सल्फेट एरोसोल सूर्यप्रकाशाचे अवकाशात परत परावर्तन करतात. यामुळे केवळ थंडी वाढत नाही, तर मान्सून कमकुवत होतो. भारतीय मान्सून जमीन आणि समुद्रातील तापमानातील फरकावर अवलंबून असतो.

एरोसोल भारतीय भूभाग थंड करत असल्यास अरबी समुद्रातून येणारे ओलसर वारे कमकुवत होऊ शकतात. याचा परिणाम खरीप पिकांवर आणि अन्न सुरक्षेवर होऊ शकतो. १९९१ मध्ये 'माऊंट पिनाटुबो'सारख्या मोठ्या ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे जागतिक तापमानात घट आणि पावसाच्या पद्धतींमध्ये बदल झाला. ज्वालामुखीच्या क्रियाकलापांमुळे निर्माण होणारे सूक्ष्म कण श्वसनमार्गाद्वारे फुफ्फुसांमध्ये प्रवेश करू शकतात. त्यामुळे दमा, ब्राँकायटिस आणि इतर श्वसन आजार वाढू शकतात. या पृष्ठभूमीवर भारत आणि हवामान खात्याने हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण करणे आवश्यक बनते. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहे.)



## आत्माचि अमर माना । गीता सार ।।

संत सज्जना भजावे । डोळा विठुस पाहावे ।।
भक्त पुंडलिक व्हावे । क्षणभर ।।१।।


भाव मनास जडावा । त्याचा विकार जळावा ।।
ज्ञाना-तुका साठवावा । अंतरात ।।२।।

जागा राहूनी संसारी । होय विरक्त अंतरी ।।
जैसा रमतो श्रीहरी । गोपी संगे ।।३।।

अहंकाराचे ना भय । व्यर्थ जन्म त्याचा जाय ।।
जन्म-मरणाचा होय । चाकर तो ।।४।।

आता ऐक माझ्या मना । देह जीर्ण वस्त्र जाना ।।
आत्माचि अमर माना । गीता सार ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८



## मातृत्व

बाळा तुझ्या येण्याने
कळली आईची महती
माझ्या ठायी असलेली
तिच्या हृदयातील प्रीती
तगमग माझ्या आईची तुझ्या
रडण्याने उमगली
माझ्या केसात फिरलेली बोटे तिची
ओथंबलेली
तुझा चेहरा मुलूल पाहून मला आठवलं
रात रात जागून तिनं माझं आजारपण काढलेलं
हसतोस जेव्हा तू खळखळून होतो तेव्हा जो परमानंद
स्मरते आज फिरूनी मला मम मातेचा तो आनंद
बाळा तुझ्या येण्याने मिळाले मला मातृत्व
या मातृत्वामुळेच उमगले मम मातेचे कर्तृत्व
बाळा तुझ्या येण्याने...

अपर्णा सोवळे

## पालवी : बाप संदर्भ

जेव्हा अंगणात जमा होणाऱ्या पानगळीच्या
कचऱ्यापासून सुटका करून घेण्यासाठी
ते बोलावतात, एखादा भाडोत्री कुऱ्हाडबाज
जो बेमुर्वतपणे चालवतो कुऱ्हाड,
आज्याने उभ्या केलेल्या हिरव्यागार सावलीवर..!
तेव्हा अंगणात नष्ट झालेली असते
बापलेकाच्या नात्यातली ओलसर पालवी..!

किरण डोंगरदिवे

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# तिचा जन्म... समजून घेताना

सृष्टिनिर्मितीचे रहस्य प्रत्येक माणसाला गूढ आकाशातून खुणावत असते. रात्रीच्या घननीळ आर्ततेत नभीचा चंद्र अंगणी उतरतो. विहिरीजवळच्या पिंपळपानांची ओलसर सळसळ ऐकू येते. दूर निरभ्र आकाशात गोष्टीवेल्हाळ चांदण्या दिसतात. त्या सांगत असतील का हे अगम्य रहस्य आपल्याला! कोणी, कशासाठी आणि कोणासाठी विश्वाचा हा अखंड पसारा मांडला आहे, त्यांना माहिती असेल का! ऋग्वेद काळापासून सृष्टिनिर्मितीची अद्‌भुत सूत्रे ऋषिमुनींनी सांगितली आहेत. नासदीय सूक्तात म्हटले आहे, जणू काळोखावरही काळोखानेच पांघरूण घातले होते.

चारही दिशांना पाणीच पाणी होते. '**अप्रकेतम् सलीलम् सर्वमा ईदम्**' येथे 'अप्रकेतम्' हा सुंदर शब्द वापरण्यात आला आहे. म्हणजे तेव्हा पाण्याशिवाय दुसरं काहीच डोळ्यांना दिसणारे नव्हते. पण अभौतिक पातळीवर मात्र सृष्टिनिर्मितीचे बीज काळोखात आणि काळोखाला वेढणाऱ्या पाण्यामध्ये रुजले होते. निर्मितीच्या या बीजाला 'आभु' म्हणतात. आभुच्या भोवती पोकळी होती. बीज अंकुरित गेले आणि या पोकळीच्या आवरणातून प्रकाशाचे पहिले किरण बाहेर पडले. आपल्या संस्कृतीत विष्णूच्या नाभीतून कमळ बाहेर पडलेले दाखवतात, ते याच विश्वनिर्मितीचे प्रतीक आहे. पृथ्वीला भेदून खालून वर गेलेला पैस किंवा ऊर्ध्वमूल असा अश्वत्थ वृक्ष ही तत्त्वेही विश्वनिर्मितीच्या संकल्पनेतून निर्माण झाली आहेत. पुरुषसूक्तामध्ये (ऋग्वेद १०.९०) एक वेगळे तत्त्व सांगितले आहे.

वैश्विक पुरुषापासून दुसरा पुरुष निर्माण झाला आणि त्यापासून सबंध विश्व निर्माण झाले. म्हणजे जो मूळ वैश्विक पुरुष आहे तो कर्ताकरविता आहे. त्यापासून निर्माण झालेला वैश्विक पुरुष सृष्टिनिर्मितीचे माध्यम आहे. त्याच्या माध्यमातून सबंध सृष्टीची निर्मिती झाली. ऋग्वेदातील हिरण्यगर्भ सूक्त (१०/१२१) नासदीय सूक्ताच्या फार जवळचे आहे. यात म्हटले आहे की, आरंभी चहूकडे पाणी होते आणि त्यातूनच सृष्टिगर्भ निर्माण झाला. सृष्टिसृजनाची चाहूल लागली. सूक्तदेवता प्रजापती म्हणजेच हिरण्यगर्भ आहे. हे हिरण्यगर्भ प्रजापती सृष्टीचे निर्माणकर्ते आहेत.

ऋग्वेदातील सृष्टिसृजनाचे तत्त्व म्हणजे अस्तित्वात आहे ते सत्, जे अस्तित्वातच नाही त्या असत् पासून उगम पावले आहे. ईश्वराने असत् पासून सत् निर्माण केले आहे. लोहार फुंकणीत हवा घालतो. प्रजापतीसुद्धा आपल्या फुंकणीने हवा घालतात आणि अनेक देव निर्माण होतात. अशा अनेक देवदेवता चहुबाजूंनी पसरलेल्या पाण्यामध्ये नृत्य करीत आहेत. त्यांच्या पायांच्या हालचालीमुळे एक मोठा धूलिकण आकाशी फेकला जातो. आकाशी फेकला गेलेला हा धूलिकण सूर्य आहे. या पद्धतीने ऋग्वेदातील ऋचांमध्ये वायुतत्त्व आणि सूर्यतत्त्वाचा समावेश केला गेला. पंचमहाभूतांनी बनलेल्या सृष्टीच्या आरंभीच्या या गोड ऋचा म्हणजे जल, आकाश, वायू, अग्नी, पृथ्वी या सर्व तत्त्वांचे कौतुकसोहळे आहेत. तैतरीय ब्राह्मणात सृष्टीच्या निर्मितीची गोष्ट वेगळी आहे. सगळीकडे पाणी होते. त्यामुळे ईश्वराला प्रश्न पडला की, या पाण्यामध्ये सृष्टी कशी निर्माण करायची?



तेवढ्यात त्याला एक कमळाचे पान पाण्यावर तरंगताना दिसले. त्याने अस्वलाचे रूप घेतले आणि खाली जाऊन दाताने ओलसर चिखल उकरला आणि वर घेऊन आला. त्या ओलसर चिखलाने त्याने कमळाचे पान लेपले. ओलसर चिखल पसरवल्यामुळे (अप्रथयत) त्या कमळाच्या पानाचे नाव 'पृथ्वी' पडले. अतिशय चमत्कारिक आणि अद्‌भुत वर्णने आपल्याला या अलौकिक सूक्तांमध्ये वाचायला मिळतात. शतपथ ब्राह्मणात उल्लेख आहे की, प्रजापतीने सर्वप्रथम माणसाला निर्माण केले. नंतर पाळीव प्राण्यांना, पक्ष्यांना आणि सगळ्यात शेवटी सापासारख्या सरपटणाऱ्या प्राण्यांना निर्माण केले. पण सर्वजण अन्नाअभावी मरून जाऊ लागले.

आता या सर्व प्राणी जगताला जगवायचे कसे? प्रजापतीला नामी उपाय सुचला. त्याने अमृत तयार करू शकणारे स्तन निर्माण केले आणि तेव्हापासून प्राणिजग अन्नाअभावी कधीच मेले नाही. तैतरीय ब्राह्मणात म्हटले आहे की, ईश्वराने निर्माण केलेले प्राणिमात्र सारखेच दिसायचे. त्यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नव्हते. त्यामुळे ईश्वर स्वतः प्रत्येक प्राणिमात्रामध्ये शिरला आणि वेगवेगळी रूपे धारण केली. उपनिषदांमध्येही म्हटले आहे की, जग हे विविध प्राणिमात्रांनी भरलेले आहे. 'नामरूपात्मकं जगत्' या तत्त्वाची सुरुवात तैतरेय ब्राह्मणापासून होते. छांदोग्य किंवा बृहदारण्यक उपनिषदांमध्ये सृष्टिनिर्मितीचे अनेक अद्‌भुत सोहळे आहेत. बृहदारण्यक उपनिषदेत म्हटलेलं आहे, आरंभकाळी सगळीकडे पाणी होते. त्या पाण्यातून 'सत्य' वर उमलून आले. सत्याने ब्रह्मन् निर्माण केले. ब्रह्मन्ने प्रजापतीला जन्म दिला. प्रजापतीने देवदेवतांना जन्म दिला. देवदेवतांचे आराध्य दैवत 'सत्य' हेच होते. छांदोग्य उपनिषदेत पाण्याआधी अग्नीची सृष्टीच्या आरंभकाळात निर्मिती झाल्याचे सांगितले आहे. अग्नीमधून पाण्याची निर्मिती झाली. पाण्यातून पृथ्वी जन्माला आली. बृहदारण्यक उपनिषदेमध्ये सृष्टीच्या निर्मितीची एक विलक्षण गोष्ट वाचायला मिळते. सृष्टीच्या आरंभी काहीच नव्हते. चराचरावर मृत्यूचे सावट होते. भुकेतली असहायता होती. मृत्यूने सृष्टीपासून विलग होण्याचे ठरवले. त्याचे अस्तित्व त्याने टिकवण्याचे ठरवले. त्यानंतर मृत्यू थोडासा हलू लागला. डुलू लागला. सृष्टीहून मोकळा होऊ लागला; आणि काय आश्चर्य! पाण्याचे झरे वाहू लागले. झऱ्यांपासून जडशीळ पृथ्वी निर्माण झाली. मृत्यूला आता उभारी आली. त्याने पृथ्वीवर कष्ट उपसणे सुरू केले आणि अग्नीची निर्मिती झाली.

छांदोग्य उपनिषदेत म्हटले आहे की, आरंभी कोणाचेच अस्तित्व नव्हते. जे होते ते निरभ्र निराकार होते. त्यानंतर अस्तित्वाचा प्रवास सुरू झाला. सुवर्ण अंडकोषाची निर्मिती झाली. वर्षभर ते अंडकोष तसेच होते. त्यानंतर त्याचे दोन भाग झाले. एक भाग सुवर्ण वर्णाचा तर दुसरा भाग रजत वर्णाचा होता. रजतवर्ण भागातील अंडकोष पृथ्वी झाला. सुवर्णवर्ण भागातील अंडकोष आकाश झाला आणि त्यातून सूर्याचा जन्म झाला. हिरण्यगर्भ किंवा सुवर्ण अंडकोषाची गोष्ट वारंवार पुराणांमध्ये येते. महाभारतातील आदिपर्वातसुद्धा म्हटले आहे की, जेव्हा सगळीकडे अंधार होता तेव्हा सुवर्ण अंडकोषातून सृष्टीच्या निर्मितीचे बीज बाहेर पडले. ब्रह्मन्, प्रजापती, त्याची सात मुले या अंडकोषातूनच बाहेर पडली.

बहुतेक सर्व पुराणांमध्ये सगळीकडे अंधार होता आणि पाणी होते अशीच वर्णने वाचायला मिळतात. पाणी हे प्रजोत्पादनाचे स्त्रीतत्त्व आहे. मत्स्यपुराण असो किंवा ब्रह्मपुराण; सर्व पुराणांमध्ये अंडकोषाचे तत्त्व वापरले आहे. प्रजापतीने सुवर्ण अंडकोषातून सृष्टी निर्माण केली, अशी वर्णने वाचायला मिळतात. मत्स्य पुराणामध्ये अंडकोष हजारो वर्षांनी वरून फुटले आणि आकाश निर्माण झाले. खालून जेव्हा फुटले तेव्हा पाताळ निर्माण झाले. त्यातून द्रव बाहेर पडले आणि त्याचे पर्वत तयार झाले. पण मत्स्यपुराणामध्ये अजून एक वेगळ्या धाटणीची गोष्ट आहे. विष्णू हंसरूपात या पाण्यात शिरला आणि त्याचे पंख फडफडवित त्याने अमर्याद जलात भोवरे निर्माण केले. एका भोवऱ्यात मरुत देवाचा जन्म झाला. मरुत देवाने पुन्हा एकदा पाणी ढवळून काढले. त्यानंतर अग्निदेवाचा जन्म झाला. अग्निदेवाने पाण्याला गिळंकृत केले. त्यामुळे एक पोकळी निर्माण झाली, ज्याला आपण अवकाश म्हणतो.

कूर्मपुराणात अंडकोषापेक्षा वेगळी घटना घडलेली आहे. ब्रह्माच्या श्वासांमधून दक्ष प्रजापतीचा जन्म झाला. मारीचि मुनींचा डोळ्यांमधून, अंगीरस ऋषींचा डोक्यातून, भृगुऋषींचा ब्रह्माच्या हृदयातून जन्म झाला. त्याच्या शरीराच्या सत्त्व भागातून दिवसाची निर्मिती झाली. रजत भागातून माणसाची निर्मिती झाली आणि तमस भागातून रात्रीची निर्मिती झाली. वराह पुराणातील गोष्ट यासाठी महत्त्वाची आहे की, पहिल्यांदाच स्त्रीतत्त्वामुळे सृष्टी निर्माण झाली, असे वर्णन या पुराणात आहे. सृष्टीच्या आरंभी नारायण एकटेच होते. त्यांनी विचार करायला सुरुवात केली आणि अ-भावाचा जन्म झाला. अ-भाव सूर्यासारखा तेजस्वी होता. अ-भाव दोन भागांमध्ये विभागला गेला. त्यातील एक भाग म्हणजे उमा होती. उमेने पृथ्वीला जन्म दिला. स्कंद पुराणानुसार सगळीकडे अंधाराचे साम्राज्य होते. एकटा पुरुष या अंधारात चाचपडत होता. तो ओंकार रूपात होता. शेवटी तोही कंटाळून गेला. त्याने गायत्रीला (वाच्) जन्म दिला. तिच्या समवेत त्याने सृष्टी निर्माण केली. पहिल्यांदाच येथे वाचेमुळे जग निर्माण झाले, असे सांगितले आहे.

वामनपुराणानुसार ब्रह्मा पाण्यात झोपले होते आणि पाण्याशी संपर्क आल्यामुळे भू, भुव आणि स्वाः या तिघांचा जन्म झाला. सुवर्ण अंडकोषही बाहेर पडला आणि सृष्टीची निर्मिती झाली. लिंग पुराणानुसार अर्थातच महेश्वर शिवामुळे सृष्टीची निर्मिती झाली. त्याच्या बीजातून बाहेर पडलेला अंडकोष हजारो वर्षे पाण्यात राहिला. नंतर वरच्या भागाचा स्वर्ग बनला आणि खालच्या भागातून पृथ्वीचे निर्माण झाले. या सर्व घटनांमधून सृष्टिनिर्मितीचा समान धागा आपल्याला बघायला मिळतो. सुवर्ण अंडकोषामधून सृष्टी निर्माण झाली. हा सुवर्ण अंडकोष म्हणजे सूर्य असावा असे वाटते. पण सूर्याचे कधी दोन भाग होत नाहीत. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी वर्णन केलेला सुवर्ण अंडकोष म्हणजे ऋषिमुनींच्या साधनेतून सातत्याने आलेली देदीप्यमान अनुभूती असावी असे वाटते. दुसरा समान धागा म्हणजे जलतत्त्व. सृष्टिनिर्माणाच्या अगोदर चहुकडे पाणीच पाणी होते आणि पाण्यातून सृष्टी निर्माण झाली. प्रजजनाचे स्त्रीतत्त्व हजारो वर्षांपासून आपल्या पूर्वजांनी स्वीकारले आहे. त्यामुळेच मातृशक्तीचा यथोचित गुणगौरव आपल्याला ऋग्वेदापासून पुराणांपर्यंत बघायला मिळतो.

सध्याच्या काळात यातील काही वर्णने काल्पनिक वाटतीलही; पण त्यातील पंचमहाभूतांचे सृजनतत्त्व आणि प्रत्येक कथेत करण्यात आलेला मातृशक्तीचा प्रतीकात्मक गौरव यामुळे आपल्या संस्कृतीच्या मूलतत्त्वाचा आरसा आपल्याला या प्राचीन ग्रंथांमधून निश्चितच बघायला मिळतो.

# धुक्याच्या वाटेवर ओथंबून थांबणारा पौष

ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६


थंडी

**मार्गशीर्ष महिन्यातल्या थंडीपेक्षा बोचरी होते, आळसवलेले दिवस आळस झटकून मोठे होण्याकडे वाटचाल करू लागतात. शेतामध्ये उभे असलेले पिके वाऱ्याने डोलत सौंदर्याची आणि संपन्नता आणि समृद्धी करत असतात. त्या पिकांच्या तालावर पौष महिना धुक्याची चादर किंचित किलकिली करत डोकावून पाहत असतो. त्यातून ओथंबलेला दवांचा खजिना बाभळीच्या काट्यापासून गवताच्या ओल्या पात्यावर आटोपशीरपणे आपले अस्तित्व सावरत बसलेला असतो. धुक्याच्या चादरीला छेदत सूर्याचे किरण दवांच्या भेटीसाठी पोहोचताच सूर्यामध्ये रूपांतर मोत्यात आणि हिऱ्यात करण्याची शक्ती आहे याची आपल्याला खात्री पटते.**

थंशेता- शेतातून तुरीच्या शेंगा, ज्वारी बाजरीची कणसे, क्वचित काही ठिकाणी फुलातून पांढऱ्याशुभ्र अस्तित्वासह डोकावणारी कपाशी यांचा साज सृष्टीने ल्यालेला असतो. ओला हिरवा हरभरा आणि गव्हाच्या ओंब्या अजूनही शेतात आपल्याला खुणावत असतात मात्र हक्काचे वावर नाही आणि हक्काची माणसंही नाहीत त्यामुळे आपुलकीचा हुरडा खाण्यातील लज्जत आपण गमावलेली आहे असे आवर्जून म्हणावे वाटते. कारण एकेकाळी गावात जेवढे घर असत, तेवढे शेताचे सातबारा असत, गावातील मास्तर सारखा एखादा दुसरा विना सातबारा असलेला कर्मचारी अजून गावात नांदत असला तरी त्याच्या हक्काचे असे अनेक लोक गावात नांदत असत त्यामुळे न मागता त्याच्याकडे हरभरा भुईमूग ज्वारी आणि गहू यांच्या ओंब्या आपसूक येत असत. त्या ओल्या पिकाला खरपूस भाजून नात्यातील ओलावा जपण्याची आणि तो आपुलकीच्या माणसाकडे हस्तांतरित करण्याची कला आता पुस्तकात शोधूनही सापडत नाही. पिवळ्या जर्द सूर्यफुलांना दिवसभर पहात राहिले तरी मन भरत नाही अशी परिस्थिती असते, त्यातून सकाळी पूर्वेकडे तर संध्याकाळी पश्चिमेकडे तोंड करून सूर्याकडे पाहून हसणारी ही फुले सातत्याने प्रकाशाच्या दिशेने पाहिले तरच आपल्या जीवनातील अंधार नष्ट होतो असे तर सांगत नसतील ना? की जिकडे समृद्धीचा उजेड आहे.

तिकडेच पाहण्याची माणसाची रीत त्यांनी आत्मसात केली असावी? असे अनेक प्रश्न या सूर्यफुलाच्या शेतात उभे असताना मला पडतात. आणि या सूर्यफुलांवर मध वेचण्यासाठी धडपड करणाऱ्या मधमाशा मात्र मला सातत्याने **जीवन चलने का नाम चलते रहो सुबह शाम** हे गाणे गुणगुणत कार्य करताना दिसतात.

पौष महिन्यात धुक्याच्या चादरीतून डोकावणाऱ्या सूर्याच्या साक्षीने थिजलेली पहाट जितकी रम्य असते तितकीच सूर्याच्या उन्हात सह निळ्याशार आभाळात उन्हातील गोडवा पांघरूण हसणारी निळीशार दुपारही तेवढीच प्रसन्न असते. तसे पुष्य ह्या नक्षत्रात असलेला चंद्र ह्या महिन्याचे नामकरण पौष असे करून ठेवणारा असला तरी सूर्याचे महत्व ह्या महिन्यात विलक्षण असे



असते. कधीकधी दिवसभर उन्हात बसूनही उन्हाची कुस सोडवत नाही असे दिवस हेमंत ऋतूतल्या पौष महिन्यातच अनुभवता येतात.पौष संध्याच्या आसमंतावर भगवा गुलाल उधळून सूर्य क्षितिजा आड जाण्यापूर्वी बऱ्यापैकी आकाशात रेंगाळत राहतो. कधी कधी तर एखादा मुजोर ढग त्याच्या केसरी पिवळसर रूपाला झाकून टाकतो आणि स्वतःच तो रुपेरी चंदेरी साज मिरवत क्षितिजाची शोभा वाढवतो अशावेळी मग रुसलेला सूर्य ढगाकडून परस्परच क्षितिजा आड निघून जातो.

दुसऱ्या दिवशी पुन्हा नव्या उमेदीने उगवताना हा रुसवा तो रात्रीच्या अंधारासोबत मागे ठेवून आलेला असतो. संध्येच्या क्षितीजापाशी भगव्या किरणात आकंठ बुडालेल्या वृक्षांच्या काळ्या सावल्यात परावर्तित करून पौष संध्या आणखी आकर्षक झालेली असते. अस्तकाली आकर्षक रूपात नष्ट झाल्यावर त्याचे पडसाद रात्रीच्या अंधारात शोधत संपूर्ण चराचर नीजेच्या आधनी होते आणि रक्त गोठवणारा गारवा अंगावर घेत राहते. जीवन सृष्टीचे चक्र हिवाळ्यात गोठून थांबले की काय? अशी शंका यावी इतक्या नीरव शांततेत अंधार येतो आणि निघून जातो. साधारणपणे पौष चांदणही आळसावलेल्या आणि थिजलेल्या डोळ्यांनी लुकलुकत असतात या मंद चांदण्यात शुक्र मात्र तेजस्वी हिऱ्यासारखा आकाशाच्या विस्तीर्ण अंगणात पडलेला दिसून येतो. चंद्रही आकाशाच्या मैदानात धावपळ करत असतो पौषातल्या पौर्णिमेला शाकंभरी पौर्णिमा आणि भोगी पौर्णिमा असेही म्हटले जाते.

जगाला दुष्काळापासून वाचवणाऱ्या शाकंभरी देवीच्या स्मरणासाठी हा दिवस महत्त्वाचा असला तरी कधी काळी पावसाळ्यात लाभलेली झाडे पौष महिन्यापर्यंत आकारास आलेली असायची ती झाडे वाढीस लागली की दुष्काळाचा राक्षस आपोआप होत असे आज मात्र सर्रास झाडांची कत्तल करत असताना दुष्काळाचा राक्षस मोठा होण्यासाठी आपणच पुढाकार घेत आहोत याचे आपल्याला भान नसते. जुन्या आणि दुर्लक्षित वस्तू टाकून देत या पौर्णिमेला नव्याची आस धरून जून्याचा सोस नाकारण्याची रीत भोगी या नावाने ओळखली जाते. भोगी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी दिवस वर येताना अंधारातून, गारव्यातून, स्वप्नातून, नीजेतून एक एक गोष्ट आकार घेत पुन्हा आपल्या जागे होती तशी स्तब्ध असल्याचे दिसून येते. मात्र ह्या नव्याच्या हव्यासाने सूर्यानेही आपली प्रवासाची दिशा बदलल्याचे आपल्या लक्षात येते.

सूर्याचे हे संक्रमण तीळ आणि गूळ ह्यांच्या मिश्रणातून तयार झालेल्या गोडव्याद्वारे माणसा माणसापर्यंत साजरे केले जाते. शेतातील तीळ धुवून त्यात गुऱ्हाळावरून आणलेला ताजा गुळ घालून एकमेकांना देण्यात जो नैसर्गिक गोडवा होता तोही आता यांत्रिक काळात रेडीमेड तीळगूळ मिळत असल्याने नामशेष होण्याकडे वाटचाल करत आहे. तसे तर तिळगुळाची पोळी, वडी किंवा लाडू परस्परांना भरवून गोड बोलण्याचे आवाहन करण्याचे दिवस कधीचे मागे पडू नका व्हाट्सअप आणि सामाजिक माध्यमांवर शुभेच्छाचा खच पाडून समोर आल्यावर एकमेकांची नजर टाळून घराचे आणि मनाची कवाडे बंद ठेवण्याची रीत आपण पाहत आहोत. तसे पानिपत या शब्दासंदर्भात इथून पुढे प्रत्येक नात्याचे होणारे पानिपत माणसाच्या मनावर आपले पडसाद उमटवत राहतील. संक्रांतीच्या माणसाच्या मनाचे पतंग आकाशात कितीही उंचावर भिरभिरत राहिले तरी आपला मांजा मजबूत आणि दुसऱ्याचा पतंग काढण्या इतका सक्षम असला पाहिजे अशी मानवातली स्पर्धात्मक भावना पाहिल्यावर अनेक पाखरे स्वतःच त्या मांज्यावर आपल्या माना घासून आत्महत्या करतात की काय? असा प्रश्न मला पडतो. एरवी पौष महिन्यात ही पाखरे एकमेकांना साद घालत सृजनाच्या नव्या गीताचे अविष्कार आसमंती पेरत असतात. झाडे निष्पर्ण होण्याची सुरुवात झालेली असते. झाडाखाली पानांचा खच जमा होतो, खाली जमा झालेल्या वाळलेल्या पानावर वरून पडणारी पाने टप टप असा आवाज करत आम्हीही आनंदाने मातीत मिळत आहोत हे सांगत असतात. पाहता पाहता अनेक झाडांना निष्पर्ण होऊन एकाकी उभे राहिलेले पाहिले की विनाकारण रस्त्याच्या कडेला एखाद्या शेकोटीकाठी बिडीचे झुरके मारत बसलेल्या एकाकी म्हाताऱ्याची आठवण येते. माणसाला पालवी फुटणे शक्य नसते मात्र झाड या एकाकीपणातून नव्या ताकतीने, नव्या पालवीने पुन्हा भरून येणार असते. पौषातल्या थंडीत घरावरून उडत जाणारा राघूंचा थवा, विजेच्या तारावर निळसर पांढऱ्या रंगात बसलेला आणि अचानक सूर मारून तुरीच्या शेतात दुडूदूडू धावणाऱ्या उंदराला किंवा खारुताईला पंजात उचलून नेणारा ससाणा हे सर्व काही थक्क करणारे असते. पौष महिन्यात आकाशात उंच उडणाऱ्या घारी जमिनीवर उतरून मेलेल्या जनावराचा फडाशा पाडताना माझ्या लहानपणी मी फार जवळून पाहिल्या आहेत. आता अचानक आकाशात चुकून भूलून एखादी घार उडताना दिसली की तिच्या एकाकीपणासोबत माणसाच्या एकाकीपणाचा समन्वय जोडावासा वाटतो.

गावागावातल्या जत्रा, यात्रा, उरूस उधाण आलेले असते. शेकोट्या उबवित जावयाला माया लावणारी आणि सुनेला छळणारी सासू शेकोटीत टाकायची. अस म्हणत परसातला काडीकचरा, झाडाखालची वाळलेली पाने एकत्र करून शेकोटी पेटवून अजूनही गप्पा काही खेड्यापाड्यातून रंगलेल्या दिसतात. लहानपणापासून शेकोटीत जाळल्या जाणाऱ्या कचऱ्याला सासूच का म्हणत असतील? सासरा किंवा नवरा का म्हटल्या जात नसावे? असा प्रश्न उभा राहिला की उगाच स्त्री पुरुष समानतेच्या काळात नकोशीचे हिव भरून येते. शहरातून शेकोटी दिसत नसली तरी बसक्या नाकाचे नेपाळी नाकावर टीच्चून स्वेटर आणि मफलरचा उबदार व्यवसाय मांडून बसलेले दिसतात. पौष वारा घेऊन येतो तो अंगावर काटे उभे करणाराच, मग तो रात्रीच्या अंधारात फिरू, सकाळच्या कोवळ्या उन्हात नाचो की दुपारच्या निवांत मधाळ उन्हाच्या साक्षीत येवो त्याच्या अंतरंगी गारवा असतो म्हणजे असतोच. या कडाक्याच्या थंडीत कधी सर्पगंध फुलते, कधी रात राणी हसते, बोरांचा गोडवा वाढतो, शबरीच्या अंतरंगी रामाला भेटण्याची ओढ लागते. फळांचा फुलांचा दरवळ प्राण्यांना पाखरांना मोहित करतो. सृजनाची अनावर ओढ त्यांना एकमेकांकडे आकर्षित करते. पावसात दुथडी भरून वाहणारी नदी झुळझुळ वाहत आचके देत पोटात असलेले पाणी पुढे पुढे नेण्याचा प्रयत्न करत असते. तिच्या निवांत पाण्यात लहान मोठ्या मासळ्या वळवळ करत असतात एखादा बगळा एक पाय वर घेऊन अचानक चोचीत आलेला मासा घेऊन उडताना दिसतो. (पान ६ वर)

# ‘रोजगार हमी’वर ‘राम’मुद्रा!



वेध

प्रतिनिधी

**पूर्वीच्या ‘मनरेगा’ योजनेत मजुरांना खड्डे खोदणे आणि नंतर ते पुन्हा भरून टाकणे यांसारखीच कामे द्यावी लागत होती. सध्या विरोधकांची अवस्था ही अशीच खड्डे खोदणाऱ्या मजुरांसारखी झालेली दिसते. फक्त विरोधक स्वतःसाठीच दिवसेंदिवस खड्डे खोदत आहेत. पर्यायी विकासनीतीच्या अभावी विरोधकांना आता कोणत्याही सरकारी निर्णयाचा विरोध करणे, इतकेच काम शिल्लक. त्यातून ‘जी राम जी’ या योजनेत रामाचे नाव आल्यामुळे तर रामद्रोही काँग्रेसचा खरा तिळपापड होणे स्वाभाविकच!**

‘जी राम जी’ या नव्या स्वरूपातील ‘मनरेगा’ रोजगार हमी योजनेवरून विरोधकांनी संसदेत जो गोंधळ घातला, ते पाहून ‘स्वामी’ या प्रसिद्ध कादंबरीतील एका प्रसंगाची आठवण येते. शनिवारवाड्यात राघोबादादांसाठी सोवळ्यात पाणी भरण्याचे काम करणारा एक पाणक्या होता. एकदा माधवराव वाड्यात येतात, तेव्हा त्यांच्या पगडीवरील शिरपेच थोडा कलला असल्याचे त्याला दिसते. तो ही बाब माधवराव पेशव्यांना सांगतो. तेव्हा माधवराव त्याला पुढील आठ दिवस रोजच्यापेक्षा कितीतरी अधिक कळशा पाणी भरण्याची शिक्षा सुनावतात. तो पाणक्या राघोबादादांकडे मदतीसाठी जातो, तेव्हा ते या निर्णयात बदल करण्यास नकार देतात. पेशव्यांचा शिरपेच कलला आहे की नाही, याची उठाठेव करण्याइतका मोकळा वेळ तुझ्याकडे आहे, हे पाहूनच माधवरावांनी तुला ही शिक्षा दिल्याचे ते सांगतात. देशातील विरोधकांची अवस्था सध्या या रिकामटेकड्या पाणक्यासारखी. त्यांना संसदेत गोंधळ घालण्यास कोणतेही निमित्त पुरते. कारण, त्यांच्याकडे सरकारविरोधात ठोस मुद्देच उरलेले नाहीत. त्यामुळे प्रत्येक सरकारी निर्णयाचा विरोध करायचा आणि संसदेत जमेल तेवढा गोंधळ घालायचा, इतकेच काम त्यांना उरले आहे. जनतेच्या प्रश्नाशी सोयरसुतक नसल्याने त्यांच्याकडे भरपूर रिकामा वेळ आहे.

सरकारला मात्र सामान्य लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी योजना तयार करण्याचे प्रयत्न या गोंधळातही सुरू ठेवावे लागतात. ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार मिळवून देणारी ‘मनरेगा’ ही महत्त्वाची आणि उपयुक्त योजना होती. पण, काँग्रेसच्या ढिल्या कारभारामुळे या योजनेचाही हेतू पूर्णक्षमतेने साध्य होऊ शकला नव्हता. शिवाय, त्यात भ्रष्टाचारही शिरला. या योजनेद्वारे ग्रामीण भागातील तरुण मजुरांना वर्षातील काही महिने तरी खात्रीचे उत्पन्न मिळावे, यासाठी तिचे स्वरूप बदलणे आवश्यक होते.

मोदी सरकारने या योजनेचा आढावा घेतला आणि त्यात काही महत्त्वाचे बदल केले. या बदललेल्या नियमांमुळे या योजनेतील मजुरांना पूर्वीच्या १०० दिवसांऐवजी आता १२५ दिवस खात्रीचे उत्पन्न मिळेल. शिवाय, तिच्या कामांची आखणी अशाप्रकारे केली आहे की कापणी, खुरपणी, मळणी वगैरे शेतीच्या आवश्यक कामांसाठी ग्रामीण भागात वेळेवर मजूर उपलब्ध होणे आता शक्य झाले आहे. नव्या योजनेत काम नसलेल्या दिवशी कामगारांना रोजंदारी भत्ताही दिला जाईल. या योजनेतून विकसित भारताला पूरक ठरतील अशा जलसुरक्षा, उपजीविकेशी निगडित संसाधने निर्माण करणे, पर्यावरणपूरक सुविधा उपलब्ध करणे यांसारखी अर्थपूर्ण कामे केली जातील. ‘विकसित भारता’च्या दृष्टिकोनाशी मेळ खाणारी ही कामे आहेत. याखेरीज इतरही अन्य बरेच लाभ आता मजुरांना मिळणार आहेत. पण, विरोधकांना यापैकी काहीही महत्त्वाचे वाटले नाही. नव्या स्वरूपातील या योजनेचे नाव बदलण्यात आले आणि पूर्वीच्या ‘मनरेगा’ऐवजी ती आता ‘व्हीबी- जी राम जी’ या छोटेखानी नावाने ओळखली जाईल. पूर्वीच्या योजनेच्या नावातील महात्मा गांधी यांचे नाव नव्या योजनेत गाळण्यात आले आहे. विरोधकांना संसदेत हंगामा करण्यासाठी इतके कारण पुरेसे होते. हे सरकार गांधीविरोधी आहे वगैरे अनेक आरोप करून विरोधकांनी यावरून संसदेत गोंधळ घातला.

मात्र, २००५ मध्ये लागू केलेल्या मूळ ‘मनरेगा’ योजनेला महात्मा गांधी यांचे नाव २००९ साली जोडण्यात आले होते, हे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नमूद करीत काँग्रेसचा दुटप्पीपणा उघड केला. याचाच अर्थ असा की, काँग्रेसलाही महात्मा गांधी यांच्या नावाचे तितकेसे महत्त्व वाटत नव्हते आणि नंतर केवळ राजकीय लाभासाठी त्यांनी ते नाव या योजनेशी जोडले होते. इतकेच नव्हे, तर काँग्रेस सरकारांनी आजवर लागू केलेल्या जवळपास सर्वच योजनांना गांधी-नेहरू यांची नावे दिल्याचे चौहान यांनी सांगितले. काँग्रेसचा सरकारी योजनांना नेहरू-गांधी घराण्याशी जोडण्याचा प्रयत्न किती मोठा होता, ते सांगताना शिवराज सिंह चौहान म्हणाले की, आजवरच्या काँग्रेस सरकारांनी राज्यांमध्ये लागू केलेल्या योजनांपैकी २५ योजनांना राजीव गांधी यांचे, तर २७ योजनांना इंदिरा गांधी यांचे नाव दिले आहे. ज्या शैक्षणिक संस्थांना राजीव, इंदिरा व जवाहरलाल नेहरू यांची नावे दिली आहेत, त्यांची संख्या अनुक्रमे ५५, २१ व २२ इतकी आहे. विरोधकांनी या विधेयकाच्या मसुद्याचे कागद फाडून आपल्या अंगावर भिरकावून म. गांधी यांच्या आदर्शांनाच हरताळ फासला आहे, हेही चौहान यांनी स्पष्टपणे सांगितले.

पण, या योजनेला काँग्रेसने इतका विरोध करण्याचे खरे कारण नव्या योजनेच्या नावात रामाचे नाव आले आहे, हे आहे. नव्या स्वरूपातील ‘मनरेगा’चे नवे पूर्ण नाव ‘विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार ॲण्ड आजीवन मिशन-ग्रामीण’ असे आहे. या नावाचे लघुरूप ‘जी राम जी’ असे होते. त्यात ‘राम’ शब्द आल्याने काँग्रेसच्या सदस्यांनी थयथयाट चालविला आहे. काँग्रेसला ‘राम’ या नावाची एलर्जी फार पूर्वापासूनच. राम मंदिराला विरोध, न्यायालयात राम-सीता या काल्पनिक व्यक्तिरेखा असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे, नंतर राम जन्मभूमीवर मंदिर उभारणीस विरोध, नंतर प्राणप्रतिष्ठेच्या विधीवर बहिष्कार, नंतर धर्मध्वजारोहणावर बहिष्कार यांसारख्या अनेक कृतींतून काँग्रेसने आपला रामविरोध उघड केला आहे. आता ग्रामीण भागात रोजगार मिळवून देणार्या योजनेवर रामनाम उमटल्याचा धक्का काँग्रेसला सहन होत नाहीये. विरोधकांकडे जनतेचे मुद्दे किती नाहीत, याचा अनुभव लोकांनी पूर्वीच घेतला आहे. नव्या संसद भवनावर अशोकस्तंभावरील चार सिंहांचा पुतळा बसविण्यात येणार होता. तेव्हा या सिंहांच्या मुद्रेवरील भाव जरा जास्तच आक्रमक आणि संतप्त आहेत, असा जावईशोध विरोधकांनी लावला आणि त्यावरूनच गोंधळ घातला होता. हे प्रकरण न्यायालयापर्यंत गेले होते. यावरून विरोधक हे किती रिकामटेकडे बनले होते, ते दिसून येते. आताही मुद्दा वेगळा असला, तरी रिकामपणीचा गोंधळ कायमच आहे.

कथा

रश्मी वाघमारे

# बंधाचे दिपस्तंभ...

गावाच्या कडेला एक शांत तळं होतं. त्या तळ्याकाठी संध्याकाळी रोज दोन सावल्या दिसायच्या विराज आणि सागर. बालपणापासून त्यांची मैत्री जणू दोन श्वासांची होती. एक थांबला तर दुसरा राहणारच नाही. विराजला संगीत आणि गाण्याची खूप आवड होती. तो नेहमीच त्यामध्ये, त्याने मनोमनी रंगविलेल्या स्वप्नात गुंतलेला असायचा. तळ्याच्या काठावर बसलेले असताना विराज नेहमी स्वप्नं रेखाटायचा आणि ती स्वप्न आपल्या जिवलग मित्राला तो सांगायचा, ‘‘सागर, तुला एक सांगू का, हे या तळ्यातील पाणी आहे ना ते गातंय. तुला जाणवतंय का? मला इथे आल्यानंतर निवांत बसल्यावर सदैव जाणवतं... आणि मित्रा, माझ्या मनातली गाणी या लाटांसारखी आहेत. मला ती गाणी जगाला ऐकवायची आहेत. मला माझं संगीत, माझी गायकी चौकटीत कोंडून नाही ठेवायची.’’ सागर नेहमी त्याच्या खांद्यावर हात ठेवून हसायचा आणि त्याला समजवायचा...



‘‘गाणं हे नदीसारखं प्रवाही असतं विराज. त्याला बांध घालता येत नाही. तुझा आवाज एक दिवस गावाच्या पलीकडे, शहराच्या पलीकडे, नव्हे तर जगात घुमेल. एक गोष्ट मात्र नेहमीकरिता लक्षात ठेव, स्वप्नांना धडपड लागते आणि धडपडीला आधार लागतो. तो तुझा आधार मी बनेन. तू फिकीर नको करू. मी आहे ना.’’ विराजची घरची परिस्थिती जेमतेमच. वडिलांचा पक्षाघाताने एक हात गेला होता. आई रोज दिवसभर शेतात राबायची, कष्ट करायची. त्यामुळे त्यांचा घरखर्च कसाबसा भागायचा.

गाणं शिकायचं म्हणजे शहरात जाऊन शिकावं लागेल. स्वतःला घडवायचं म्हणजे गाव सोडावं लागेल. हे विराजचं स्वप्न जणू घरट्याच्या कडेला उभ्या पाखरासारखं होतं; जे उडायला धडपडतं, पण पंखांना योग्य हवा लागत नाही. तो नेहमी ताच चिंतेत असायचा. एकदा ती दोघेही तळ्याकाठी बसलेले असताना विराज खचून म्हणाला, ‘‘सागर, माझ्या डोळ्यांत गाण्यांची, गायकीची स्वप्न आहेत; माझ्या हातांत मात्र कवडीही नाही. माझं हे स्वप्न मी कसं साकार करू यार? मला काहीच सुचत नाहीये.’’ सागर काही क्षण शांतच राहिला. मग शांत गंभीर स्वरात म्हणाला,

‘‘मित्रा, यशाच्या, स्वप्नांच्या भिंती कितीही उंच असोत, त्यांना तोडायला मैत्री हा हातोडा असतो. तू गाणं गाशील आणि तुझी स्वप्नेही पूर्ण होतील. फक्त हिंमत नको हरू, तू तुझ्या रियाजवर लक्ष दे... बाकीचे मी पाहीन.’’ दिवसामागून दिवस सरलेत. अखेर एक दिवस सागरने स्वतःच्या घरचं सोनं, आईची जपून ठेवलेली पेटी आणि थोडीशी शेती सगळं गहाण ठेवलं. जी काही जमापुंजी त्यातून मिळाली, ती सर्व त्याने विराजच्या स्वाधीन करून तो विराजला शहरात पाठविण्याची तयारी करू लागला. आणि एके दिवशी विराजचा शहरात जाण्याचा दिवस आला.‘विराज, तू काळजी नको करू. संगीत-गायन शिक? मी दर महिन्याला तुला पैसे पाठवीन. तू तुझ्या गायकीवर लक्ष दे.’’ विराज थरथरतच त्याला म्हणाला, ‘‘सागर, तू माझ्यासाठी स्वतःला जाळतोयस. हा त्याग मी कसा स्वीकारू मित्रा?’’ सागर हसत हसत म्हणाला,

‘‘मैत्री हा दिवा आहे विराज. दिवा स्वतः जळतो, पण समोरचा अंधार नष्ट करतो. तू तर माझ्या मैत्रीचा प्रकाश आहेस. जा... उंच भरारी घे, संपूर्ण अवकाश सामावून घे.’’

शहरात आल्यावर ते शहर विराजला वेगळंच विश्व वाटलं. गर्दी, टाळ्या, प्रकाशझोत. सुरुवातीला त्याला अवघडल्यासारखे झाले, पण हळूहळू तो त्या शहरीय वातावरणात रमायला लागला. त्याचं गाणं सुरू केलं अन् लवकरच लोकांच्या मनावर राज्यही करू लागला...

‘‘हा तर सुरांचा राजा आहे...!’’ असंही लोक म्हणू लागले. आरशात स्वतःकडे पाहत तो एके रात्री पुटपुटला, ‘‘मी आता त्या छोट्या गावचा विराज नाही तर या भव्य आसमंतातील चमकणारा तारा आहे!’’ आणि बस्स! इथूनच पुढे तो बदलत गेला प्रसिद्धीच्या झगमगाटात. पण, प्रसिद्धीच्या प्रकाशामागे मोहाचे सावट दडलेलं असतंच. कीर्ती, पैसा, रंगीत मुखवटे लावलेले चेहरे सगळं विराजभोवती जमा होऊ लागलं. त्याला कधी कधी सागरची आठवण यायची खरी; तो विचार मात्र या मोहाच्या गर्दीत हरवून जायचा. इकडे गावात मात्र सागरची अवस्था बिकट होत गेली. शेत गहाण ठेवलं होतं; ते विकलं गेलं.

घर उद्ध्वस्त झालं. गावातील लोक चिडून म्हणू लागले, ‘‘याने स्वतःचं आयुष्य झिजवलं आपल्या मित्रासाठी; पण तो प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचल्यावर याला विसरला!’’ सागर फक्त ऐकून हसून शांत व्हायचा. तो रोज सायंकाळी त्याच तळ्याकाठी नित्यनेमाने येऊन बसायचा आणि रात्री उशिरा घरी परतायचा. तळ्याकाठी बसून तो स्वतःशीच पुटपुटायचा, ‘‘विराज, तू विसरलास मला तरी मला माहिती आहे रे मित्रा, .मी तुझ्या प्रत्येक गाण्यात आहे.’’ त्याला खात्री होती. विराज एक ना एक दिवस गावात येईल आणि त्याला भेटेल. दोनेक वर्षांनी विराज गावात परतला. यशाने झळाळलेला; त्याच्या मनात एक पोकळी होती, मित्राला विसरण्याच्या पश्चात्तापाची. विराज गावात आल्या आल्या सागरला भेटायला गेला आणि त्याने सागराला पाहिलं. सागर थकलेला, कृश झालेला, पण डोळ्यांत अजूनही शांत हसू. विराज दबलेल्या आवाजात म्हणाला, ‘‘सागर, माझ्या सुरांनी जग उजळलं, पण मी तुला अंधारात टाकलं मित्रा. तुझ्या त्यागाच्या मंदिरात दिवा लावायलाही मी विसरलो.’’ त्याने सागरला मिठी मारली आणि ओक्साबोक्सी रडायला लागला. सागरने त्याला हळुवारपणे थोपटलं. त्याचे हात हातात धरले. डोळ्यांत पाणी, पण ओठांवर नेहमीचं हसू...

‘‘विराज, अरे प्रवाही नदी ही कधीच उपकार मोजत नसते. ती फक्त तहानलेल्याची तहान भागवते; आणि आपली मैत्री ही नदी आहे, आपण फक्त वाहायचं.’’ विराज पुन्हा परत निघून गेला. परतल्यावर काही दिवसांनी शहरात एक विराट कार्यक्रम आयोजित केला. त्या कार्यक्रमात विराजने त्याच्या गावातील सर्वांना आवर्जून बोलावले होते. त्यात सागरही होता.

हजारो लोक उपस्थित होते. विराज मंचावर आला, पण त्या दिवशी त्याचा आवाज जड झाला होता. तो माईकसमोर उभा राहून म्हणाला, ‘‘रसिकहो, आज मी गायक म्हणून नाही तर मित्र म्हणून गात आहे. हे गाणं माझं नाही; हे गाणं माझा जिवलग मित्र सागरचं आहे. मी फक्त त्याचा आवाज आहे.’’ सभागृहात बसलेला सागरचं सर्वांग थरथरलं. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचे मोती गळायला लागले. विराजनेगाणं सुरू केलं. प्रत्येक स्वर जणू दीपस्तंभासारखा अंधाराला फोडून काढत होता. त्या रात्री लोकांनी एका गायकाला दाद दिली खरी; पण खरी दंतकथा झाली ती सागर-विराजच्या मैत्रीची...

# चपळपण मनाचे मोडितां मोडवेना

संत
प्रकाश एदलाबादकर

करकरीत तिन्हीसांजेची वेळ झाली की, आजही मन सैरभैर होते. दिवस आणि रात्र यांचा तो संधिकाळ. काय राहिले आणि काय हरवले यांचा हिशोब करण्याची वेळ. का कुणास ठाऊक, 'आर्तता' हा मला या संधिकाळाचा स्थायीभाव वाटतो. गायीच्या हंबरात, एखाद्या वाट चुकलेल्या कोकराच्या डोळ्यात, गावाबाहेरच्या वर्दळ नसलेल्या मंदिरातील घंटानादात, देवासमोरच्या नंदादीपातल्या थरथरत्या ज्योतीत, तुळशी वृंदावनात खोचलेल्या उदबत्तीच्या गंधवर्तुळात आणि मुख्य म्हणजे आयुष्यभर अतिशय सोशिकतेने प्रपंच करूनही चेहऱ्यावरचे हास्य कधी न मावळलेल्या माझ्या आईच्या थरथरत्या हातात मला ही संध्याकाळ दिसते. आज ऐहिक संपन्नता अवश्य आहे; मन मात्र या अशा आर्त संध्याकाळच्या आठवणींत कधीकाळी गुंतून पडते. मी आठ-दहा वर्षांचा असेन. ज्या वाड्यात आमचे बिऱ्हाड होते त्याला लागूनच एक लहानसे मंदिर होते.



रामपंचायतनाचे मंदिर. आमच्या वाड्याचे मालक अण्णा, तिन्ही सांजेला देवळात दिवा लावीत. रामरक्षा आणि मारुतीस्तोत्र म्हणून झाले की, अण्णा काही क्षण डोळे मिटून ध्यानस्थ बसत. काही वेळाने आपल्याच तंद्रीत असल्यासारखे उभे राहत. थरथरता देह, जोडलेल्या हातांना सुटलेला कंप आणि डोळ्यातून वाहणारे अश्रू सांभाळत सुरू होई, अण्णांचे करुणाष्टकांचे आवर्तन...

'अनुदिन अनुतापें तापलो रामराया ।
परमदिन दयाळा नीरसी मोहमाया ।।
अचपळ मन माझे नावरे आवरीता ।
तुजविण शिण होतो धाव रे धाव आता ।।
चपळपण मनाचे मोडितां मोडवेना ।
सकळ स्वजनमाया तोडिता तोडवेना ।।
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरीचा ।
म्हणवुनि करुणा हे बोलतो दीनवाचा ।।'

अण्णा करुणाष्टके म्हणत असताना त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बघून माझ्या पोटात कालवाकालव होई, ती का होतसे हे कळत नसे. कळण्याचे ते वयही नव्हते. आज आपल्या उत्तरायणात ५०-५५ वर्षांपूर्वीचा, धूसर संधिप्रकाश आणि देवळातल्या काळोखाला अधिकच गडद करणाऱ्या दिवटीचा उजेड या मिश्रणातील अण्णांचा चेहरा डोळ्यासमोर येतो. आणि माझ्याही मनात करुणाष्टकांची आवर्तने सुरू होतात.

मनाची चंचलता अजूनही जात नाही, प्रपंचाच्या पाशातून आपण अजूनही मुक्त होत नाही. कितीही विचार केला तरी आपल्या चंचल वृत्तीमुळे म्हणा किंवा परिस्थितीमुळे म्हणा, आपण संसाराच्या पाशातून मुक्त होत नाही. उलट जसजशी इथून निघण्याची वेळ जवळ येते, तसतसे आपण आणखी त्यात गुंतत जातो. या प्रपंचापासून म्हणजे केवळ संसारच नव्हे तर मोहात पडण्याच्या वृत्तीपासून वाचव, असे कळकळीने समर्थ रामरायाला विनवताहेत. समर्थांना मानवी विचारविश्वाचा एकूण आवाका पूर्णपणे ज्ञात होता. करुणाष्टकातील पहिल्याच श्लोकात त्यांनी मनाला 'अचपळ' असे यथार्थ विशेषण लावलेले आहे.

अचपळ म्हणजे अत्यंत अस्थिर. मनासारखे अस्थिर दुसरे काहीही नाही. प्रपंच आणि व्यवहार एवढेच काय, परमार्थातदेखील मनाचे हे अचपळ असणे अडचणीचे ठरते. करुणाष्टकातून समर्थांनी आपलेच नव्हे, साधनेच्या मार्गावरील प्रत्येकाचे मन मोकळे केले आहे. समर्थांनी मनाचे वर्णन 'अचपळ' या एकाच शब्दात अचूकपणे केलेले आहे. समर्थांना स्वतःलाच मनाचा शोध घेताना आणि त्याचे भ्रम-विभ्रम समजून घेताना बरेच मानसिक कष्ट पडलेले जाणवतात. समर्थांची करुणाष्टके आणि त्यांचे मनाचे श्लोक म्हणजे मराठी संत साहित्यातीलच नव्हे, तर एकूणच साहित्यातील सोन्याची खाण आहे. या दोन्ही रचनांमधून समर्थांनी मनाचा घेतलेला वेध म्हणजे अक्षर साहित्य आहे. करुणाष्टकातून त्यांनीही अत्यंत निरागस वृत्तीने रामाच्या चरणापाशी विसावा मागितला आहे. आयुष्यभर प्रपंचातील अडीअडचणींना तोंड देत, अनेकांची मने राखत आपण जगत असतो. आयुष्याच्या सायंकाळी या सर्वांचा थकवा जाणवतो. असे वाटते की, पुरे झाले आता! आता विश्रांती हवी. स्वतःच्याच मनात जरा डोकावून बघावे. दररोजच्या क्रियाकलापांपासून दूर जावे.

आपलेच आयुष्य आठवत सुखदुःखाची बेरीज-वजाबाकी करावी. अशा वेळी आठवतात ती करुणाष्टके! आयुष्याच्या या पडावावर एखादे अक्षय संचित हाती यावे, अशी जाणीव होते. यासाठी त्याची करुणा भाकायची!

'भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजन जनधनाचा व्यर्थ म्या स्वार्थ केला ।।
रघुपति मति माझी आपुलीसी करावी ।
सकळ त्यजूनि भावे कास तुझी धरावी ।।
विषयजनित सूखे सौख्य होणार नाही ।
तुजविण रघुनाथा वोखटे सर्वकाही ।।
रविकुळ टिळका रे हीत माझे करावे ।
दुरित दुरि हरावे सस्वरूपी भरावे ।।'

खरे तर करुणाष्टके आणि मनाचे श्लोक म्हणजे मानसतप आहेत. हे 'मानस-तप' जाणून घेतले तर पुढे 'मनस्ताप' होत नाही.

'मनःप्रसादः सौम्यत्वम मौनमात्म विनिग्रहः ।
भाव संशुद्धिरित्येतत तपो मानसमुच्यते।'

या १७ व्या अध्यायातील श्लोकावर विवेचन करताना ज्ञानदेवांनी सांगितले-

'म्हणौनि तिये मानसी ।
भावशुध्दीचि असे अपैसी ।
रोमशुची जैसी । तळहातासी ।।
काय बहु बोलो अर्जुना । जै हे दशा ये मना ।
तैं मनस्तपोभिधाना पात्र होय ती ।।'

आपल्या तळहातावर केस नसतात. ही रोमशुचि तळहातावर नैसर्गिकच असते तसेच मनातही स्वभावतःच भावशुद्धी असते. ही भावशुद्धीची स्थिती मनाला जेव्हा प्राप्त होते, त्याला मानसतप म्हणतात. समर्थांची सगळी तळमळ जी, करुणाष्टकातून व्यक्त झालेली दिसते ती या भावशुद्धीसाठी! मुळात आपले मन कसे आहे हे आपल्यालाच शेवटपर्यंत धडपणे उमजत नाही. मन म्हणजे नेमके काय याचा थांग लागत नाही. परिसर, कुटुंब, आप्तवर्ग, मित्रमंडळ, समाज यांचे आलेले अनुभव आणि त्यातून घडलेले संस्कार याने मनाची जडणघडण होते.

माझ्यासाठी माझे मन म्हणजे माझ्यातल्या अस्तित्व प्रत्ययाची जाणीव आणि तुमच्यासाठी माझ्या बाह्यवर्तनाचा प्रत्यय! आपले मन असे जे पश्चात्तापाने जळते ते त्याचे जळणे आजचे नाही. हे दुःख जन्मजन्मांतरीचे आहे. आपले मन, हे दुःख अनेक जन्मांपासून भोगत आलेले आहे.

'जळत हृदय माझे जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरी करुणेचा राघवा पूर लोटी ।।
तळमळ निववी रे रामकारुण्यसिंधू ।
षड्रिपूकुळ माझे तोड यांचा समंधू ।।
पुनरपि जननं पुनरपि मरणम पुनरपि जननि जठरे शयनं ।
इह संसारे खलु दुःसारे पाहि मुरारे पाहि मुरारे ।।'

अशी कळकळीची हाक प्रत्यक्ष शंकराचार्यांनी देवाला घातली आहे. वस्तुतः समर्थ हे प्रयत्नवादाचे पुरस्कर्ते. प्रपंचातील ज्या यातना संतांना जाणवतात त्या यातना प्रापंचिकाला समजत नाहीत आणि संसारी माणसाला ज्या वेदना भोगाव्या लागतात ते दुःख काही अपवाद सोडले तर संतांच्या लेखी अस्तित्वात नसते. पण प्रपंच मिथ्या असला, तरी त्यातील दुःखे मिथ्या असत नाहीत, हे समर्थांनी जाणले होते. त्याविषयीची करुणा त्यांच्या मनात होती. तत्कालीन सामाजिक संकटे आणि दुःखे यांचीही त्यांना कल्पना होती.

अशा दुःखांवर 'प्रारब्ध' किंवा 'पूर्वजन्मीचे फळ' असा विचार त्यांनी केलेला नाही ते उपेक्षणीय न मानता त्याबद्दलची जी करुणा मनात बाळगली ती पारमार्थिक पातळीवरची नाही, ती शुद्ध ऐहिक पातळीवरची आहे. हाच समर्थांचा विशेष आहे म्हणून करुणाष्टके हा प्रापंचिक माणसाला आधार वाटतो. दररोज संध्याकाळी अतिशय आर्ततेने, रामाच्या गाभाऱ्यासमोर उभे राहून करुणाष्टके म्हणणारे अण्णा आजही डोळ्यासमोर येतात आणि त्यांची वाणी कानात रुंजी घालत राहते...

'स्वजनधनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतीविण आता चित्त कोठे न राहे ।।
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती...'



# भारतीयांचे प्राचीन राज्यशास्त्र

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

फार पूर्वी आपल्याकडे राज्यपद्धतीच नव्हती. भीष्म युधिष्ठिराला सांगतात, कोणे एके काळी न राज्यं न राजासीत्, न दण्डो न च दाण्डिकः धर्मेणैव स्वयमेव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम्। अर्थात पूर्वी कोणताही कायदा, नीती, नियम, राजा, राज्यव्यवस्था अस्तित्वात नसूनही सर्व लोक परस्पर सामंजस्य व सहकार्याने वागत असत. पण ही स्थिती फार दिवस टिकली नाही. मात्स्यन्याय म्हणजे मोठ्या मासळीने लहान मासळीला खाणे सुरू झाले. म्हणून विचारवंतांनी नीती, धर्म, अनुशासन यांची व्यवस्था केली आणि राज्यशास्त्र अस्तित्वात आले.

महाभारतात भीष्म आणि युधिष्ठिर यांच्यात नीतिधर्मावर नित्य चर्चा चालत. शांतिपर्वातील उल्लेखांप्रमाणे फार पूर्वी ब्रह्मदेवाने राज्यशास्त्रावर १ लक्ष अध्यायांचा एक ग्रंथ निर्माण केला. व्यावहारिक सोयीसाठी शंकरांनी त्याचा १०००० अध्यायांचा संक्षेप केला. पुढे त्याच्याही काही संक्षेप आवृत्या तयार होत अनुक्रमे बृहस्पतीने बार्हस्पतिशास्त्र, उशनसाचे औशनस हे ग्रंथ तयार केले. हीच ती प्रसिद्ध शुक्रनीती. या व्यतिरिक्त इंद्र, अश्वघोष, भरद्वाज, मनु, गौरशिरस यांच्याही संहिता आहेत. नुसते उलेखच नव्हे तर भीष्माचार्यांने यातील अनेक संदर्भच नावासहित उद्धृत केले. महाभारताची नवीनतम संहिता हीच इसवीसनपूर्व असल्याने वरील सर्व ग्रंथ हे त्याहूनही अधिक पुरातन आहेत. कणिक नावाचा एक कुटिल आणि सत्प्रवृत्त विदुर हे दोघे राजनीतिज्ञ धृतराष्ट्राचे सल्लागार होते. या दोघांच्याही नावे राजनीती आहेत.

कौटिल्याचे राज्यशास्त्र हेच त्या तुलनेत आधुनिक आहे. त्यातही वरील सर्व संदर्भ आहेत. यावरून आपल्याकडचे राज्यशास्त्र किती प्राचीन असेल याचा अंदाज करावा. वर उल्लेखित रचना या भरद्वाज वगैरे नावांवरून म्हणजे वेदकाळाइतक्या पुरातन होत्या. बृहस्पती हे देवगुरू आणि शुक्राचार्य राक्षसांचे गुरू यांच्याकडे धर्म आणि नीतीला अनुसरून राजाला राज्यकारभारात सल्ला देणे हे काम असे. म्हणून त्यांनीच या सर्व नीतिकल्पनांना सूत्रात बांधून राज्यशास्त्रावर आपापले विचार गठित केले. कौटिलीय अर्थशास्त्र म्हणजे या सर्व पुरातन संहितांचा अर्क. ब्रह्मदेवाच्या प्राचीनतम शास्त्राचे नाव दंडनीतिशास्त्र. त्यावरून राजधर्म किंवा राजनीती ही नावेही प्रचलित झाली. कौटिल्याने पूर्वमतांचा चिकित्सक बुद्धीने सूक्ष्म अभ्यास करून- मंथुनी नवनीता तैसे घे अनंता अशी आपली संहिता मांडली. कौटिल्याचे अर्थशास्त्र म्हणजेच राज्यशास्त्र असे म्हणण्याचे कारण अर्थप्राप्तीचा आधार पृथ्वी. तेव्हा तिचा सांभाळ, वृद्धी आणि रक्षण याविषयी ज्यात व्यवस्था सांगितली आहे ते राज्यशास्त्र. यात सर्वांचा इतका उत्कृष्ट परामर्श घेऊन संकलन केलेले आहे की त्याचे शास्त्र आजही देशोदेशीच्या कायदेपंडित आणि घटनाकारांना मार्गदर्शक ठरत आहे.

**सप्तप्रकृती राज्यः** नावे बदलली, काळानुरूप व्यवस्था बदलली पण राज्यव्यवस्थेचे प्रमुख घटक म्हणजे प्रकृती हे ७ च राहिले. आणि त्या म्हणजे स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश, दण्ड आणि मित्र.

**१) स्वामी :** हे सर्वोच्च पद. मात्र स्वामीला प्रजाजनांच्या वैयक्तिक हक्कांना अबाधित ठेवूनच त्यांचे पालन आणि रक्षण करण्याचे बंधन आहे. त्याने वृद्ध, अनुभवी, कुशल लोकांच्या मंत्रणेनुसारच कारभार करावा हे नैतिक बंधन होते. यातील नैतिक हा शब्द महत्त्वाचा. कारण त्याच्यापेक्षा कोणी श्रेष्ठ नाही. फार काय पण राजा हा प्रत्यक्ष विष्णूचा अवतार अशी श्रद्धा निर्माण झाली. भविष्यात जगन्नाथ पंडिताने या श्रद्धेचे जहाँगीर बादशहाला दिल्लीश्वरोवा जगदीश्वरोवा। असे म्हणून विकृतीकरण केले. राजा प्रकृति रंजनात्. त्याने वरील ६ प्रकृतींचे रंजन म्हणजे समन्वयाने प्रजेचा सांभाळ आणि कल्याण करावे. राजाहून श्रेष्ठ कोणी नाही हे खरे पण तरी-ही शास्त्रकारांनी काही शक्यतांचा विचार करून सूचना दिल्या आहेत.

**जाणता राजाः** भावी राजाचा शिक्षणक्रम कसा असावा याविषयी त्याच्या अभ्यासक्रमात वेदत्रयी, उपजीविकेची साधने म्हणून कृषी, पशुपालन आणि वाणिज्य असावे, युद्धकला, दण्ड आणि न्यायशास्त्र असावे, याने सांख्य, योग आणि लोकायत या दर्शनशास्त्रांचेही अध्ययन करावे, गीतेतील १२ व्या अध्यायाचा उल्लेख केलेला नसला तरी त्यात वर्णिलेले आदर्श त्याच्या ठायी असावेत ही अपेक्षा असे. असे केल्याने तो योग्य तऱ्हेने प्रजापालन करण्यास समर्थ होईल हा दृष्टिकोन होता. आणि इतके करूनही जर कधी तो पथभ्रष्ट, दुराचारी झालाच तर त्याला बाजूला सारावे असेही स्पष्ट सांगितले.

**स्वामिसंपतः** स्वामीच्या ठायी कोणते गुण असावे याची मोठी यादीच कौटिल्याने स्वामिसंपत नावाने सुचवली आहे. त्या गुणसंपदेचे वर्गीकरण अभिगामिक गुण, प्रज्ञागुण, उत्साहगुण असे तिहेरी आहे. अभिगामिक म्हणजे उत्तम कुळी जन्म, पराक्रम, धैर्य, न्याय आणि सत्यप्रियता, धर्मपालनात दक्ष, सर्वांशी नित्य संपर्क. प्रज्ञागुण म्हणजे शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारण इत्यादी आणि उत्साहगुणांत शौर्य, कौशल्य इ. समर्थांना हे सर्व गुण शिवरायांच्या ठायीआढळले आणि म्हणूनच श्रीमंत योगी या शब्दात त्यांचा गौरव केला. श्रीमंत योगी म्हणजे स्वामी पण कसा तर उपभोगशून्य. समर्थांच्या स्वप्नातील आनंदवनभुवन शिवशाही रूपात प्रत्यक्षात अवतरले.

**२) अमात्यः** स्वामीनंतर महत्त्वाचे पद म्हणजे अमात्य. अर्थात मंत्री. यांची संख्या एकाहून अधिक असावी कारण एकटा अमात्य स्वतःच राज्य बळकावेल याविषयी

सर्व जण सहमत असले तरी एकूण संख्या किती असावी याविषयी मतांतरे आहेत. कौटिल्याच्या मते दोन असतील तर आपापसातील स्पर्धेमुळे राज्याची हानी होईल.

फारच जास्त असेल तर कारभारातील गौप्यता कमी होईल. मनुस्मृतीने ८ असावेत असे सुचवले. महाभारतात ४ ब्राह्मण, ८ क्षत्रिय, २१ वैश्य, ३ शूद्र आणि १ सूत असे एकूण ३७ सांगितले. मात्र राजाने अंतिम निर्णय घेण्यापूर्वी यातील निवडक ८ जणांशीच गुप्त चर्चा करावी.

कौटिल्याच्या मते ही संख्या यापेक्षा कमी असावी. मंत्र्यानी विचारपूर्वक सुचवावे. सर्वांचे ऐकून घेतल्यावर काय करायचे त्याचा अंतिम अधिकार राजाचाच. त्यानेही विवेकाला स्मरून कार्य करावे.

**३) जनपद :** पूर्वीच अस्तित्वात असलेले विशिष्ट समुदायाच्या लोकांचे प्रदेश अधिग्रहण करून किंवा काही विशिष्ट योजनेकरिता निर्मनुष्य प्रदेशांवर मुद्दाम निर्माण केलेल्या वसाहतींची राज्यपद्धती. यासाठी काही विशेष सवलती दिल्या जात. यांची उपयुक्तता समाजासाठी कृषी, गोधन, दैनंदिन उपजीविकेची नवनवीन साधने निर्माण करणे आणि परकीय सत्तेपासून उपद्रव होईल तेव्हा राज्याला मदत करणे हे होते. यांचेही वर्णन सांगितले आहे. शहाजीराजांच्या सूचनेनुसार मातोश्री जिजाबाईंच्या मार्गदर्शनात दादोजी कोंडदेवांनी बेचिराख झालेल्या पुणे शहराचे याच पद्धतीने पुनर्वसन केले. राज्याच्या मुख्य राजधानीला या लहानलहान जनपदांचे फार महत्त्व होते. (पान ६ वर)

# (सहन)शीलं परमं भूषणम्

## सहनशीलतेतून तेज निर्माण करणारे जीवनमूल्य

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

परवा सहज जीवनगीता नावाचा एक लेख वाचनात आला. त्यात श्रीकृष्णाने अर्जुनाला महाभारतातील युद्धाच्या वेळेस एक फार सुंदर उपदेश केला. श्रीकृष्ण म्हणतो, अर्जुना, तू सहन करायला शिक. आयुष्यात तुला देह मिळाला आहे. या देहासकट काही दुःख भोगायला शिक. शील हे सगळ्यात उत्तम असतं. पण सगळ्यात मोठं शील म्हणजे सहनशील होणं. मला दुःख झालं, त्रास झाला, तरी, सगळे लोक असेच वागतात, असं म्हणू नको. हे तुझ्या कर्माचं फळ आहे. शांत रीतीनं, भव्य रीतीनं तुला देहाचं सोनं करायचं असेल, तर सहन करायला शिक.

हे वाचून मी आश्चर्यचकित झालो. सगळ्यात मोठं शील म्हणजे सहनशीलता असेल असं मला कधी वाटलं नव्हतं. इंग्रजीत शील या शब्दाला 'character' असा शब्द आहे. आपण मराठीत तो 'चारित्र्य' या अर्थीही वापरतो. 'चारित्र्य' ही संज्ञा तशी खूप व्यापक आहे. अनेक गोष्टींचा अंतर्भाव त्यात होतो. सचोटी, प्रामाणिकपणा, पारदर्शक व्यवहार आणि नातेसंबंध, निष्ठा आदी अनेक गोष्टी त्यात येतात. पण जेव्हा श्रीकृष्ण पार्थाला सांगतो की सगळ्यात मोठं शील म्हणजे सहनशील असणं, तेव्हा त्यात खूप काही अर्थ असला पाहिजे असं मला वाटायला लागलं. मग गीतेत या संदर्भातील एक श्लोक सापडला.

**श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात -**

**मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः।**
**आगमापायिनोऽ नित्यास्तांस्तितिक्षस्व भारत।।** (अध्याय २, श्लोक १४) हे कुंतीपुत्रा, इंद्रियांचे विषयांशी संयोग हे थंडी-उष्णता आणि सुख-दुःख देणारे आहेत. ते उत्पन्न होतात व नाहीसे होतात, म्हणून अनित्य आहेत. तेव्हा हे भारता (अर्जुना ), ते तू सहन कर. हीच तितिक्षा, हीच शीलता, हीच खऱ्या अर्थाने जीवन विजयाची पहिली पायरी आहे.



**शील म्हणजेच खरे भूषण-** हा विचार आपल्या भारतीय संस्कृतीचा मर्म आहे. त्यात माणूस किती विद्वान आहे, श्रीमंत आहे, कीर्तिवान आहे- हे महत्त्वाचं नाही; तर तो शीलवान आहे का? संयमी आहे का? सहनशील आहे का? हे अधिक महत्त्वाचं.

शील म्हणजे काय? शील म्हणजे केवळ शालीन वागणं नव्हे, तर अंतःकरणात स्थिर मूल्यांची निष्ठा, परिस्थिती विपरीत असतानाही मनाचं संतुलन टिकवणं, अपमान, अन्याय, वेदना यांना विवेकाने आणि संयमाने सामोरं जाणं. शीलवान माणूस बाह्य सौंदर्याने नव्हे, तर अंतर्यामीच्या सौंदर्याने ओळखला जातो. शील म्हणजेच चरित्र, आचार, संयम आणि सहनशीलता यांचं सुंदर संमीलन. शीलं परमं भूषणम् हे केवळ एक संस्कृत वाक्य नव्हे, तर जगण्याची दिशा दाखवणारा दीपस्तंभ आहे.

आजच्या धावपळीच्या, प्रतिक्रिया- प्रधान काळात सहन करणं ही गोष्ट दुर्बळपणाचं लक्षण मानली जाते. पण सहन करणारा दुबळा नसतो, तो अधिक सशक्त असतो. कारण त्याच्या मनात आत्मविश्वास असतो, आणि आचरणात संयम. पण आजच्या काळात सहनशीलता नावाचं हे तेजस्वी शीलच लुप्त होत चाललं आहे. तरुण पिढीजवळ सहनशीलता तर नावालाही उरलेली नाही. जरा काही मनाविरुद्ध घडले की लागलीच संताप, राग, द्वेष, चिड किंवा आत्महत्या ठरलेली.

मग ज्यांनी आपल्या आयुष्यात सहनशीलतेचं परमोच्च दर्शन घडवलं अशी उदाहरणं मला आठवायला लागली. या सहनशीलतेच्या जोरावरच ते आपल्या आयुष्यात मोठी कामगिरी करून दाखवू शकले. सहनशीलता म्हणजे दुर्बलता नव्हे. आलेल्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याचं ते एक जीवनमूल्य आहे असं मला वाटत. मला संत ज्ञानेश्वरांचं उदाहरण आठवलं.

ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताई या भावंडांचं संपूर्ण जीवन म्हणजे सहनशीलतेचा अखंड प्रवास! ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी विठ्ठलपंतांनी संन्यास स्वीकारल्यानंतर गुरुआज्ञेवरून गृहस्थाश्रम स्वीकारला. पण समाजाने या निरागस, निष्पाप भावंडाना त्यांचा काही एक दोष नसताना वाळीत टाकलं. त्यांचा अपरिमित छळ केला. पण तरीही समाजाप्रती त्यांच्या मनात प्रेम आणि करुणाच होती. ज्ञानेश्वरांनी तर अखिल विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले. ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांचं हे सहनशील असणं हे त्यांच्या ज्ञानाइतकंच तेजस्वी होतं.

मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम तर सहनशीलतेचा आदर्श! ते केवळ वीरपुरुष नव्हते तर शीलाचं साक्षात मूर्तिमंत रूप होते. कैकेयीच्या वचनामुळे १४ वर्षांचा वनवास पत्करताना त्यांनी कोणताही रोष व्यक्त केला नाही. पित्याच्या वचनाचा सन्मान करत ते हसतमुखाने अरण्यात गेले. सीतेवर समाजाने शंका घेतल्यावर, राजधर्म जपण्यासाठी त्यांनी वैयक्तिक दुःख गिळून सीतेला वनवासात पाठवलं. हा त्याग त्यांच्या शीलतेचा परमोच्च बिंदू ठरतो.

विभीषण रावणाचा भाऊ असूनही जेव्हा शरण येतो, तेव्हा राम म्हणतात - शरणागताचा मी त्याग करणार नाही. ही त्यांच्या सहनशीलतेतील करुणा आणि नीतिनिष्ठा दर्शवणारी गोष्ट आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचं जीवन हे तर शीलाचं आदर्श उदाहरण. त्याग, संयम आणि सहनशीलता यांचं दर्शन त्यांनी आपल्या जीवनात घडवलं. अहिल्याबाई होळकर यांचं जीवनही यापेक्षा वेगळं नाही.

ही तर भूतकाळातील उदाहरणं झाली पण अलीकडच्या काळात अनेक समाजसुधारकांना, देशभक्तांना प्रचंड छळाला सामोरे जावं लागलं आहे. स्वातंत्र्यासाठी म. गांधींनी प्रत्यक्ष न लढता इंग्रजांच्या धोरणांना विरोध करून त्यांचा छळ सहन केला. सत्याग्रहाचे त्यांचे अस्त्र म्हणजे सर्वोच्च सहनशीलतेचे उदाहरण. स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, राजगुरु, वासुदेव बळवंत फडके यांच्यासारखे महान देशभक्त इंग्रजांच्या छळाला धैर्याने सामोरे गेले. साने गुरुजींनी समाजाचा छळ, उपेक्षा, अपमान सहन केला पण 'श्यामची आई' सारखा करुणेची वर्षा करणारा अमृतग्रंथ जगाला दिला. म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांना तर समाजाच्या केवढ्या रोषाला सामोरे जावे लागले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाट्याला सुद्धा प्रचंड उपेक्षा आणि अपमान आला. पण ते विष त्यांनी धैर्याने पचवले. महर्षी कर्वे यांच्यासारख्या विधवांच्या पुनर्वसनासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारकाला समाजाने केवढा त्रास दिला. पण त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. अशी खूप उदाहरणे आहेत. लोकनिंदेचे, टीकेचे जहर या सगळ्यांनी पचवले पण समाजाला अमृतच दिले. म्हणूनच ही माणसे आभाळाएवढी उंच झाली, महान झाली. (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २१ डिसेंबर ते ते शनिवार, २७ डिसेंबर २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २१ डिसेंबर-** उत्तरायणारंभ, मकरायन रात्री ८.३२, (चंद्रदर्शन १९:१५), ऋतू प्रारंभ, वनवासी कल्याण आश्रम स्थापना दिन, रंगदाय स्वामी महाराज पुण्यतिथी आने (ता.जुन्नर) ✻ **सोमवार, २२ डिसेंबर-** अयन करिदिन, श्री नृसिंह सरस्वती जयंती कारंजा व निगवे, भारतीय पौष मासारंभ, पुण्यकाळ सूर्योदय ते सूर्यास्त ✻ **मंगळवार, २३ डिसेंबर-** किसान दिन, विनायक चतुर्थी, ज्ञानगिरीस्वामी पुण्यतिथी मिरज ✻ **बुधवार, २४ डिसेंबर-** राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन, साने गुरुजी जयंती, चितांबर दीक्षित पुण्यतिथी गोरले (होसुर), यल्लमादेवी यात्रा सावळज (ता. तासगाव), वासुदेव कुवळेकर महाराज पुण्यतिथी देवरूख ✻ **गुरुवार, २५ डिसेंबर-** ख्रिसमस (नाताळ), सांबस्वामी सलगर महाराज पुण्यतिथी कुर्डुवाडी, नारायणदास महाराज समाधी उत्सव कोटितीर्थ (करवीर), शांतादुर्ग जत्रा प्रारंभ ✻ **शुक्रवार, २६ डिसेंबर-** बांगर षष्ठी, मसोबादेव यात्रा प्रारंभ जवळा (ता.सांगोला), श्री तुकारामबाबा जोशी जयंती, त्रिंबक अण्णा महाराज पुण्यतिथी कंदर (ता. करमाळा) ✻ **शनिवार, २७ डिसेंबर-** श्री गुरु गोविंदसिंह जयंती, श्री खंडोबा यात्रा करंजे (ता. खानापूर), स्वामी स्वानंद गिरी पुण्यतिथी खेर्डी

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २२, २३, २४ डिसेंबर (१३ नंतर) ✻ **डोहाळ जेवण-** २३ डिसेंबर ✻ **बारसे-** २२, २३ डिसेंबर (१२ पर्यंत), २४ डिसेंबर (१३ नंतर), २५ डिसेंबर (१४ पर्यंत) ✻ **जावळ-** २५ डिसेंबर ✻ **गृहप्रवेश-** २२, २५ डिसेंबर

### मेष :- रागावर विजय मिळवा

राग विकत घेतला, तर ॲसिडिटी फुकट मिळते. मंगळाच्या मेष राशी व्यक्तींनी प्रथम रागावर विजय मिळवणे आवश्यक आहे. धनस्थ हर्षल बोलण्यात दोष निर्माण करतो. त्यामुळे या सप्तमात विचाराने‌च रहावे. रविवारची चंद्र- गुरु प्रतियुती प्राप्तीच्या संधी मिळवून देणारी आहे. अपेक्षित प्रगती साधता येईल. नव्या कामांना गती मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. २२, २५

### वृषभ:- विचाराने रहावे

ईर्षा विकत घेतली, तर डोकेदुखी फुकट मिळते. राशीतील हर्षल अष्टमातील रविचा मंगळाशी अंशात्मक षष्टकयोग होत आहे, त्यामुळे सामंजस्याने भूमिका ठेवावी. इर्षा वाढली की विनाकारण डोकेदुखी वाढेल. आर्थिक बाबतीत चिंता नको. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रतिकूलता संभवते. शुभ ता. २१, २५

### मिथुन:- नव्या संधी स्वीकारा

द्वेष विकत घेतला, तर मत्सर फुकट मिळतो. राशीतील गुरुची चंद्राशी होणारी प्रतियुती उत्साहवर्धक घटना घडविणार आहे. जो-तो आपल्या ठिकाणी योग्य आहे, कोणाचाच द्वेष स्वीकारू नका. द्वेष वाढत जाईल. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नियोजनपूर्वक वाटचाल करावी. नव्या संधी स्वीकारा. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. २३, २५

### कर्क:- नव्या कामांना गती

ताण- तणाव विकत घेतला तर रक्तदाब फुकट मिळतो. शुक्राच्या समवेत रवि, मंगळ असल्याने काम क्रोधादिपासून दूर रहावे. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या कामाला गती मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अनावश्यक खर्च टाळावा. प्रतिकूलतेवर मात कराल. द्विधा मनस्थिती टाळून वाटचाल करावी. अडचणी सुटत जातील. शुभ ता. २३, २५

### सिंह:- अडचणीतून मार्ग निघेल

आचरण हरवलं की, ग्रंथ अंधश्रद्धा वाटू लागतात. राशीत केतू, अष्टमात शनि त्यामुळे अविचारांना खतपाणी घालू नका. आपल्या विचाराने वाटचाल करावी. नव्या योजना सध्या लांबणीवर टाकाव्यात. आर्थिक अडचणीतून मार्ग निघत जाईल. घाईने कोणताही निर्णय घेऊ नका. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. सामंजस्याने रहावे. वाहन सौख्य लाभेल. शुभ ता. २२, २५

### कन्या:- धावपळ वाढवू नका

प्रत्येकाला आपले समजणे सोडून द्यावे, जास्त आनंदी रहाल. सुखस्थानी रवि, मंगळ शुक्रास आहे. त्यामुळे किरकोळ कारणांवरून मानसिक त्रास संभवतो. कर्मस्थ गुरु सर्व समस्यांवर मात करणार आहे. महत्त्वाचे निर्णय विचाराने घ्यावेत. स्थावर प्रश्न वाढवू नका. सामंजस्य ठेवावे. कलेत प्रगती घडेल. शुभ ता. २२, २५

### तुला:- सुसंधीचा स्वीकार करावा

बोलणे बिघडणे म्हणजे बुध्दी बिघडल्याचा पहिला संकेत आहे. धनस्थ बुध, केतू, राहूच्या केंद्रयोगात त्यामुळे आपल्या वाणीवर प्रभूत्व तो मिळवावे. उत्साहवर्धक घटना घडतील. भाग्यस्थ गुरु सर्व अडचणीतून मार्ग काढणार आहे. अपेक्षित संधी लाभतील. महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. सुसंधीचा स्वीकार करावा. प्रगतीची वाटचाल करू शकाल. शुभ ता. २५

### वृश्चिक:- समस्यांवर मात कराल

कुटुंब सोडवून स्वतःपेक्षा जास्त महत्त्व कोणाला देऊ नये. प्रॅक्टिकल जगायचं तरच निभाव लागतो. धनस्थ रवि, मंगळ शुक्रासमवेत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत विचाराने रहावे. यांत्रीक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अंगाच्या हुशारीने विविध समस्यांवर मात करू शकाल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. अडचणी सुटत जातील. शुभ ता. २२, २५

### धनु:- घाईने निर्णय नकोत

तरुणपणी स्वाभाविकतेने वागले तरच वृद्धापकाळी स्वाभाविकरतेने वागता येईल. राशीतील रवि, मंगळाचा आपल्या कार्यशीलवर प्रभाव पडणार आहे. घाईने निर्णय घेऊ नका. छोटी पणवती चालू आहे. वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक गुंतवणूक विचाराने करावी. नव्या योजना शक्यतो लांबणीवर टाकाव्यात. जामीन कोणास राहू नका. फसवणूक संभवते. शुभ ता. २२, २५

### मकर:- परिस्थितीवर मात

असक्तीव व आग्रह सुटला तर आपण सर्वांना हवेहवेसे वाटतो. व्ययात पाप ग्रह शुक्रासमवेत आहे. धन चिंता संभवते. प्रसंगी मार्गही निघत जाईल. दूरचे प्रवास संभवतात. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी. विलंबाने पण चांगल्या घटना घडतील. परिस्थितीवर मात करू शकाल. अनावश्यक खर्च टाळायला हवे. विचाराने रहावे. शुभ ता.२५


### कुंभ:- नव्या संधी लाभतील

कर्तेपणांची वृत्ती नाहीशी केली की मग मग दुःख बघावे लागत नाही. या सप्ताहात प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहील. नव्या कामाला गती मिळेल. चिकाटीने केलेली वाटचाल लाभप्रद ठरेल. यांत्रिक क्षेत्रात नव्या संधी लाभतील. आर्थिक बाबतीत चिंता नको. प्रशासन, वैद्यकीय, कला क्षेत्रात प्रगती घडेल. शुभ ता. २३, २५

### मीन:- रचनात्मक पाऊल

कोणता काळ कोणाच्या भाग्याने येतो, हे सांगता येत नाही म्हणून आपण कधी कष्टी होऊ नये. राशीत नेपच्यून समावेत शनि त्यामुळे पूर्वसंचिताने चांगली वाटचाल करू शकाल. नव्या कामाला गती मिळेल. कार्यक्षेत्रात रचनात्मक पाऊल पडेल. फारशी चिंता करू नका. नव्या योजना स्वीकारू शकाल. स्थावर बाबतीत शुभ काही घडेल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २१, २५

!! शुभ भवतु !!







## दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

सह्याद्रीगिरीचा विभाग विलसे, मांदार शृंगापरी। नामे सज्जन जो नृपे वसविला, श्री उर्वशीचे तीरी। साकेताधिपती कपी भगवती, हे देव ज्याचे शिरी । येथे जागृत रामदास विलसे, जो या जना उद्धरी।।' समर्थ रामदास स्वामींच्या वास्तव्याने पावन झालेल्या सज्जनगडाचे अनंत कवींनी वरील चार ओळीत अत्यंत समर्पक वर्णन केले आहे.

सज्जनगड समर्थभक्तांना, पर्यटकांना आणि दुर्गप्रेमींना अनामिक शांततेची अनुभूती देणारा किल्ला आहे. प्रतापगडाच्या पायथ्यापासून सह्याद्रीच्या पूर्वेकडे जाणाऱ्या शंभू महादेव उपरांगेला पुढे तीन फाटे फुटतात. त्यातील एका रांगेवर सज्जनगड वसलेला आहे. सातारा शहरापासून अवघ्या १२ कि.मी. अंतरावर असलेल्या सज्जनगडाची समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे ३३०० फूट आहे. सज्जनगड परळी गावाच्या जवळ असल्यामुळे याला 'परळीगड' असेही म्हणतात. सज्जनगडावर फार पूर्वी आश्वलायन ऋषींचे वास्तव्य होते. त्यामुळे पूर्वी हा किल्ला आश्वलायनगड या नावाने ओळखला जात असे. या किल्ल्याची निर्मिती ११ व्या शतकात शिलाहार भोज राजांनी केली.

सज्जनगडावर जायचे असल्यास सातारा ते परळी गाव अशी महाराष्ट्र परिवहन महामंडळाची बससेवा आहे तसेच आपण खाजगी वाहनानेसुद्धा गडाच्या पायथ्यापर्यंत जाऊ शकतो. पुढे श्री समर्थ सेवा मंडळाने बांधलेल्या ८०० पायऱ्या चढून तासाभरात आपण गडावर पोहोचतो. दुसरा रस्ता गजवाडी गावातून गडाच्या कातळ माथ्यापर्यंत जातो. येथून १०० पायऱ्या चढून आपला गडप्रवेश होतो. सज्जनगड हा शिवकालीन इतिहासातील महत्त्वाचा किल्ला आहे. समर्थांच्या वास्तव्याने सज्जनगडाला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सज्जनगड चढण्यास सुरुवात केली की, अर्ध्या पायऱ्या चढल्यावर कल्याणस्वामींचे मंदिर आहे. पुढे थोड्या अंतरावरमारुतीचे आणि गौतमीचे मंदिर आहे. किल्ल्याच्या दरवाज्यात श्रीधर स्वामींनी स्थापन केलेल्या मारुती आणि वराहाच्या मूर्ती आहेत. गडाच्या पहिल्या दरवाज्याला 'छत्रपती शिवाजी महाराज द्वार' आणि दुसऱ्या पूर्वाभिमुख दरवाज्याला 'समर्थ द्वार' म्हणतात. दुसऱ्या दरवाजातून आत गेल्यावर समोर एक शिलालेख दिसतो. गडावर प्रवेश करण्याआधी एक वाट उजवीकडे जाते तिथे रामघळ आहे, ही समर्थांची एकांतात बसण्याची जागा होती. गडप्रवेश झाल्यावर डावीकडे घोड्यांना पाणी पाजण्यासाठी बांधलेले घोडाळे तळे आहे. तळ्याच्या मागील बाजूस आंग्लाई देवीचे मंदिर आहे. समर्थांना अंगापूरच्या डोहात चाफळ येथे स्थापित केलेली श्रीरामाची मूर्ती आणि आंग्लाई देवीची मूर्ती सापडली होती. देवीच्या मंदिरासमोरील तटावरून अजिंक्यतारा किल्ला आणि रामघळ स्पष्ट दिसते. गडावर संस्थानाची धर्मशाळा आहे. खोल्या उपलब्ध असल्यास राहण्याची सोय होऊ शकते. धर्मशाळेसमोर सोनाळे तळे आहे. या तळ्यातील पाणी पिण्यास योग्य आहे. गडावर प्रसाद भोजनाची सोयही उत्तम आहे. मंदिराच्या आवारात पेठेतल्या मारुतीचे मंदिर तसेच श्रीधर कुटी आहे. उजवीकडे समर्थांचा मठ आणि शेजघर आहे. शेजघरात मेरुस्वामी यांनी समर्थांचे काढलेले चित्र, पलंग, समर्थांची कुबडी, गुप्ती, दंडा, सोटा, दोन मोठे तांब्याचे हंडे, पाणी पिण्याचा तांब्या, पानाचा डबा, वल्कले, प्रतापमारुतीची मूर्ती आहे. मठ पाहून झाला की, ब्रह्मपिसा मंदिर आणि धाब्याच्या मारुतीचे मंदिरात जाऊन यावे.

रामदासस्वामींचे आराध्य दैवत म्हणजे प्रभू श्रीराम! गडावर श्रीरामाचे देखणे मंदिर आहे. मंदिरातील श्रीराम, सीता, लक्ष्मण आणि हनुमान या मूर्ती समर्थांनी अंध कारागिराला दिव्यदृष्टी देऊन घडवून घेतल्या असे म्हणतात. जवळच समर्थांची धातूची मूर्ती आहे. मंदिराच्या सभामंडपात सिद्धिविनायक आणि हनुमानाची मूर्ती आहे. भुयारात समर्थांचे समाधिस्थान आहे, मंदिराबाहेर एका कोपऱ्यात मारुती आणि दुसरीकडे समर्थशिष्या वेणा हिचे वृंदावन तसेच मंदिरापुढे आक्काबाईचे वृंदावन आहे. दर्शन झाल्यावर गडफेरी पूर्ण करताना किल्ल्याच्या तटापर्यंत जावे. येथून सभोवतालचा परिसराचे नयनरम्य दृश्य दिसते. सज्जनगड अत्यंत देखणा आहे त्यामुळे गडावरील आपले वास्तव्य संपूच नये असे वाटते.

सज्जनगडावर मन रमते. तेथील वातावरणात समरस झालात तर एक वेगळीच अनुभूती येते. आम्ही नवरात्र उत्सवात, देवीच्या उपासना पर्वात गडावर गेलो होतो, त्यामुळे अधिकच उत्साही वातावरण होते. हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात प्रचंड उर्जेची आणि शक्तीची आवश्यकता होती, म्हणूनच शिवाजी महाराज समर्थ भेटीसाठी नेहमी सज्जनगडावर जात होते. महाराजांची समर्थचरणी असलेली श्रद्धा आणि समर्थांचा महाराजांवर असलेला विश्वास, शिवकालीन इतिहासातील अनेक प्रसंगातून अनुभवता येतो. सत्पुरुषांचे कार्य समाजातील सर्व लोकांसाठी असते. समर्थांनी आणि महाराजांनी आजन्म सामाजिक समरसतेची जाणीव ठेऊन राष्ट्रकार्य केले. समर्थ रामदासस्वामी भारतभ्रमणास गेले असताना, काशीयात्रा करून प्रभू श्रीरामचंद्रांच्या दर्शनाला अयोध्येत पोहोचले. त्यांचे वास्तव्य अयोध्येच्या मंदिरात होते. तेथे अचानक सुलतानी सैनिकांनी हल्ला केला. त्यावेळी दिल्लीचा सुलतान शहाजहान होता. सुलतानी दंगेखोरांनी धर्मांधळेपणाने मंदिरांची विटंबना केली. त्यांच्या मनात विचारांचे काहूर माजले. प्रभू श्रीरामचंद्राच्या जन्मभूमीत त्यांना जे दृश्य पाहावे लागले. त्यामुळे त्यांचे मन उद्विग्न झाले. पुढे समर्थांनी बलोपासना करण्यावर जास्त भर दिला. अकरा मारुतींची स्थापना करून त्यांनी बलोपासना केंद्रे सुरू केली. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मदत व्हावी या हेतूने त्यांनी आपल्या अनुयायांना संपूर्ण हिंदुस्थानात व्यायामासाठी आखाडे सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. 'शक्तीने मिळती राज्ये, युक्तीने यत्न होतसे' हे त्यांनी समाजाला पटवून दिले. त्यांनी १२ वर्षे देशाटन केले. देशातील हलाखीची परिस्थिती अनुभवली. मार्च १६७२ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या कार्याचे कौतुक करणारे पत्र समर्थांनी लिहिले. त्या ओळी अजरामर झाल्या.

'**निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।। अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंतयोगी ।।**'पुढे १६७६ मध्ये शिवाजी महाराजांनी समर्थांना महिपतगड आणि सज्जनगड या दोन किल्ल्यांपैकी त्यांना आवडेल त्या किल्ल्यावर राहण्याची विनंती केली. समर्थांनी सज्जनगडावर राहायचे ठरविले. छत्रपती शिवाजी महाराज अनेक वेळा समर्थ भेटीसाठी सज्जनगडावर येत आणि त्यांच्यांशी अनेक विषयावर चर्चा करीत. संभाजी राजांनाही शिवाजी महाराजांनी काही काळ समर्थसहवासात ठेवले होते. समर्थांनी १६७८ मध्ये स्थापन केलेला प्रतापगडावरील मारुतीहा समर्थ स्थापित शेवटचा मारुती आहे. त्यानंतर १६७९ मध्ये शिवाजी महाराज सज्जनगडावर काही काळ समर्थ सहवासात राहिले. १६८० मध्ये शिवाजी महाराजांनी रायगडावर अखेरचा श्वास घेतला हे ऐकून समर्थांनी अन्न सोडले. १६८२ मध्ये चंदावरहून आलेल्या राममूर्ती सज्जनगडावर आल्या. समर्थांनी स्वहस्ते त्यांची स्थापना आणि पूजा करून त्यांच्या अखेरच्या प्रवासाची तयारी सुरू केली. जानेवारी १६८२ मध्ये रामनामाचा घोष करून समर्थ रामरूपात विलीन झाले. ज्याठिकाणी श्री समर्थांचा अग्निसंस्कार झाला. त्या ठिकाणी संभाजी महाराजांनी राम मंदिर आणि तळघरात समाधी बांधली आहे. आपापल्या क्षेत्रात निपुण आणि दिग्गज व्यक्ती जेव्हा सत्कर्मासाठी एकत्र येतात तेव्हा शिवकालीन इतिहासासारखा प्रेरणादायी इतिहास लिहिला जातो. कर्म हीच ईश्वरपूजा असे मानणारे हे सत्पुरुष कुठल्या एका जातीचे नाहीत. समर्थांचे त्यांच्या शिष्यांना अखेरचे सांगणे होते,'**माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकरणी। परी मी आहे जगज्जीवनी। निरंतर।। आत्माराम दासबोध। माझे स्वरूप स्वतःसिद्ध।। असता न करावा हो खेद। भक्त जनी।।**' आपल्या निरंतर सत्कार्याने देवत्व प्राप्त केलेल्या समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेला सज्जनगड फिरताना सकारात्मक शक्तीचा संचार शरीरात जाणवतो. श्री समर्थ सेवा मंडळ रामदासस्वामींनी सांगितलेल्या महाराष्ट्र धर्माचा प्रसार करण्यासाठी अनेक उपक्रम राबविते. त्यातील अनेक उपक्रम निवासीदेखील असतात. शिवथरघळ येथेही असे उपक्रम राबविले जातात. येथेच समर्थांनी दासबोध लिहिला. अत्यंत साध्या आणि शांततापूर्ण जीवनशैलीचा अवलंब करून सज्जनगडावर मुक्काम केल्यास आपल्याला अलौकिक आनंद प्राप्त होतो.

पान २ वरून

## गजरा

तो आनंद तुम्हाला देण्यासाठी याही स्थितीत मी तुमच्या हातून माझ्या ओंजळीत गजरा घ्यायला तयार आहे. मला तो लावता आला नाही म्हणून काय झाले? त्याच्या सुगंधाच्या साक्षीने आपल्यातील हे घट्ट नाते किती छान दरवळते, होय ना?

आनंदाश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी तिच्याही डोळ्यातून ओघळणाऱ्या आनंदाश्रूंकडे तो केवळ बघत राहिला. आणखी तो काय करू शकत होता? आणि त्याच वेळी या अतीव प्रेमाच्या आविष्काराने तो मोगऱ्याचा गजरा देखील भारावून आणखी सुगंधित झाला.

पान ४ वरून

## धुक्याच्या वाटेवर...

वाळूतले बिळातून करड्या पाठीचा खेकडा उगाच वाळूच्या मैदानावर येऊन तुरुतुरु धावताना दिसतो हे सर्व पाहण्यातील मौज विसरून नदीच्या पात्रात वाळूच्या ट्रॅक्टर वर काम करणारे मजूर अंगावर थंडीची लाट झेलत वाळू भरत असतात. आणि उथळ पाण्यात जाळे टाकून बसलेला कोळी उगाच झुळझुळ वाहणाऱ्या जीवनदायी नदीकडे कृतज्ञतेने पाहत असतो. पोषण या शब्दापासून पौष हा शब्द फार लांब नाही हे सांगण्यासाठी जणू संपूर्ण सृष्टीचेपोषण करणारा पौष महिना आपल्याला असे अनेक विचार करायला लावतो, नाही का?

पान ५ वरून

## (सहन)शीलं परमं भूषणम

सर्वे गुणाः कांचनमाश्रयंते. ज्याच्याकडे पैसा त्याच्याकडेच सगळे गुण आहेत असे आज मानले जाते. पैसा हेच शील झाले आहे. असे असले तरीही शील- आजच्याही काळासाठी अपरिहार्य आहे.

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि असहिष्णू वातावरणात आपल्याला श्रीरामांची मर्यादा, गांधीजींचा संयम, अहिल्याबाईंचा धीर, ज्ञानेश्वरांची विनयशीलता आणि तुकारामांची श्रद्धा पुन्हा शिकण्याची गरज आहे. शील हे बाह्य वर्तन नाही - ते अंतःकरणातील प्रकाश, तेज आहे.

शीलं परमं भूषणम् -

म्हणजे जिथे व्यक्तिमत्त्व सौंदर्याचं मोजमाप फक्त ज्ञान, संपत्ती, किंवा सामर्थ्याने नव्हे तर त्याच्या संयम, सहनशीलता आणि शुद्ध आचरणाने केलं जातं.

**शेवटी एक छोटी प्रार्थना:**
**हे जीवन! दे संयम असा,**
**संकटांतही न डगमगता**
**शील राखू, सहन करू,**
**तूच आहेस अंतिम दिशा !**

पान १ वरून

## ...म्हणून जॉर्डन महत्त्वाचा!

जॉर्डन हा आखाती देश ९५ टक्के सुन्नी लोकसंख्येचा असला, तरी तिथे अन्य अरब देशांप्रमाणे मुस्लीम कट्टरतावाद फोफावला नाही. याचे एक कारण म्हणजे, जॉर्डन हा ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता आणि १९४६ साली तो स्वतंत्र देश म्हणून जगाच्या नकाशावर आला. तसेच, जॉर्डन हा इस्रायलला मान्यता देणारा दुसरा अरब देश ठरला. त्यामुळे इराक, सीरिया, इस्रायल, पॅलेस्टाईन अशा अशांत भौगोलिक परिस्थितीत, २०१०च्या 'अरबक्रांती' नंतरही जॉर्डनमध्ये मात्र कोणतीही उलथापालथ झाली नाही, हे विशेष. तसेच, भारत-मध्य पूर्व-युरोप कॉरिडोरमध्येही इस्रायलइतकीच जॉर्डनची भूमिकाही कळीची ठरणार आहे. कारण, आखाती देशांतून पुढे युरोपला जोडणारा मार्ग हा जॉर्डनमधून जातो. त्यामुळे जॉर्डनशी संबंध हे भारतासाठीही तितकेच महत्त्वाचे. जॉर्डनचे युवराज अल हुसेन बिन अब्दुल्ला-२ हे जातीने मोदींना निरोप देण्यासाठी विमानतळावरही उपस्थित होते. यावरून दोन्ही देशांमधील मैत्रिपूर्ण संबंध भविष्यात आणखीन दृढ होतील, हे निश्चित.

पान ५ वरून

## भारतीयांचे प्राचीन राजशास्त्र

**४) दुर्ग :** याचा अर्थ युद्धसामग्रीने सज्ज असे तटबंदी असलेले राजधानी केंद्र. याच्या संरक्षणासाठी राज्याच्या सीमेवर ४ दिशांना ४ दुर्ग असावेत. पहिले आघात त्यांनी झेलावेत आणि परतवून लावावेत. याच्या रचनेविषयी आणि तेथील व्यवस्थेविषयी बारकाईने सूचना सांगितल्या आहेत. तेथील विविध विषयांची जबाबदारी कोणावर सोपवावी, त्यांचे अधिकार व कार्य कसे असावेत हेही विस्तृतपणे सांगतले आहे. रायगडावरील १८ महाल, १२ बलुते आणि १८ अलुते यांची व्यवस्था याप्रमाणेच करण्यात आली होती.

**५) कोश म्हणजे आजच्या भाषेत ट्रेझरी**

**६) दंड म्हणजे अंतर्गत सुरक्षा** व न्याय व्यवस्था तसेच बाह्य सुरक्षेसाठी चतुरंग सैन्यबल.

**७) मित्र :** आपल्या राज्याच्या सुरक्षा, हित आणि व्यापारवृद्धीसाठी उपयुक्त अशा काही अंतर्गत व्यक्ती, समूह आणि बाह्य सत्ता. जनपदातील आणि आपल्या नागरिकांमधून प्रतिष्ठित लोकांच्या समित्या नेमून त्यांनी बहुमताने मान्य केलेल्या सूचनांचे राजाने पालन करावे. संघराज्य, गणराज्य ही सर्व एका विशाल सत्तेचे घटक असत. स्वामी म्हणजेच राजाने याप्रमाणे इतर सहा प्रकृतींच्या साहाय्याने राज्य सांभाळावे.

**राजा व प्रजा यातील अलिखित करार :** मात्स्यन्यायाला पर्याय म्हणून राजाची नियुक्ती करण्यात आली. राजा हा परमेश्वराचा अंश समजावा. तेव्हा त्याच्याकडूनही सज्जनांचे रक्षण आणि दुष्टांचे निर्दालन अपेक्षित आहे. प्रजेने कर द्यावा आणि राजाने दंड धारणकरावा. मात्र राजाने केव्हा व किती कठोर व्हावे आणि कधी सौम्यपणा दाखवावा हे न्याय आणि दंडशास्त्र सांगते.शिवाजी महाराज अधिकाऱ्यांना सूचना देतात- नाहीतर प्रजेला वाटेल की यापेक्षा मोगलाई बरी. विचारी, सत्प्रवृत्त राजाने विवेकबुद्धीचा उपयोग करावा. कर स्वीकारतांनाही प्रजेला तो त्रासदायक झाल्यास नागरिक करचुकवेगिरीस प्रवृत्त होतात हे सांगण्यासाठी चाणक्याने **पक्वंपक्वंमिवारामात्मफलं राज्यादवाप्नुयात् । आत्मच्छेदभयादामं वर्जयेत्कोपकारकम् ।।** म्हणजे बागेतून फक्त पक्व फळे काढावीत, कच्ची तोडू नयेत, त्याप्रमाणे कर देण्यास असमर्थ असतील त्यांच्यावर कर लादू नये किंवा भुंगे ज्याप्रमाणे फुलांना नदुखवता हलकेच मधुपान करतात तसे प्रजेकडून कर घेताना वागावे अशी छान उदाहरणे दिली आहेत.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# मानसिक अंतरायाचे मर्म

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २९८



शारीरिक अंतर आपण समजू शकतो, जाणवतेही ते! एकमेकांपासून दूर गेल्यावर एका अपरिहार्य अंतराचा सगळ्यांनाच सामना करावा लागतो, मनातून कितीही घट्ट जोड असला तरीही. ते अंतर कापण्यासाठी वाहनांचा उपयोग करावा लागतो आणि त्यांमध्ये वेळही जातो. पण मनामनांमध्ये पडणाऱ्या अंतराचे काय? एका घरात राहूनही, एका छताखालील व्यक्तींचे अनेक कारणांमुळे पटत नसते, अबोले असतात, दुरावे असतात आणि अशी माणसे रक्ताच्या नात्याची असली तरीही दुरावतात. संभाषण, भेटीगाठी नसतात. पूर्वीसारखे पत्रव्यवहार आता होत नाहीत. इतर तंत्रज्ञानाची वेगवान साधने संपर्कासाठी हाताशी असतात पण अंतर असतेच. कार्यस्थळावरील, औपचारिक अंतर बरेचदा व्यावसायिक स्वरूपाचे असते. तेथे पदांची उतरंड असते त्यामुळे वय, पद, अनुभव या साऱ्यांचा परिणाम जवळीकीवर स्वाभाविकपणे होत असतो. पण नात्यांमध्ये मानसिक अंतर असणे हा जिव्हाळ्याचा आणि तितकाच महत्वाचा विषय होत चाललेला आहे. वरकरणी बुरख्याआड सारं काही आलबेल असा आव आणला जातो, भेटल्यावर हास्यविनोद होतात पण त्यांमधील अंतर्यामीचा ओलावा सुकला असतो. याचाच पुढचा टप्पा म्हणजे आपण होऊन स्वतःला इतरांपासून आणि कधीकधी स्वतःपासूनही दूर लोटायचे. स्वतःपासून दूर अंतरावर जाऊन स्वतःचे निरीक्षण करणे स्वतःच्या भावनांच्या नियोजनात महत्वाचे असते. तातडीने व्यक्त होण्याच्या प्रक्रियेत संभवणारे धोके टाळायचे असतील, स्वच्छ दृष्टिकोन अंगी बाणवायचा असेल आणि निर्णयात अचूक पारदर्शिकता आणायची असेल तर अधून मधून स्वतःपासून काही अंतर राखायचे तंत्र शिकणे अपरिहार्य असते. मग तितीक्षा सुधारते, समस्या निवारण जमायला लागते, ताण कमी झाल्याने जुळवून घेण्याची वेगवेगळी तंत्रे आत्मसात करता येतात.

भावनांच्या लोंढ्यामुळे बरेचदा नजरेसमोरचे चित्र अस्पष्ट, धूसर होते आणि मग आपले प्रतिसाद बिघडू शकतात. उदाहरणार्थ-

(१) भावनेच्या भरात एखाद्याला दुखावणे
(२) निर्णय चुकणे
(३) काहीवेळा परावलंबी झाल्याची जाणीव जागेवरच जखडून ठेवण्याची शक्यता निर्माण होणे

अशावेळी स्वतःमधील आणि घटनेमधील अंतर जरा वाढवावे.

विशेषतः पराकोटीचा ताण आला असेल, काळजी वाटत असेल, गुस्सा आला असेल तर मनातल्या मनात फक्त उजळणी करावी- या जाणीवेचे काय परिणाम होऊ शकतात. अशावेळी मानसिक अंतराची संकल्पना वापरली आणि थोडे मागे हटून, तात्काळ व्यक्त न होता, आसपास नजर टाकली तर कृतीचे मार्ग सापडू शकतात आणि उत्प्रेरकापासून बचाव करता येतो. २०१० साली म्युलर आणि मिलर यांनी हा विचार सर्वप्रथम मांडला.

**संशोधनांती तीन प्रमुख विचारधारा समोर आलेल्या आहेत-**

**(१)** योग्यवेळी तात्पुरते अंतर तयार करणे. म्हणजे नजीकच्या भविष्यातील आणि दूरवरच्या भविष्यातील प्रसंगांची हाताळणी वेगवेगळी करता येते.

**(२)** या अंतर निर्माण करण्याच्या विचारधारेतून नावडत्या लोकांपासून दूर जाण्याची आपली क्षमता सिद्ध होते.विशेषतः हे आपल्या हातात असल्याने ते सहज साधते.

**(३)** बालमानसशास्त्रातील एक तत्व म्हणजे बालकांना त्यांच्या कृती आणि त्यांचा भवताल यामधील अंतराची योग्यवेळी जाणीव करून देणे.

यापैकी प्रथम आणि तृतीय विचारप्रवाह म्हणजेच मानसिक अंतर आणि त्याची कारणे. उभयता एकच सुचवितात- आपल्यातील आणि नावडत्या गोष्टींमधील (घटना, वर्तन, प्रसंग आणि व्यक्ती) अंतर वाढवीत नेणे म्हणजे योग्यवेळी आपला मार्ग बदलता येईल आणि वास्तवाचे भान अखंड राहील.

**या तत्वाचे काही सोदाहरण फायदे-**

असा दृष्टिकोन दीर्घकालीन नियोजनाचा पाया ठरतो. आपली ध्येयधोरणे ठरविताना सुलभ होते. नकारार्थी भावनांची पकड अशा दृष्टिकोनातून कमी होऊ शकते. आपला जोडीदार चुकीचे वागत असेल तर आपण खवळू शकतो पण एका अंतरावून समजते की त्या वागण्यामागे काही कार्यकारणभाव असू शकतो आणि मग इतकी तीव्र प्रतिक्रिया अनाठायी होती.

थोडक्यात काय तर मानसिक अंतर एखाद्या वाईड अँगल भिंगासारखे असते. जे आपल्या मर्यादित, संकुचित अनुभवाऐवजी प्रसंग, आणि अनुभूती एका विशाल, सखोल पटलाचा भाग असतात हे दाखवून देते.

**संकल्पना**

या विचारसरणीच्या विविध घटकांकडे बारकाईने बघितले की तिचा विकास, भिन्न प्रकार, भाषेची त्यामागील भूमिका आणि याचे आपल्या कृतीशी असलेले नाते समजते.

ट्रॉप, लीबेरमन आणि वॅक्सलक आणि २००७ साली चार प्रकार सुचविले- वेळ, अवकाश, सामाजिक अंतर आणि शक्यता (काल्पनिकता )

**(अ) वेळ-** घटनांना आपण कायम वेळेच्या चौकटीत मोजतो. जवळच्या काळातील, पूर्वीची इत्यादी. दूरच्या प्रसंगांबद्दल आपण थोडे अमूर्त शब्द वापरतो अंतर अधोरेखित करतो. नजीकच्या घटनांबद्दल आपण थोडे स्पष्ट आणि काळाच्या चौकटीमधील वर्णन वापरतो.

**(ब) अवकाश-** आसपासच्या घटनांसाठी आपण संदिग्ध शब्द वापरतो. हाकेच्या अंतरावरील प्रसंगांचे वर्णन आणि दूर अंतरावरच्या अंतराचे वर्णन निरनिराळे असते.

**(क) सामाजिक अंतर-** अनोळखी, अपरिचित व्यक्तीबद्दल बोलताना आपली शब्दरचना वेगळी असते आणि ती व्यक्ती आपल्यापेक्षा भिन्न गुणांची असेल तर थोडे कोरडे, तटस्थ शब्द वापरतो. जिवलगाबद्दल थोडे उदार आणि सहज शब्द असतात. जवळीक त्यातून डोकावते.

**(ड) काल्पनिकता -** ज्याला शेंडाही नाही आणि बुडाखाही नाही अशा खोट्या कारणांमागे लपत आपण मानसिक अंतर जपायचा प्रयत्न करीत असतो. बरेचदा आपण एखाद्या प्रसंगाला उपस्थित राहण्यास टाळाटाळ करतो, विशेषतः ते फारसे महत्वाचे नसतील तर. विशेषतः एखादा विवाह, समारंभ, स्नेहमेळावा, व्याख्यान, प्रदर्शन इत्यादी. निमंत्रण असले तरीही आपण काहीतरी काल्पनिक सबब शोधून दूर राहतो. बरेचदा ते असत्य असते आणि समोरच्या व्यक्तींचाही ते लक्षात आलेले असते. तोडून टाकायचे नाही, पण सूचन मात्र करायचे आणि योग्य तो संदेश द्यायचा. कधीतरी तिथे मानसन्मान असतो, सूड असतो किंवा अहं तरी असतो. पण दिली जाणारी कारणे तद्दन तकलादू असतात.

**संकल्पनेचा विकास-**

विकसित आणि अविकसित मानसशास्त्रात अंतरायाचा आधी विचार झाला. गिइसब्रेच्त यांनी २०१० साली या दिशेने विचार सुरु केला. पिआजेत आणि वायगॉटस्काय यांचे संशोधन इथे प्रामुख्याने उपयोगी ठरले.

अनेकविध विचारधारांच्या माध्यमातून मानसिक अंतराय समजायला मदत होते. काही संशोधकांना असा मागोवा लागला की भाषेच्या माध्यमातून लहान मुले असा अंतराय व्यक्त करतात. बोलताना बालके एखाद्या काल्पनिक विश्वात रममाण होतात आणि वास्तव जीवनापासून अंतर विकसित करतात. आणि हे फक्त भाषेच्या विश्वाशी जोडले गेलेले आहे, असं नाही . सिगेल यांनी २००२ साली असं विधान केलं की भाषेचा वापर करून आपल्यातील आणि चर्चेच्या विषयातील अंतर वाढवू शकतात.

मानसिक अंतर समजून घ्यायचे असेल तर गिइसब्रेच्त च्या मते दोन दालने पार करावी लागतात-

**(१)** नियोजन आणि निर्णय घेण्याची क्षमता ज्यामुळे भावनिक नियमन साधते.

**(२) यातून अंतराय निर्माण करता येतो.**

जटिल मानसिक प्रक्रिया आणि संज्ञानात्मक क्षमतांचा समूह म्हणजेच कार्यकारण भाव जो मेंदूच्या फ्रँटल लोबने नियंत्रित केला जातो. त्यामुळे तपशील लक्षात ठेवणे, समस्या-निवारण करणे, वेळेचे नियोजन करणे इत्यादी कामे सुकर होतात.

**(अ) ध्येय निर्देशित वर्तन** (प्रसंगानुरूप पोशाख करण्याचा विचार)

**(ब)** प्रतिबंधन करणारे, दमन करणारे प्रतिसाद ( उदा- विचलित न होणे, रांगेत आपली पाळी येण्याची प्रतीक्षा करणे)

**(क)** वर्तन निरीक्षण आणि नियंत्रण (वाद्य वाजविणे)

**(ड)** भवतालानुसार वर्तन बदलणे (उदा- खेळताना व्यूहरचना करणे)

यापुढे जाऊन गिइसब्रेच्त असंही सुचवितो की कार्यकारणभाव आकलनाशी जोडलेला असतो आणि त्याद्वारे मानसिक अंतरायासाठी आवश्यक प्रक्रिया शक्य होतात-

**(१) विस्थापन -** बरेचदा आपले लक्ष वळविणे, इतर मुद्द्यांकडे अधिक केंद्रित करणे हा विस्थापनाला मदत करतो आणि अप्रत्यक्षपणे मानसिक अंतर वाढवितो.

**(२) प्रतिसादावर निर्बंध-** घटनेवर तात्काळ प्रतिसाद नोंदविण्यावर निर्बंध घालता आले तर आपोआप अंतराय निर्माण होतो. काहीवेळा आपला प्रतिसाद पूर्णतया बदलतोही.

**(३) अद्ययावत/ नूतनीकरण करणे-** आपल्याकडील माहितीचे नूतनीकरण केल्यास तिच्यात भर टाकता येते आणि एखाद्या विशिष्ट परिस्थितीचे आकलन नव्याने करता येते. हाती असलेल्या माहितीचे नव्याने मूल्यांकन करू शकलो तर मानसिक अंतराय काय महत्वाचे आहे आणि काय त्यागले तरी फरक पडत नाही यावर प्रकाश टाकू शकतो.

मानवी वर्तनाचे काही कंगोरे या अंतर निर्माण करण्याच्या कृतीतून स्पष्ट होतात. फार काही सैद्धांतिक अशी पार्श्वभूमी नसली तरीही ही संकल्पना तत्वांवर आधारित आहे म्हणून महत्वाची ठरते. हे काही तंत्र किंवा हत्यार नाही जे मानवामध्ये कार्यरत असते. ही कोठलीही स्वाभाविक अथवा नैसर्गिक प्रक्रिया नसल्याने आपण त्याचा वापर विशिष्ट परिस्थिती हाताळण्यासाठी करत असतो. सकारात्मक विचारसरणीत या अंतर निर्माण करण्याला महत्व दिलं जातं कारण परिस्थितीनुरूप आपले प्रतिसाद बदलत असतात किंवा बदलावे असे अभिप्रेत असते. मात्र स्मृती/स्मरण किंवा आकलन अशी ही मानसशास्त्रीय संकल्पना नाही.

**लाभ-**

आपण आणि इतर- व्यक्ती, घटना अथवा तीव्र भावनेचा स्रोत यामध्ये हातभर अंतर ठेवता आले पाहिजे. वस्तू नजरेच्या फार जवळ असतील तर त्या नीट दिसत नाहीत.

**(१) दृष्टिकोनाचा विकास-** परिस्थितीची चौकट नव्याने आणि अधिक अमूर्त स्वरूपात बनविता येते. उदा- एखाद्या विवादाच्या प्रसंगी, मतभेदाच्या आसपास आपणास असं वाटू शकतं , समोरची व्यक्ती संतापली आहे पण थोडं दूर जाऊन परिस्थितीचं निरीक्षण केलं तर लक्षात येतं हा गुस्सा म्हणजे आपण त्या व्यक्तीचं मन लावून ऐकत नाही आहोत याबद्दलचा आहे.

**(२) सुयोग्य प्रतिसाद-** एकदा नव्या नजरेने बघायचे ठरले तर ध्यानात येते- आपण प्रतिसाद बदलतोय. म्हणजे हा प्रतिसाद त्या विशिष्ट घटनेच्या रोखाने नसून त्या घटनेचं सर्वंकष निरीक्षण आणि घटीत यामधून बघणे असते. अशी नजर बदलली की बघणे अधिक तीक्ष्ण आणि धारदार होते आणि आपले मूल्यांकन त्यानुसार व्यक्तीसापेक्ष बनत जाते.

**(३) सर्जनशीलतेला चालना -** मानसिक अंतर आपल्यातील छुप्या निर्मितिक्षमतेला, कल्पनाशक्तीला चालना देते. समस्येपासून थोडं दूर गेलं की तिच्या हाताळणीचे, निवारणाचे नवनवे मार्ग सुचत जातात. उत्तरांच्या सीमारेषा धूसर होत जातात आणि आपण त्या नकळत ओलांडून वेगळ्याच प्रदेशात प्रवेश करतो- तिथे अस्वस्थता नसते, उद्याची काळजी नसते की अतिविचारांचे ओझे! कल्पनाशक्ती वेगवेगळे पर्याय उपलब्ध करून देत आपल्याला अनिर्बंध वाटा समोर आणून ठेवते. काही दैनंदिन सत्य घटना या भिंगातून उलगडून बघण्याचा प्रयत्न करू आणि हा विषय संपवू-

**(अ) तावातावाने वितंडवाद-** बरेचदा आपण विनाकारण हमरीतुमरीवर येतो आणि मग लक्षात येते की आपले बरेच नुकसान झालेलं आहे. उगाचच आपण समोरच्या व्यक्तीच्या चारित्र्यहननाचा पर्याय निवडतो आणि मूळ मतभेदाचा मुद्दा नजरेआड करतो. असं केल्याने कदाचित तात्कालिक विजय मिळेलही पण समोरची व्यक्ती कायमची दुखावते, ती न सांगता काढता पाय घेते आपल्या आयुष्यातून आणि मग भरून न काढता येण्याजोगी हानी झालेली असते.

या क्षणिक भरकटण्याच्या ओघात, आघात करण्यासाठी तलवार परजण्याआधी आपण घटनेचे विशाल पटल नजरेसमोर आणावे आणि हा तात्कालिक विजय महत्वाचा आहे कां याबद्दल चिंतन करावे. कदाचित अशी दुखापत अनावश्यक असते, हे त्यावेळी ध्यानी येते.

**(ब) कालमर्यादा/ समयरेषेच्या आधीची रात्र-** सगळ्यांना हिचा सामना करावा लागतो. हातातील कामाबद्दल अनिवार उत्सुकता छळत असते , स्वतः वरचा विश्वास कमकुवत झालेला असतो आणि होष्यमाणाची जबाबदारी कुरतडत असते. पुस्तके, संकेतस्थळे धुंडाळून अनेक कच्चे मसूदे तयार करण्यात रात्र खर्ची पडलेली असते. कसेही करून वेळेत काम पूर्ण करण्याची मुदत गाठायची असते. आणि अशावेळी शांतपणे विचार केला तर जाणवते- ही समयरेषा मसूदा देण्याची आहे, अंतिम उत्पादन/सेवा देण्याची नाही, ती नंतर कधीतरी आहे. मग थोडी विश्रांती घेऊन कामाला लागल्यावर सगळी ओझी दूर होतात आणि शांतपणे कालमर्यादा गाठता येते.

**(क) ओझे /भार -** खांद्यावर एकाचवेळी खूप जबाबदाऱ्या असण्याची परिस्थितीही आजकाल सवयीची झालेली आहे. समयरेषेची पूर्तताही करायची असते, प्रेझेंटेशन पाठवायचे असते, वैद्यकीय तपासण्या करायच्या असतात आणि काही वेळ कुटुंबियांनाही द्यायचा असतो. महत्वाचे की तातडीचे या दोन लंबकांकडून होणारी खेचाखेच शेवटी ओझे बनते. मग या सगळ्या गोष्टी आत्ताच करण्याची आवश्यकता आहे का याचा विचार थोडं थबकून करणे गरजेचे असते. काही गोष्टी इतरांवर सोपवून टाकाव्यात, काही गोष्टी थोड्या कालावधीनंतर करण्यासाठी बाजूला साराव्यात, काही गोष्टी पूर्णतया टाळाव्यात.

बरेचदा तात्काळ अग्रक्रम आवश्यक नसतो आणि थंड डोक्याने नियोजन करता येते. महत्वाचे आधी आणि तातडीचे नंतर असा क्रम लावता येतो का याची चाचपणी जमली पाहिजे मग ओझे उणावते. अशा प्रकारचे वेळापत्रक केले तर हलके वाटते आणि प्रत्येक जबाबदारीची हाताळणी योग्य तऱ्हेने संभवते.

अंतिमतः समस्या निवारणाच्या एका क्षणी एकाग्रता अपरिहार्य असते आणि त्यावेळी अर्जुनासारखे बाणाच्या अग्रावर पक्षाचा डोळा दिसणे हेच लक्ष्य असावे लागते. बरेच प्रयत्न निष्फळ होतात पण शेवटी उत्तर सापडेपर्यंत प्रयास करीत राहावे लागते.

मग थोडा विसावा घ्यावा आणि नव्या जोमाने समस्येवर तुटून पडावे हे अधिक श्रेयस्कर. कदाचित पूर्वग्रह कमी प्रभावशाली होऊ शकतात आणि नव्या नजरेने बघता येते.

---

राजकारण
अवंती भोयर

**‘नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा’ अशी एक प्रचलित म्हण. अर्थात, ‘नाव मोठे लक्षण खोटे’अशी काहीशी अवस्था यंदाच्या राज्याच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विरोधकांची पाहायला मिळाली. विविध विषयांवरून विरोधक अधिवेशनात सरकारची कोंडी करतील, असे वाटत असताना विरोधी पक्षातील एक-दोन नावे वगळता, सर्वच जण नागपूरच्या गुलाबी थंडीत गारद झालेले दिसले. सभागृहात आक्रमक भूमिका घेणे तर सोडाच; पण विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांची फारशी आंदोलनेही झाली नाहीत. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या धामधुमीतही विरोधक पिछाडीवर आणि महायुतीच आघाडीवर दिसून आली.**



# गुलाबी थंडीत विरोधक गारद, अधिवेशनावर महायुतीचीच जरब!

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी महायुती सरकारने ‘विकसित महाराष्ट्र’ करिता घेतलेल्या बहुविध निर्णयांची छाप स्पष्टपणे दिसून आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेहमीप्रमाणे संयम बाळगत आणि प्रसंगी आक्रमक पवित्रा घेत, सरकारची भूमिका, निर्णय सभागृहासमोर मांडले. यावेळी फडणवीस सरकारने एकूण ७५ हजार २८६ कोटी ३८ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करत ङ्गविकसित महाराष्ट्रफच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले. विशेषतः अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी आणि आपत्ती प्रतिसाद निधीसाठी सर्वाधिक १५ हजार ६४८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’च्या लाभार्थींसाठी सहा हजार १०३ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करत विरोधकांच्या योजना बंद होण्याच्या अपप्रचाराला मुख्यमंत्र्यांनी चाप लावला. याशिवाय, महसूल व वनविभाग, उद्योग, ऊर्जा, कामगार, खनिकर्म, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम यांसह विविध विभागांसाठी भरीव तरतूद करण्यात आली, तर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजन आणि अंमलबजावणीसाठी तीन हजार कोटी रुपये राखून ठेवण्यात आले.

हिवाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत एकूण १८ शासकीय विधेयकांपैकी १६, तर विधान परिषदेत चार विधेयके संमत करण्यात आली. यावेळी ‘महाराष्ट्र लोकायुक्त सुधारणा विधेयक, २०२५’ दोन्ही सभागृहांत एकमताने मंजूर करण्यात आले. या नव्या कायद्यानुसार, पहिल्यांदाच मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, आमदार, भारतीय प्रशासकीय सेवा, पोलीस, वनसेवा अधिकारी, राज्य सरकारी कर्मचारी, स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य, शासकीय-निमशासकीय संस्था, महामंडळे, प्राधिकरणे आदी सर्व लोकसेवक भ्रष्टाचाराच्या तक्रारींसाठी लोकायुक्तांच्या कक्षेत येतील. यामुळे राज्यातील भ्रष्टाचाराला आळा घालण्यात निश्चितच मदत होईल. याव्यतिरिक्त, मानवी सन्मानाला प्राधान्य देणारे आणि कायद्यातील भेदभावजनक भाषा दूर करणारे महत्त्वाचे सुधारणा विधेयक दोन्ही सभागृहांत मंजूर करण्यात आले. जुन्या ‘बॉम्बे प्रिव्हेन्शन ऑफ बेगिंग ॲट’ मधील ‘महारोगी’ हा अपमानास्पद शब्द काढून टाकण्यासाठी आणि भीक मागण्यावर कठोर निर्बंध घालण्यासाठी हे विधेयक आणले गेले. तसेच, धर्मांतरण आणि ‘लव्ह जिहाद’ विरोधी कायद्यासाठी नेमलेल्या पोलीस महासंचालकांच्या समितीचा अहवाल लवकरच येणार असून, त्यानंतर याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात दिली.

तसेच राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख निर्णय घेऊन मतदारांसमोर विकासाचा आराखडाच सादर केला. मग ती मुंबई- लातूर जनकल्याण द्रुतगती मार्गाची घोषणा असेल अथवा मुंबईला पागडीमुक्त करण्याचा ऐतिहासिक निर्णय, अधिवेशनात मुंबईचे प्रश्न, मुंबईतील पुनर्विकास हे मुद्दे प्रकर्षाने सरकारच्या अजेंड्यावर दिसून आले. त्यामुळे खरं तर या अधिवेशनाच्या माध्यमातून सरकारवर जोरदार हल्लाबोल करुन पालिका निवडणुकीत त्याचा लाभ मिळवण्याची संधीही विरोधकांनी गमावली. दुसरीकडे सत्ताधार्यांनी मात्र अधिवेशनातूनच पालिका निवडणुकांमधील विकासाचा अजेंडा जनतेसमोर मांडत, विरोधकांचीच कोंडी केली. तसेच यंदाच्या हिवाळी अधिवेशनात राज्याच्या विविध भागांत बिबट्याचा वाढता प्रादुर्भाव आणि भटक्या कुत्र्यांचा मुद्दादेखील चांगलाच गाजला. अधिवेशन काळात जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी विधानभवन परिसरात बिबट्याचा वेश धारण करून प्रवेश केला. त्यांनी घेतलेले हे बिबट्याचे रूप माध्यमांसह सर्वसामान्यांच्याही चर्चेचा विषय ठरले आणि बिबट्यांचा प्रश्नही चर्चेत आला.

एकंदरीत, संपूर्ण अधिवेशनादरम्यान काही विषय फार खेळीमेळीत, तर काही आक्रमकतेत पार पडले. विशेषत: महसूल विभागाने अनेक निर्णय घेऊन आपल्या उल्लेखनीय कामगिरीचे दर्शन घडवले. महसूल विभागाच्या वतीने सुरू असलेल्या कामांबद्दल विजय वडेट्टीवार आणि जयंत पाटील यांच्यासारख्या विरोधी पक्षातील नेत्यांनीही मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कौतुक केले.

या अधिवेशनात ‘सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था सुधारणा’ विधेयक आणि तुकडेबंदी कायद्यातील जाचक अटी शिथिल करणारे ‘महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५’ मंजूर करून महसूल विभागाच्या दमदार कामगिरीचे दर्शन घडले. तसेच, गुटखाविक्रीला आळा बसण्याकरिता कायद्यात बदल करून गुटखा व्यवसाय करणार्यांवर ‘मकोका’ लागू करण्याबाबत दुरुस्ती करणे आणि शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील अवैध गुटख्याची दुकाने पाडण्याच्या घोषणेमुळे राज्य सरकारचा जनतेप्रति असलेला संवेदनशील दृष्टिकोन अधोरेखित झाला. यासोबतच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याची ऐतिहासिक घोषणाही या अधिवेशनात केली. एकूणच या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विकास, प्रशासन आणि सामाजिक न्यायाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. शेतकरी, महिला, युवक, पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील सुधारणा याबाबत ठोस भूमिका मांडत, सरकारने आपली विकासाभिमुख दिशा स्पष्ट केली. केवळ घोषणाबाजी न करता निर्णयांची अंमलबजावणी कशी होईल, यावर भर देण्यात आला. त्यामुळे अधिवेशन केवळ एक औपचारिक न राहता, कार्यक्षमतेचा ठसा उमटवणारे ठरले.

**‘मविआ’ च्या कमकुवतपणाचे दर्शनः-**

विरोधी पक्षांना मात्र या अधिवेशनात हवा तसा सूर गवसला नाही. ते केवळ विरोधी पक्षनेतेपदाच्या मागणीत रमलेले दिसले. सर्वसामान्यांच्या प्रश्नांपेक्षा विरोधकांना स्वत:च्याच पदांसाठीच्या भांडाभांडीत अधिक रस असल्याचा संदेशही जनतेत गेला. त्यामुळे या अधिवेशनात विरोधकांकडे ना ठोस मुद्दे होते, ना एकसंध भूमिका. गोंधळ घालणे आणि ‘वॉकआऊट’ हा त्यांचा एकमेव राजकीय कार्यक्रम असल्याचे चित्र पुन्हा एकदा दिसून आले. राज्यातील ज्वलंत विषयांवर सरकारला आव्हान देण्यातही विरोधकांनी फारसा रस घेतला नाही. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने हिवाळी अधिवेशनात एकहाती वर्चस्व राखलेले पुनश्च दिसून आले.

महाविकास आघाडीमधील अंतर्गत कलह आणि मतभेदांमुळे अधिवेशन काळात त्यांच्या कमकुवतपणाचे दर्शन घडले. भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील आणि नाना पटोले यांना वगळता, विरोधी पक्षांतील कुणीही फारसे सक्रिय दिसले नाहीत. उद्धव ठाकरे नेहमीप्रमाणे एक दिवस विधानभवनात येऊन आपली हजेरी लावून गेले. याउलट, सत्ताधारी पक्षातील अनेक मंत्री आणि आमदारांनी लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे आणि औचित्याच्या मुद्द्यांद्वारे चमकदार कामगिरी केली. यामध्ये मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री पंकज भोयर, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आ. अमीत साटम, आ. योगेश सागर, आ. महेश लांडगे यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. या अधिवेशनात महिला सक्षमीकरण, शेतकरी हिताचे निर्णय, कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न, प्रशासकीय सुधारणा आणि विकासकामांचा आढावा, हे विशेष मुद्दे गाजले.

यातील काही मुद्द्यांवर तीव्र चर्चा झाली. मात्र, सरकारने संयम राखत आणि आकडेवारीसह उत्तर देत आपली भूमिका भक्कमपणे मांडली. यामुळे जनहितासाठी काम करण्याची सरकारची तयारी आणि स्पष्टता अधोरेखित झाली. अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर शिक्कामोर्तब आणि जनतेशी निगडित प्रश्नांवर सरकारची ठाम भूमिका, यामुळे महायुती सरकारच्या कार्यक्षमतेवर सकारात्मकतेचा ठसा उमटला.

यंदाचे अधिवेशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या त्रिकुटाच्या निर्णयक्षमतेचे प्रतिबिंब ठरले. एकंदरीत, हे अधिवेशन राजकीयदृष्ट्या सत्ताधार्यांसाठी यशस्वी, तर विरोधकांना पुन्हा एकदा आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे, हाच संदेश देणारे ठरले.

# भारत-रशिया संबंध आणि चीनची भूमिका

**डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच बहुप्रतिक्षित अणि जगभर चर्चेस कारण ठरलेली पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांची भेट झाली. या भेटीमुळे जगात अनेकांना पोटशूळ उठला असून, त्यात शेजारी चीनही अग्रक्रमाने आहे. रशियाकडून मिळणारे तंत्रसाहाय्य आज भारताला, चीनसाठी वाढता धोका म्हणून उभे करत आहे. यामुळेच चीनने या भेटीवर तोंड वाकडे केले आहे.**





परराष्ट्रकारण

ब्रि. हेमंत महाजन (नि.)

चीनचे रशिया आणि भारत या दोन्हीही राष्ट्रांशी सकारात्मक संबंध असल्यामुळे, पुतीन यांच्या भारत भेटीबाबत चीनची प्रतिक्रिया सावध अशीच आहे.

माध्यम कथन आणि प्रचार सामायिक मैत्रीवर भर: चीनचे अधिकृत माध्यम असलेल्या ग्लोबल टाईम्सने, भारत-रशिया संबंधांमध्ये झालेल्या सुधारणेबद्दल चिंता व्यक्त करण्यात पुढाकार घेतला आहे. लेखांच्या मालिकेमधून, त्यांनी अशा सहकार्याला आशियातील चीनच्या प्रभावासाठी एक आव्हानात्मक बाब म्हणून चित्रित केले आहे. या संदेशात चीनने, दक्षिण आशियामध्ये शस्त्रास्त्र शर्यतीची शक्यता असल्याचेही संदेशात सांगतानाच, भारताचे लष्करी आधुनिकीकरण हे प्रादेशिक स्थिरतेसाठी थेट धोका म्हणून असल्याचेही म्हटले आहे. काही चिनी विश्लेषक पुतीन यांच्या भारत भेटीला, पाश्चात्य निर्बंधांमुळे आलेला आर्थिक ताण कमी करण्याची रशियाची गरज आणि चीनवरील वाढत्या अवलंबित्वाबाहेर विश्वसनीय ऊर्जा व शस्त्रास्त्र बाजारपेठा सुरक्षित करण्याची त्यांची इच्छा म्हणून पाहतात. धोरणात्मक स्वायत्ततेचे कौतुक: चिनी चर्चा अनेकदा भारताच्या धोरणात्मक स्वायत्तता किंवा ीींश्रींळ-रश्रळसपाशपीं धोरणाची दखल घेते आणि त्याचे कौतुकही करते.

**संरक्षण संबंधांबद्दल चिंता: -** चिनी सुरक्षा वर्तुळात नवीन रशियन संरक्षण विक्री आणि तंत्रज्ञान हस्तांतरणावर (उदा. ra400, rua57E, RA37MM आणि Zirbon क्षेपणास्त्रांचा उल्लेख) लक्ष केंद्रित करून, महत्त्वपूर्ण विश्लेषण केले जाते. चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी अर्थात पीएलए विरुद्ध प्रतिबंध म्हणून, एक एकात्मिक नेटवर्क तयार करण्यासाठी भारत घातक शस्त्रे मिळवत आहे, असा याचा अर्थ लावला जातो.

**समाजमाध्यम आणि लोकभावना:-** भारत-रशिया भेटीवरील चीनचे अधिकृत भाष्य संयमित असले, तरी चीनमधील समाज माध्यमे आणि विश्लेषकांची भावना अनेकदा चीनसमोरील वाढत्या चिंतेचे प्रतिबिंब दाखवते चीन- रशियाची मजबूत भागीदारी लक्षात घेता, काही राजकीय विश्लेषक मॉस्कोच्या वचनबद्धतेवरच प्रश्नचिन्ह उभे करतात आणि पुतीन आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर नेमका कोणता खेळ खेळत आहेत, अशी विचारणाही करतात.

चिनी नागरिकांनीदेखील समाज माध्यमांवर, या भेटीवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. उच्च लष्करी क्षमता असलेल्या भारतासोबतच्या संभाव्य परिणामांविषयीची असुरक्षितता आणि सावधगिरीच्या विषयांभोवतीच, चीनी समाजमाध्यमांमध्ये चर्चा फिरत आहेत. दरम्यान, विश्लेषक या विकसित होत असलेल्या भारत- रशिया अक्षाला, प्रतिसाद देण्यासाठी चीनने आपली लष्करी आणि राजनैतिक धोरणे मजबूत करण्याची आवश्यकता असल्याचेही नमूद करतात.

**चीनच्या प्रभावाविरुद्ध ढाल:-** भारत- रशियाचे सध्याचे सहकार्य करण्याचे धोरण, भारतासाठी धोरणात्मक ढाल म्हणून कार्य करते आहे. भारत रशियावर यासाठी अवलंबून आहे. भारत दक्षिण आशियामध्ये आणि त्यापलीकडे असलेल्या चीनच्या प्रभावाला, विशेषतः ङ्गबेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्हफसारख्या प्रकल्पांच्या संदर्भात, प्रतिसाद देऊ शकतो. लष्करी समतोल राखणे: विशेषतः प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील चीनसोबतच्या लष्करी असमतोलावर मात करण्यासाठी, भारताला आवश्यक असलेले संरक्षण साहित्याचे सुटे भाग, अत्याधुनिक शस्त्रास्त्र आणि नवीन तंत्रज्ञान हस्तांतरणाचा भारताला होत राहाणे, चीनकरिता अत्यंत धोकादायक असल्याचे चिनी माध्यमांचे मत आहे.

**मॉस्कोवर प्रभाव टाकणे:-** मध्य आशिया, आर्टिक आणि मब्रिक्सफ आणि ङ्गशांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनफसारख्या बहुपक्षीय मंचांवर, धोरणात्मक चर्चांमध्ये रशियाचा आवाज टिकवून ठेवणे व चीनचे महत्त्व कमी करणे, असा या भेटीचा अर्थ काढला जातो.

**भारतातील वाढलेली लष्करी सज्जता: -** संयुक्त विकास आणि सहउत्पादनासह संरक्षण करार, चीनविरुद्ध भारताची लष्करी सज्जता वाढवण्यासाठी एक थेट उपाय आहे. ॲण्टी-स्टेल्थ रडार आणि नवीन क्षेपणास्त्र तंत्रज्ञान यांसारख्या प्रगत प्रणालींचा समावेश करणे, एकात्मिक हवाई संरक्षण आणि हवाई-वर्चस्व नेटवर्क तयार करण्याच्या दिशेने उचललेले ते एक पाऊल आहे, जे थेट चीनी लष्कराच्या वाढत्या हवाई शक्तीला तोंड देऊ शकते. तंत्रज्ञान हस्तांतरण आणि स्वदेशी उत्पादनावर लक्ष केंद्रित करणे, हे भारताचे एक दीर्घकालीन धोरण आहे, रशिया भारतीय लष्कराचा कणा असलेल्या जुन्या चे आधुनिकीकरण करण्यासाठी प्राथमिक स्रोत राहिला आहे, जे चीनला आजवर कधीही आवडलेले नाही.

**चीनसाठी आर्थिक स्पर्धा आणि परिणाम:-** भारत आणि रशियातील वाढत्या आर्थिक आणि धोरणात्मक संबंधाचे, चीनवर अनेक परिणाम होतात. भारत आणि रशियामधील मजबूत झालेले आर्थिक संबंध, तंत्रज्ञान आणि ऊर्जा अशा क्षेत्रांमध्ये स्पर्धा वाढवू शकतात.

**चीन-रशियन एकजुटीची चाचणी:-** रशिया-चीन संबंध मजबूत असले, तरी रशियाने चीनचा मुख्य धोरणात्मक प्रतिस्पर्धी असलेल्या भारताला मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे आणि तंत्रज्ञान हस्तांतरित करणे सुरू ठेवल्याने, चीनसाठी मोठीच गुंतागुंत निर्माण होते.

**कमी झालेला आर्थिक फायदा: -** मजबूत रुपया-रूबल सेटलमेंट प्रणाली स्थापित करण्याच्या आणि पेमेंट नेटवर्क जोडण्याच्या कराराचा उद्देश, व्यापार देयके सुरक्षित करणे आणि डॉलर-प्रभुत्व असलेल्या प्रणालीवरील अवलंबित्व कमी करणे हा आहे. भारतीय निर्यात वाढवण्यावर लक्ष केंद्रित करून, २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्सचा व्यापार लक्ष्य निश्चित करण्याचे भारताचे उदिष्ट, रशियाचा प्राथमिक नवीन आर्थिक भागीदार म्हणून चीनच्या भूमिकेशी थेट स्पर्धा करते.

**प्रादेशिक कनेटिव्हिटी आव्हान:-** आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर आणि चेन्नई- व्लादिवोस्तोक सागरी दुवा यांसारख्या कनेटिव्हिटी प्रकल्पांवरील सहकार्य, युरेशियन प्रदेशात चीनच्या बेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्हसाठी पर्याय ठरते.

**धोरणात्मक प्रतिउपाय आणि मुत्सद्देगिरी:-** भारताशी स्पर्धा करताना चीन आपल्या प्रचंड आर्थिक आणि मुत्सद्दी वजनाचा फायदा घेणार्या बहुआयामी धोरणाद्वारे प्रतिसाद देईल, अशी अपेक्षा आहे.

**चीनची रणनीती आणि प्रतिउपाय:-** रशियाचे अवलंबित्व अधिक मजबूत करणे, अमर्याद भागीदारी आणि मुख्य मुद्द्यांवर (तैवान, शिनजियांग) चीन-ला रशियाचा सातत्यपूर्ण पाठिंबा सार्वजनिकरित्या पुन्हा दर्शवणे. रशियाचे चीनवरील आर्थिक अवलंबित्व कायम राहाण्यासाठी गुप्तपणे काम करणे, ज्यामुळे भारतासोबत सखोल संरक्षण तंत्रज्ञान सामायिक करण्याच्या मॉस्कोच्या उत्साहाला मर्यादा येऊ शकतात.

**लष्करी पवित्रा :-** सीमेवर दबाव कायम ठेवण्यासोबतच लष्करी पवित्रा आणि सैन्याची तैनाती सुरू ठेवणे, जेणेकरून भारताला खंडीय सुरक्षेत गुंतवून ठेवता येईल, यामुळे भारताच्या आर्थिक प्रगतीचा वेग कमी होईल आणि भारत कधीहे चीनशी स्पर्धा करू शकणार नाही.

**आर्थिक लाभ:-** चीन-रशिया व्यापाराचे प्रमाण (जे आधीच भारत-रशिया व्यापारापेक्षा लक्षणीयरित्या मोठे आहे) आणखी वाढवणे, आणि संयुक्त प्रकल्पांना (उदा. ऊर्जा पाईपलाईन, आर्टिक विकास) गती देण्याचे कार्यक्रम चीन हाती घेऊ शकतो. यामुळे रशियाला चिनी आर्थिक बोजाच्या दलदलीत अधिक खोलवर रुजवून, चीनला रशियाचे अपरिहार्य भागीदार बनवता येईल.

**सायबर आणि गुप्तचर मोहिमा:-** सायबर क्षमतांचा वापर करून गुप्त मोहिमा आयोजित करण्याचे कारस्थान चीन खेळू शकतो. यामुळे भारत-रशिया संबंधात किंवा भारत आणि पाश्चात्य देशांमध्ये मतभेद निर्माण करण्याचा उद्देश साधणे चीनला सुलभ होईल.

**निष्कर्ष:-**

भारत आणि रशिया यांच्यातील वाढलेले सहकार्य, विशेषतः संरक्षण, ऊर्जा आणि कनेटिव्हिटीमध्ये चीनसाठी महत्त्वपूर्ण आव्हाने उभी करते. हे भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेचे स्पष्ट प्रतिपादन आणि चिनी प्रभावाविरुद्ध एक महत्त्वपूर्ण ढाल प्रदान करते. प्रगत रशियन लष्करी तंत्रज्ञानाचा सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित करून आणि नवीन आर्थिक प्रोत्साहन देऊन रशियाला स्वतःकडे वळवणारा भारत, चीन-रशियाच्या अमर्याद भागीदारीसमोरचे संकट ठरतो. यामुळे भारताची लष्करी क्षमता वाढून, प्रादेशिक शक्ती संतुलन नव्याने घडत आहे, जे चीनला अजिबात आवडलेले नाही. यामुळे येणार्या काळामध्ये चीन रशियाशी आपले संबंध अजून बळकट करण्याचा प्रयत्न करेल आणि भारत आणि रशियाचे संबंध सुधारू नये, म्हणून नवीन अडथळे निर्माण करण्याचाही प्रयत्न करेल. यावरती आपले लक्ष असायला पाहिजे आणि करार केल्याप्रमाणे, भारत रशिया संबंध आणि आर्थिक सहकार्य वेगाने सुधारले पाहिजे, याच्या अंमलबजावणीवरही लक्ष केंद्रित केले पाहिजे.

थोडक्यात, भारत आणि रशियामधील वाढलेले सहकार्य चीनसाठी महत्त्वपूर्ण आव्हाने उभी करते. भारत आपली संरक्षण, आर्थिक आणि राजनैतिक क्षमता मजबूत करेल, तसतसा चीनची याबद्दलची चिंता वाढण्याची शक्यता आहे. भारतासाठी हे बदल आपली सार्वभौमत्व सिद्ध करण्याची आणि जागतिक स्थान वाढवण्याची संधी देतात; परंतु त्याचबरोबर वेगाने विकसित होत असलेल्या चीनसोबतचे वाढते तणावदेखील घेऊन येतात. या गुंतागुंतीच्या संबंधांच्या जाळ्यामध्ये प्रत्येक देश आपल्या धोरणांचे किती प्रभावीपणे व्यवस्थापन करतो, यावर भविष्य अवलंबून असेल.

---

वेध

अजय तिवारी



# पुन्हा पुन्हा आगीशी खेळ!

**गोव्यातील नाईट क्लब'मध्ये लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू झाल्यानंतर, अपघातामागील कारणांचा तपास सुरू होताच मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले. सुरुवातीच्या तपासानंतर 'नाईट क्लब'मध्ये अग्नी सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याचे आणि सार्वजनिकसुरक्षेशी तडजोडीचे आरोप समाविष्ट आहेत. आपल्या देशात असे प्रकार सतत का घडत राहतात?**

कोरोना काळात रुग्णालय तसेच हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत अनेकांचा बळी गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्वच राज्य सरकारांना सार्वजनिक ठिकाणांचे 'फायर ऑडिट' करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतरही अनेक रुग्णालये तसेच अन्य सार्वजनिक ठिकाणी अग्नी सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जात ना-हीत, असे आढळले. अग्नी सुरक्षेच्या योजना नसल्यामुळे आगीच्या घटना घडल्या आहेत. अलिकडेच गोव्यामध्ये जळीतकांड अनुभवणाऱ्या दुर्घटनाग्रस्त 'नाईट क्लब'मध्ये यापूर्वी बेकायदेशीर बांधकामाच्या तक्रारी दाखल झाल्याचा दावाही केला जात आहे. या तक्रारी असूनही नाईट क्लब कसा चालत होता, असा प्रश्न उपस्थित होत आहे. गोवा पोलिस प्रमुख आलोक कुमार आग सिलिंडरच्या स्फोटामुळे लागल्याचे सांगत असले, तरी प्रत्यक्षात अनेक प्रत्यक्षदर्शी म्हणतात की, 'नाईट क्लब'च्या पहिल्या मजल्यावर आग लागली. तिथे फटाक्यासारखी स्फोटके होती, असे सांगितले जात होते.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार उत्तर गोव्यातील बिर्च बाय रोमियो लेन नाईट क्लबमध्ये रात्रीच्या वेळी आग लागली आणि सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर नियंत्रणात आली. आग लागल्यानंतर अनेक लोक जीव वाचवण्यासाठी तळघरात पळाले आणि धुरामुळे गुदमरून अंदाजे २० जणांचा मृत्यू झाला, तर काही जणांचा भाजून मृत्यू झाला. जखमी झालेल्या सहा जणांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रोमियो लेन क्लब साखळीत रेस्टॉरंट्स, बार, रिसॉर्ट्स आणि इतर मालमत्तांचा समावेश आहे. या प्रकरणी पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. 'बिर्च बाय रोमियो लेन' नावाच्या नाईट क्लबमध्ये ६ डिसेंबर रोजी उशिरा आग लागली. पोलिस तपास सुरू झाला; परंतु अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. घटनेची तीव्रता पाहता मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दंडाधिकारी चौकशीचे आदेश दिले.

आग सिलेंडरच्या स्फोटामुळे लागली, या पोलिसांच्या दाव्याला अनेक प्रत्यक्षदर्शींनी आव्हान दिले आहे. काहींचे म्हणणे आहे की, क्लबच्या पहिल्या मजल्यावर आग लागली, तिथे सुमारे १०० पर्यटक नाचत होते. अंतिम फॉरेन्सिक तपासणी अहवाल जाहीर झाला नसल्यामुळे आग कुठून लागली हे स्पष्ट नाही. आग पसरताच लोक पायऱ्यांकडे धावले; परंतु अरुंद पायऱ्या आणि गुंतागुंतीच्या मार्गांमुळे अनेक जण स्वयंपाकघर आणि तळमजल्यादरम्यान अडकले. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनीही कबूल केले की, दरवाजे खूप घट्ट होते आणि योग्य वायुवीजन नव्हते. बरेच लोक भूमिगत भागात पळून गेले. तिथे हवेअभावी त्यांचा जीव गुदमरला. हा नाईट क्लब बॅकवॉटर भागात होता. तिथे फक्त एक अरुंद प्रवेश रस्ता होता. परिस्थिती इतकी वाईट होती की, अग्निशमन दलाच्या गाड्या सुमारे ४०० मीटर अंतरावर उभ्या कराव्या लागल्या. यामुळे बचावकार्यात लक्षणीय विलंब झाला.

प्रत्यक्षदर्शींच्या मते, क्लब ताडाच्या पानांचा वापर करून बांधलेला होता. म्हणूनच आग वेगाने पसरली आणि काही वेळातच संपूर्ण इमारत राख झाली. 'नाईट क्लब' बेकायदेशीरपणे बांधला गेला होता. त्याकडे बांधकामाची परवानगी नव्हती. पंचायतीने चौकशी केल्यानंतर ते पाडण्याची नोटीस बजावण्यात आली. तथापि, पंचायत संचालनालयाकडे अपील केल्यानंतर ही नोटीस स्थगित करण्यात आली. क्लब पर्यावरण-संवेदनशील खाऱ्या जमिनीत आणि 'कोस्टल रेग्युलेशन' झोनमध्ये असल्याचे वृत्त आहे. तिथे बांधकाम करण्यास परवानगी नाही. क्लबने अग्नी सुरक्षा नियमांचे पालन केले नाही. निष्काळजीपणा कुठे झाला हे शोधण्यासाठी आता दंडाधिकारी चौकशी केली जाईल. कलंगुटचे आमदार मायकल लोबो यांनी जाहीर केले आहे की, आता सर्व 'नाईट क्लब'चे अग्नी सुरक्षा ऑडिट केले जाईल. प्रशासनाने कारवाई आणि भरपाईची घोषणा केली. या प्रकरणी हॉटेलचे व्यवस्थापक आणि मालकाविरुद्ध एफआयआर दाखल करून अटक वॉरंट जारी करण्यात आले. गोवा नाईट क्लबच्या आगीमुळे सुरक्षा, बेकायदेशीर बांधकाम आणि शासकीय निष्काळजीपणाबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अपघातानंतर समोर आलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधली जात आहेत. या विनाशकारी आगीसाठी कोण जबाबदार आहे, हे चौकशीनंतरच स्पष्ट होईल. हा क्लब पणजीपासून २५ किलोमीटर अंतरावर अर्पोरा गावात आहे. गोव्याच्या पर्यटन हंगामातील ही दुर्दैवी घटना आहे. मृतांपैकी बहुतेक जण स्वयंपाकघरातील कर्मचारी होते.

क्लबच्या सुरक्षा उपाययोजना, गॅस कनेक्शन सिस्टिम आणि आपत्कालीन निर्गमन योजनेची तपासणी केली जाईल, असे नंतर सांगितले गेले. नाईट क्लब सध्या सील करण्यात आला असून मालक आणि व्यवस्थापनाची चौकशी केली जात आहे. अधिकाऱ्यांनी आगीच्या कारणाचा सविस्तर तपास सुरू केला. पर्यटक नेहमीच गोव्याला एक अतिशय सुरक्षित ठिकाण मानतात; परंतु ही आग खूप त्रासदायक आहे आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत. पर्यटक तसेच अशा क्लबमध्ये काम करणाऱ्यांची सुरक्षा खूप महत्त्वाची मानायला हवी.

सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली. स्फोटाच्या वेळी क्लब बंद करण्याचे काम सुरू असल्याचे तपासात उघड झाले. स्थानिक पोलिस, फॉरेन्सिक पथके आणि जिल्हा अधिकाऱ्यांनी या घटनेची सविस्तर चौकशी सुरू केली.

देशात २०२३ मध्ये आगीच्या १३ लाख ८९ हजार घटनांमध्ये ३ हजार ६७० नागरिकांचा मृत्यू झाला आणि १३ हजार ३५० जखमी झाले. याव्यतिरिक्त अग्निशमन दलाच्या ८९ जवानांचाही मृत्यू झाला.

गेल्या दोन वर्षांमध्ये अग्निशमन दलाच्या जवानांच्या मृत्युदरात झालेली वाढ चिंताजनक आहे. २०२३ मध्ये नागरी आगीमुळे ३६७० जण मृत्युमुखी पडले. 'नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरो'च्या मते भारतात दररोज ६० हून अधिक लोक आगीमुळे मरतात. दरवर्षी भारतात आग आणि संबंधित कारणांमुळे अंदाजे २५ हजार लोक मरतात.

आगीच्या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांपैकी महिलांचे प्रमाण अंदाजे ६६ टक्के आहे. नैसर्गिक आणि अनैसर्गिक कारणांमुळे होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी आगीमुळे होणारे मृत्यू अंदाजे सहा टक्के आहेत. दरवर्षी नोंदविलेली बहुतेक प्रकरणे इतर कारणांच्या श्रेणीत येतात. २००१ ते २०१४ दरम्यान देशात आगीच्या एकूण ३.१६ लाख घटनांची नोंद झाली. १४ पैकी १२ वर्षांमध्ये २० हजारांहून अधिक प्रकरणे नोंदविली गेली. २०११ मध्ये सर्वाधिक प्रकरणे (२६,३४३) नोंदविली गेली.

२००१ ते २००४ दरम्यान प्रकरणांची संख्या कमी झाली; परंतु २००४ पासून ती सातत्याने वाढत आहे. ही वाढ २०११ पर्यंत चालू राहिली आणि नंतर २०१४ पर्यंत कमी झाली. गेल्या १४ वर्षांमध्ये दररोज सरासरी ५९ मृत्यू झाले आहेत. २००१ ते २०१४ दरम्यान अंदाजे तीन लाख लोक आगीमुळे मृत्युमुखी पडले. राज्ये-केंद्रशासित प्रदेशांमध्ये २००१ ते २०१४ दरम्यान महाराष्ट्रात सर्वाधिक प्रकरणे आणि मृत्यू नोंदविले गेले. १४ वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रात ८४ हजारांहून अधिक प्रकरणे आणि ७१ हजार ७३० मृत्यू झाले. हे देशातील एकूण मृत्यूंच्या तुलनेत २४ टक्के आहे. १४ वर्षांच्या कालावधीत १५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एक हजारांपेक्षा कमी मृत्यू झाले आहेत. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये एकत्रितपणे नोंदविलेल्या एकूण मृत्यूंपैकी ४६ टक्के मृत्यू झाले आहेत.

आगीच्या या घटनांमुळे झालेल्या आर्थिक नुकसानाचे अद्याप मूल्यांकन झालेले नाही. तथापि, काही अंदाज आणि स्वतंत्र अभ्यास समोर आले आहेत. एका अभ्यासानुसार, भारतीय विमा कंपन्यांनी नोंदविलेल्या मोठ्या नुकसानींपैकी अंदाजे ४५ टक्के नुकसान आगीमुळे होते. दुसऱ्या एका अभ्यासानुसार आगीमुळे दरवर्षी अंदाजे एक हजार कोटी रुपयांचे नुकसान होते. एकूण जोखीम क्रमवारीमध्ये आगीचा वाटा नऊ टक्के आहे. उत्पादन उद्योगात आग ही पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी जोखीम मानली जाते.